रायगड, नवी मुंबई, ठाणे, रत्नागिरी, सिंधुदुर्ग ▌आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ । वर्ष ८९। अंक २६८ । पृष्ठे १० ▌RGD/016/2026-28 www.krushival.in




# कृषीवल

रायगड, रविवार, दि.८ मार्च २०२६
किंमत ४ ₹

## जंजिरा किल्ल्यावर महिलांना मोफत प्रवेश

**आगरदांडा :** जागतिक महिला दिनाच्या निमित्ताने पुरातत्व विभागाकडून महिलांसाठी विशेष भेट देण्यात आली आहे. मुरुड-राजपुरी समुद्रकिनाऱ्यातील ऐतिहासिक जंजिरा किल्ला पाहण्यासाठी आकारले जाणारे प्रवेश शुल्क महिलांसाठी माफ करण्यात आले आहे. विशेष म्हणजे, या दिवशी महिलांसह पुरुष पर्यटकांनाही प्रवेश शुल्कातून सूट देण्यात आली आहे. मुरुड-राजपुरी येथील समुद्रात वसलेला ऐतिहासिक जंजिरा किल्ला पाहण्यासाठी दररोज शेकडो पर्यटक भेट देत असतात. या किल्ल्याचे ऐतिहासिक महत्त्व आणि समुद्राच्या मध्यभागी असलेली भव्य रचना पाहण्यासाठी देश-विदेशातून पर्यटक मोठ्या •➤ पान २ वर

## वेधक

### आजोबांपेक्षा नातू श्रीमंत!

**मुंबई :** महाराष्ट्रातील राज्यसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर दाखल करण्यात आलेल्या उमेदवारी अर्जातील प्रतिज्ञापत्रातून राष्ट्रवादी काँग्रेसचे ज्येष्ठ नेते शरद पवार यांच्यापेक्षा त्यांचे नातू आणि अजित पवार यांचे पुत्र पार्थ पवार अधिक श्रीमंत असल्याचे उघड झाले आहे. प्रतिज्ञापत्रानुसार, शरद पवार आणि त्यांच्या पत्नी प्रतिभा पवार यांची एकूण मालमत्ता सुमारे ६० कोटी ७१ लाख रुपये आहे. तर, पार्थ पवार यांची एकूण मालमत्ता तब्बल ८८ कोटी ३३ लाख रुपये इतकी असल्याचे नमूद करण्यात आले आहे.

### रोहित पवारांच्या लढ्याला आपची साथ

**नवी दिल्ली :** महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या विमान अपघाती मृत्यूबाबत निष्पक्ष चौकशी व्हावी, यासाठी आ. रोहित पवार यांनी दिल्लीत जाऊन आपचे नेते माजी मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल यांची भेट घेतली. या भेटीत त्यांनी अपघातासंदर्भात जमा केलेली संपूर्ण माहिती आणि तपशीलवार प्रेझेंटेशन सादर केले. अजित पवार यांच्या अपघाती मृत्यूबाबत अनेक प्रश्न उपस्थित होत असून, या प्रकरणाची सखोल चौकशी व्हावी आणि संसदेतही आवाज उठवावा, अशी विनंती रोहित पवार यांनी केली. यावर केजरीवाल यांनी सकारात्मक प्रतिसाद दिला आहे.

### महाराष्ट्र तापणार

**मुंबई :** देशातील अनेक राज्यांमध्ये तापमानात झपाट्याने वाढ होत असून पुढील काही दिवस महाराष्ट्रातही उष्णतेची तीव्रता वाढण्याचा इशारा हवामान विभागाने दिला आहे. निरभ्र आकाश आणि पश्चिमी विक्षोभ नसल्यामुळे मार्च महिन्यात पावसाची शक्यता कमी असल्याने उष्णतेची लाट जाणवू शकते. हवामान विभागाच्या माहितीनुसार गुजरात, राजस्थानसह काही राज्यांमध्ये उष्णतेचा अलर्ट जारी करण्यात आला आहे. तसेच कोकणासह महाराष्ट्रातील काही भागातही तापमान वाढण्याची शक्यता वर्तवण्यात आली आहे.



## रस्त्यातील खड्डा बेतला जीवावर

■ वनरक्षकाचा अपघाती मृत्यू
■ प्राधिकरण व कंत्राटदारांविरोधात वनरक्षक-वनपाल संघटनेचा संताप

**। रायगड । जिल्हा प्रतिनिधी ।**

अलिबाग वनपरिक्षेत्रात कार्यरत असलेल्या एका वनरक्षकाचा रस्त्याच्या कामासाठी खोदलेल्या खड्ड्यात पडून दुर्दैवी अपघाती मृत्यू झाल्याची घटना शुक्रवारी रात्री घडली. आपल्या जुळ्या मुलांच्या पाचवीच्या कार्यक्रमासाठी आमंत्रण देऊन घरी परतत असताना हा अपघात घडल्याने परिसरात हळहळ व्यक्त केली जात आहे.

सूरज सारंगे असे मृत वनरक्षकाचे नाव असून, ते अलिबाग वनपरिक्षेत्राच्या अखत्यारीत तिनविरा येथे वनरक्षक म्हणून कार्यरत होते. २०२१ साली ते या विभागात रुजू झाले होते. ते मुरूड तालुक्यातील सर्वे गावचे रहिवासी होते. काही दिवसांपूर्वीच त्यांना जुळे अपत्य झाले होते. त्या मुलांच्या पाचवीच्या कार्यक्रमाचे आमंत्रण देण्यासाठी ते नातेवाईकांकडे गेले होते.

### सुरक्षेच्या उपाययोजनांचा अभाव

मुरूड तालुक्यातील रेवस-रेड्डी मार्गावर सुरू असलेल्या कामादरम्यान खोदून ठेवलेल्या खड्ड्याजवळ कोणत्याही प्रकारच्या सुरक्षेच्या उपाययोजना करण्यात आल्या नव्हत्या. त्या ठिकाणी बॅरिकेट्स, सूचना फलक, रात्री स्पष्ट दिसण्यासाठी रेडियम पट्ट्या किंवा लाल दिवे लावले नसल्याचे समोर आले आहे. संबंधित प्राधिकरण आणि कंत्राटदारांच्या निष्काळजीपणामुळे हा अपघात घडल्याचा आरोप करण्यात येत आहे. या घटनेबाबत महाराष्ट्र वनरक्षक-वनपाल संघटना, शाखा अलिबागचे अध्यक्ष व पदाधिकाऱ्यांनी तीव्र संताप व्यक्त केला आहे. घटनेची सखोल चौकशी करून जबाबदारांवर गुन्हा दाखल करण्यात यावा आणि योग्य कारवाई करावी, अशी मागणी संघटनेने केली आहे.

शुक्रवारी रात्री ते मुरूड तालुक्यातील सर्वे येथील आपल्या घरी परतत असताना चिकणी परिसरात हा अपघात झाला. रेवस-रेड्डी मार्गावर सुरू असलेल्या रस्त्याच्या कामासाठी खोदून ठेवलेल्या खोल मोरीत मोटारसायकलचा तोल जाऊन ते खाली पडले. या भीषण अपघातात त्यांचा जागीच मृत्यू झाला. यामुळे सारंगे कुटुंबावर दुःखाचा डोंगर कोसळला असून, कुटुंबियांसह सहकाऱ्यांवर शोककळा पसरली आहे.

## युद्धझळा ‘गॅस’वर!



■ घरगुती ६०, तर व्यावसायिक सिलिंडर ११५ रुपयांनी महाग
■ सर्वसामान्यांसह व्यावसायिकांवर आर्थिक भार

**। रायगड । जिल्हा प्रतिनिधी ।**

मध्यपूर्वेत पेटलेल्या युद्धाच्या आगीची झळ आता थेट सर्वसामान्यांच्या स्वयंपाकघरापर्यंत पोहोचली आहे. इराण-इस्रायल-अमेरिका या देशांमध्ये निर्माण झालेल्या युद्धजन्य परिस्थितीचा परिणाम ऊर्जा क्षेत्रावर होत असून, त्याचा फटका भारतातील गॅस ग्राहकांना बसू लागला आहे. घरगुती वापराचा १४.२ किलो वजनाचा गॅस सिलिंडरमध्ये ६० रुपयांनी, तर व्यावसायिक वापराचा १९ किलो वजनाचा गॅस सिलिंडर तब्बल ११५ रुपयांनी महाग झाला आहे. शनिवार, ७ मार्चपासून ही दरवाढ लागू झाली असून, यामुळे सर्वसामान्य नागरिकांसह व्यावसायिकांवर आर्थिक भार वाढणार आहे.

या दरवाढीमुळे घरगुती गॅस वापरणाऱ्या कुटुंबांच्या मासिक बजेटवर थेट परिणाम होणार असून, गृहिणींचे गणित कोलमडण्याची भीती व्यक्त केली जात आहे. जिल्ह्यातील अनेक गॅस एजन्सींमध्ये सिलिंडरचा साठा कमी होत चालल्याची माहितीही समोर येत आहे. काही एजन्सींमध्ये साठा संपल्याचे, तर काही ठिकाणी केवळ दोन दिवस पुरेल इतकाच साठा उरल्याचे सांगितले जात आहे. त्यामुळे ग्राहकांना सिलिंडरसाठी प्रतीक्षा करावी लागण्याची शक्यता निर्माण झाली आहे. पूर्वीच्या काळात घराघरांत चुलीवर •➤ पान २ वर

### भारतात एलपीजीची मोठी आयात

भारत हा जगातील दुसरा सर्वात मोठा एलपीजी आयात करणारा देश आहे. गेल्या वर्षी देशात जवळपास ३३.१५ दशलक्ष मॅट्रिक टन घरगुती गॅसचा वापर झाला. एलपीजी प्रोपेन आणि ब्यूटेन गॅसच्या माध्यमातून तयार होतो. देशाच्या एकूण एलपीजी गरजेच्या जवळपास दोन तृतियांश वाटा आयात करतो. भारतात येणाऱ्या एलपीजी गॅसचा पुरवठा हा कतारमधूनच होतो. कतारवरील रिफायनरींवर इराणने हल्ला केल्याने या देशाने या रिफायनरी सध्या बंद केल्या आहेत. मध्य-पूर्वेतील संकटाने सध्या पुरवठा कमी झाला असला तरी ग्राहकांनी चिंता करू नये, लवकरच पर्यायी मार्गाने गॅसचा पुरवठा होईल, असे केंद्र सरकारने स्पष्ट केले आहे.

### देशात ३३.२ कोटी एलपीजी ग्राहक

इंडिय ऑईल कॉर्पोरेशन, हिंदुस्थान पेट्रोलियम कॉर्पोरेशन आणि भारत पेट्रोलियम कॉर्पोरेशन या सरकारी तेल कंपन्यांना सरकारने एलपीजी उत्पादन वाढवण्याचे आदेश दिले आहेत. देशात जवळपास ३३.२ कोटी सक्रिय एलपीजी ग्राहक आहेत. जानेवारीपासून अमेरिकेकडूनही भारताला एलपीजी गॅसचा पुरवठा सुरू झालेला आहे. भारतीय तेल कंपन्यांनी एक वर्षासाठी अमेरिकेसोबत याविषयीचा करार केला आहे. अमेरिकेकडून २.२ मीट्रिक टन प्रतिवर्ष एलपीजी आयात करण्यात येणार आहे.

## महावितरणचे १४ कोटी वीजबिल थकीत

### वीजपुरवठा खंडित करुन थकीतदारांना शॉक

**। रायगड । प्रमोद जाधव ।**

वाढते नागरीकरण आणि औद्योगिकीकरण यामुळे विजेच्या वापरात सातत्याने वाढ होत आहे. मात्र, विजेचा वापर करूनही अनेक ग्राहक वेळेवर वीजबिल भरत नसल्यामुळे त्याचा आर्थिक फटका महावितरण कंपनीला बसत आहे. रायगड जिल्ह्यात सध्या तब्बल १४ कोटी रुपयांहून अधिक वीजबिल थकीत असल्याची माहिती समोर आली आहे. या थकबाकीत लहान-मोठ्या उद्योगांसह विविध कारखान्यांचाही समावेश आहे. वेळेत वीजबिल न भरल्यास वीजपुरवठा खंडित केला जाऊ शकतो, त्यामुळे जिल्ह्यातील सुमारे २५ हजार वीजबिल थकीतदारांना महावितरणचा शॉक बसण्याची शक्यता आहे.

शहरी भागासह ग्रामीण भागातही रायगड जिल्ह्यात महावितरणचे जाळे मोठ्या प्रमाणात पसरलेले आहे. लाखो नागरिकांपर्यंत वीजपुरवठा पोहोचविण्याचे काम महावितरण कंपनीमार्फत केले जात आहे. घरगुती वापरासोबतच व्यावसायिक, व्यापारी, उद्योग, कारखाने तसेच सरकारी कार्यालयांनाही वीजपुरवठा केला जातो. •➤ पान २ वर

### पथदिव्यांचे ९६ कोटी थकीत

जिल्ह्यातील गावे, अंधारात राहू नये म्हणून महावितरण कंपनीकडून पथदिव्यांमार्फत वीजपुरवठा करण्याचा प्रयत्न केला जातो. जिल्ह्यात गावे, वाड्यांमध्ये ठिकठिकाणी पथदिव्यांचे जाळे पसरले आहे. या पथदिव्यांचे वीज बील ग्रामपंचायतीकडून भरले जाते. मात्र, ९६ कोटी रुपयांचे पथदिव्यांचे वीज बिल थकीत असल्याची माहिती समोर आली आहे. त्यामुळे हे बिल कोण भरणार, असा प्रश्न निर्माण झाला आहे.

## तेजस्विनी पुरस्काराने महिलांचा सन्मान

### अलिबाग प्रेस असोसिएशनच्यावतीने कार्यक्रमाचे आयोजन

**। रायगड । जिल्हा प्रतिनिधी ।**

वेगवेगळ्या क्षेत्रात काम करणाऱ्या, मात्र कधीही प्रकाशझोतात न येणाऱ्या कर्तृत्ववान महिलांचा शनिवारी (दि.७) अलिबागमध्ये सन्मान करण्यात आला. अलिबाग प्रेस असोसिएशनच्या वतीने पाच महिलांना तेजस्विनी पुरस्कार देऊन गौरविण्यात आले. रायगडच्या पोलीस अधीक्षक आंचल दलाल यांच्या प्रमुख उपस्थितीत सत्कारमूर्तींना सन्मानित करण्यात आले. जागतिक महिला दिनाचे औचित्य साधत •➤ पान २ वर



## पहिलीच्या प्रवेशासाठी वयोमर्यादा कडक

**मुंबई :** राज्यात नवीन शिक्षण धोरणांतर्गत पहिलीच्या प्रवेशासाठी वयोमर्यादा कडक करण्यात आली आहे. महाराष्ट्र सरकारने आगामी २०२६-२७ शैक्षणिक वर्षापासून पहिलीच्या प्रवेश नियमांमध्ये बदल करत फक्त सहा वर्षे पूर्ण झालेल्या मुलांनाच पहिलीत प्रवेश देण्याचा निर्णय घेतला आहे. शालेय शिक्षण विभागाच्या माहितीनुसार, ३१ डिसेंबर २०२६ पर्यंत ज्यांची सहा वर्षे पूर्ण होतील, •➤ पान २ वर

## ‘ती’च्या कष्टाने संसाराला बळ...



● जागतिक महिला दिन सर्वत्र साजरा होत असताना काही महिलांचे आयुष्य मात्र कष्टाच्या घामानेच उजळते. संसाराच्या गाड्याला खांदा देत हातात हातोडा घेऊन पतीसोबत श्रम करणारी ही स्त्री खऱ्या अर्थाने स्त्रीशक्तीचे प्रतीक ठरते. (छायाचित्र : समीर मालोदे)

### २२ महिला रक्षक तैनात

## पालिकेची सुरक्षा ‘ती’च्या हाती



**। दिपक घरत ।**
**। पनवेल ।**

जागतिक महिला दिनाच्या पार्श्वभूमीवर पनवेल महानगरपालिकेच्या विविध कार्यालयांच्या सुरक्षेची जबाबदारी महिला रक्षक समर्थपणे सांभाळत असल्याचे प्रेरणादायी चित्र समोर आले आहे. महाराष्ट्र सुरक्षा मंडळाच्या माध्यमातून एकूण २२ महिला सुरक्षा रक्षकांची नियुक्ती करण्यात आली असून, त्या पनवेल महानगरपालिका मुख्यालयासह विविध विभागीय कार्यालयांमध्ये कार्यरत आहेत.

पनवेल महापालिका मुख्यालय, विविध विभागांची कार्यालये तसेच इतर •➤ पान २ वर

> “पालिकेत सुरक्षा रक्षक म्हणून काम करताना येणाऱ्या अडचणी सोडवण्यात महिला म्हणून कधीही अडथळा येत नाही. मी स्वतः पालिकेच्या नाट्यगृहात कार्यरत आहे. या ठिकाणी प्रेक्षकांची मोठ्या प्रमाणात गर्दी होत असते. मात्र, महिलांमध्ये असलेल्या संयम आणि समतोल राखण्याच्या वृत्तीमुळे येथे होणारी गर्दी नियंत्रणात ठेवणे आम्हाला शक्य होते.”
> – मानसी चव्हाण, महिला सुरक्षा रक्षक



# कर्तृत्ववान महिलांचा सन्मान

**● श्री साई ट्रस्टचा स्तुत्य उपक्रम**

| नेरळ | प्रतिनिधी |

आंतरराष्ट्रीय महिला दिनाच्या पूर्वसंध्येला कर्जत तालुक्यातील आदिवासी आणि ग्रामीण भागात कार्य करणाऱ्या नवी मुंबई येथील श्री साई ट्रस्टकडून समाजातील कर्तृत्ववान महिलांचा सन्मान करण्यात आला. दरवर्षी महिला दिनाचे औचित्य साधून कर्तृत्ववान महिलांचा सन्मान आयोजित केला जातो, यावर्षी नऊ रत्नांचा सन्मान करण्यात आला.

श्री साई ट्रस्ट नवी मुंबई व सिल फाऊंडेशन मुंबई यांच्या माध्यमातून महिला विकास केंद्र चालवले जाते. नेरळ येथील वाल्मिकी नगर येथे चालवल्या जाणाऱ्या या केंद्राकडून महिला दिनाच्या निमित्ताने महिलांचा सन्मान केला जातो. नेरळ व नेरळ परिसरातील कर्तृत्ववान महिलांचा स्त्रीशक्ती सन्मान २०२६ या सोहळ्याला नेरळचे माजी सरपंच कर्जत पंचायत समितीचे सदस्य भगवान चंचे यांच्या उपस्थितीत देण्यात आला. या सोहळ्याला श्री साई ट्रस्टचे चेअरमन गणेश अय्यर, लक्ष्मी अय्यर, तसेच सिल फाऊंडेशन मुंबईच्या पूजा श्रीवास्तव, श्वेता, श्री साई ट्रस्टचे संचालक दिलीप घुले, राधिका घुले तसेच मनोहर हजारे, शिक्षक प्रदीप सैंदाणे, सुनील कोळी, निलेश शिनारे, तसेच आदी मान्यवर उपस्थित होते.

या सोहळ्यात वैद्यकीय क्षेत्रात नम्रता कांदळगावकर, आदर्श शिक्षिका भारती महाजन, आदर्श कायदेशीर सल्लागार ॲड. नीलम तासकर, आदर्श पोलीस कर्मचारी भावना बेलोटे, वैद्यकीय क्षेत्रात डॉ. संगिता मेढी, आदर्श समाजसेविका निमाताई उज्वल सुर्वे, आदर्श समाजसेविका लता अविनाश भगत, लघु उद्योजिका आशा मनोहर हजारे आणि शिक्षण क्षेत्रात असलेल्या जुईली रितेश भालेराव यांचा सन्मान करण्यात आली. महिला विकास केंद्राच्या वतीने महिलांसाठी अनेक कोर्स घेतले जातात. त्या कोर्समधील यशस्वी ठरलेल्या महिलांना या कार्यक्रमात प्रमाणपत्र देण्यात आले. टेलरींग, ब्युटीशियन आणि एम्ब्रॉयडरी प्रशिक्षण पूर्ण केलेल्या प्रशिक्षणार्थींना सन्मानपूर्वक मान्यवरांच्या हस्ते प्रमाणपत्र वाटप करण्यात आले.




## उसाच्या रसाला मागणी वाढली

**पनवेल :** मार्च महिन्याची उष्णता सुरू होताच शहरात उकाडा जाणवू लागला असून, नागरिक उन्हापासून बचाव करण्यासाठी विविध उपाय करताना दिसत आहेत. दुपारच्या वेळेत तापमान वाढत असल्याने रस्त्यांवरील उसांच्या रसाच्या गाड्यांवर नागरिकांची गर्दी वाढली आहे. थंडगार उसाचा रस पिण्यासाठी अनेक जण थांबत असल्याचे चित्र दिसतं आहे. विशेषतः महिला वर्ग उन्हापासून बचावासाठी स्कार्फ बांधून बाहेर पडताना दिसत आहेत. काहीजण टोपी, गॉगल तसेच रुमालाचा वापर करत आहेत. उन्हाचा तडाखा वाढल्याने अनेक नागरिक झाडांच्या सावलीचा आधार घेत थोडा विसावा घेताना दिसत आहेत. दुपारच्या वेळेत रस्ते काहीसे ओस पडत असले तरी थंड पेये व उसाच्या रसाच्या ठेल्यांवर मात्र चांगली वर्दळ पाहायला मिळत आहे.



## बेकायदेशीर ओव्हरलोड मालवाहतूक तात्काळ बंद

**●धर्मवीर वाहतूक सेनेची मागणी**

| पनवेल | प्रतिनिधी |

बेकायदेशीर ओव्हरलोड मालवाहतूक तात्काळ बंद करण्यात यावी, अशी मागणी धर्मवीर वाहतूक सेनातर्फे पनवेल प्रादेशिक परिवहन यांना निवेदनद्वारे करण्यात आली.

कळंबोली स्टील मार्केट तसेच इतर औद्योगिक परिसरात अवजड वाहनांकडून होत असलेल्या बेकायदेशीर ओव्हरलोड मालवाहतुकीमुळे रस्त्यांची मोठ्या प्रमाणावर हानी होत असून, नागरिकांच्या सुरक्षिततेलाही धोका निर्माण होत आहे. या पार्श्वभूमीवर मोटार वाहन अधिनियम १९८८ अंतर्गत कठोर कारवाई करून ही बेकायदेशीर ओव्हरलोड मालवाहतूक तात्काळ बंद करण्यात यावी, या मागणीसाठी मा. उपप्रादेशिक परिवहन अधिकारी, पनवेल जयंत चव्हाण यांना निवेदन देण्यात आले. यावेळी धर्मवीर वाहतूक सेना राज्याचे अध्यक्ष रामदास शेवाळे, उपाध्यक्ष पुण्यवंत खटकाळे, अमोल काटकर, कुलदीप सिंग, संजय साळुंखे, अण्णासाहेब जाधव व इतर पदाधिकारी उपस्थित होते.

# महिलांच्या कर्तृत्वाचा होणार गौरव

**●रेवदंडा येथे महिला दिनानिमित्त कार्यक्रम**

| अलिबाग | प्रतिनिधी |

आंतरराष्ट्रीय महिला दिनानिमित्त चौलरेवदंडा परिसरातील महिला व मुलींसाठी एक भव्य आणि उत्साहवर्धक कार्यक्रम आयोजित करण्यात आला असून, 'महिला दिन महोत्सव २०२६-पर्व २' हा विशेष कार्यक्रम रविवार, ८ मार्च रोजी सायंकाळी ६.३० वाजता रेवदंडा येथील एस.आर.टी. हायस्कूल ग्राऊंडवर पार पडणार आहे. महिलांच्या कर्तृत्वाचा गौरव, त्यांच्या आत्मविश्वासाला नवी उभारी आणि कला-संस्कृतीचा संगम घडवून आणणारा हा कार्यक्रम परिसरात आकर्षणाचा केंद्रबिंदू ठरणार आहे.

या महोत्सवातील प्रमुख आकर्षण म्हणजे रायगड जिल्ह्यातील ११ प्रसिद्ध मॉडेल्सचा मराठमोळा फॅशन शो. पारंपरिक मराठी संस्कृतीची झलक दाखवणारा हा फॅशन शो प्रथमच चौल-रेवदंडा परिसरात सादर होणार असल्याने नागरिकांमध्ये मोठी उत्सुकता निर्माण झाली आहे. या फॅशन शोचे दिग्दर्शन आंतरराष्ट्रीय कोरिओग्राफर जयेश पाटील करणार असून, मॉडेल्सचा हेअर आणि मेकअपची जबाबदारी युगाज सलोन, रेवदंडा पारनाका यांनी स्वीकारली आहे. तसेच फॅशन शोसाठी आकर्षक दागिन्यांची सजावट कलाधरा ज्वेलरीतर्फे करण्यात येणार आहे.

कार्यक्रमात मनोरंजनाची रंगत वाढवण्यासाठी झी युवा फेम प्रतिम सुतार यांचा लोकप्रिय 'होम मिनिस्टर' हा खेळकर आणि मनोरंजक उपक्रम आयोजित करण्यात आला आहे. या स्पर्धेत सहभागी होणाऱ्या महिलांना पैठणी जिंकण्याची सुवर्णसंधी मिळणार असल्याने महिलांमध्ये विशेष उत्साह दिसून येत आहे.

याशिवाय, कार्यक्रमासाठी उपस्थित राहणाऱ्या प्रत्येक महिलेला एक आकर्षक भेटवस्तू देण्यात येणार असल्याची माहिती आयोजकांकडून देण्यात आली आहे. त्यामुळे या कार्यक्रमात महिलांची मोठ्या संख्येने उपस्थिती अपेक्षित आहे. हा भव्य महिला दिन महोत्सव पल्लवी अमित म्हात्रे यांच्या पुढाकाराने आयोजित करण्यात येत असून, कार्यक्रमाचे मॅनेजमेंट हेड अमित रघुनाथ म्हात्रे आहेत. महिलांच्या सन्मानासाठी आणि त्यांच्या सहभागातून सामाजिक ऐक्य वृद्धिंगत करण्याच्या उद्देशाने हा उपक्रम आयोजित करण्यात आला असल्याचे आयोजकांनी सांगितले. चौल-रेवदंडा परिसरातील सर्व महिला आणि मुलींनी या कार्यक्रमाला आवर्जून उपस्थित राहून महिला दिनाचा उत्सव उत्साहात साजरा करावा, असे आवाहन आयोजकांनी केले आहे.

## सोनसाखळी चोरी

**पनवेल :** खारघरमधील स्पॅगेटी सोसायटीजवळील तलाव परिसरात एका ५९ वर्षीय महिलेच्या गळ्यातील सोनसाखळी चोराने हिसकावली.

करंजाडे येथे राहणाऱ्या महिला कामानिमित्त खारघर येथे आल्या होत्या. खारघरमधून पुन्हा पनवेलकडे जात असताना संबंधित स्पॅगेटी तलावाशेजारी असलेल्या लोखंडी सोसायटीसमोरील पुलावरील पायऱ्या उतरून येत असताना त्यांची सोनसाखळी हिसकावली. या सोनसाखळीची रुपये असल्याचे सांगितले जात किंमत सुमारे १ लाख २० हजार आहे. याप्रकरणी खारघर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला.

# महापौर नितीन पाटील यांचा सत्कार



| पनवेल | प्रतिनिधी |

पनवेलमधील सिद्धिविनायक कॉम्प्लेक्सच्यावतीने होळीनिमित्त आयोजित कार्यक्रमात पनवेल महानगरपालिकेचे नवनिर्वाचित महापौर नितीन पाटील यांचा सत्कार केला.

पनवेल महानगरपालिका कार्यालयासमोरील छत्रपती संभाजी महाराज मैदानाला लागूनच सिद्धिविनायक कॉम्प्लेक्स आहे. येथील रहिवासी नेहमीच समाजोपयोगी कार्यक्रमाचे आयोजन करत असतात तसेच अनोख्या पद्धतीने सण साजरे करत असतात. पारंपरिक पद्धतीने होळीचा उत्सव या ठिकाणी साजरा केला जातो. त्यानिमित्ताने रंगपंचमीपर्यंत रोज विविध कार्यक्रमांचे आयोजन केले जाते. सिद्धिविनायक कॉम्प्लेक्समधील रहिवाशांनी महापौर नितीन पाटील यांचा सत्कार केला. या सत्कार समारंभाला नगरसेवक राजू सोनी आणि माजी नगरसेविका नीता माळी यांची प्रमुख उपस्थिती होती.

सिद्धिविनायक कॉम्प्लेक्स मित्रमंडळातील महेश भालेकर, प्रसाद गायकवाड, मंदार खुर्द, संतोष खुर्द, तुषार रसाळ, सुरेश कोटरिया, राहुल भालेकर आधी सदस्य यावेळी उपस्थित होते.

## रक्तदान शिबिराचे आयोजन

**पनवेल :** इन्स्टिट्यूट ऑफ योग अ‍ॅन्ड आयुर्वेद (श्री धूतपापेश्वर आयुर्वेद ट्रस्ट संचालित) व आरोग्य सेवा समिती, पनवेल (संस्थापक, योगाचार्य स्व. पु. ल. भारद्वाज) यांच्यावतीने आणि श्री साई ब्लड सेंटर, पनवेल यांच्या सहकार्याने योगकेंद्र संस्थापक योगाचार्य स्व. पु.ल. भारद्वाज यांच्या जन्मशताब्दी दिनाचे औचित्य साधून कृतज्ञता दिन म्हणून रक्तदान शिबीर आयोजित करण्यात आले आहे. या शिबिराचे उद्घाटन जिओ प्लॅटफॉर्म लिमिटेडचे उपाध्यक्ष हर्षद आचार्य यांच्या हस्ते होणार आहे. सदर शिबीर पनवेल शहरातील लो. टिळक रोड येथील आरोग्य मंदिर येथे रविवार, ८ मार्च रोजी सकाळी ८.३० ते दुपारी १.०० दरम्यान आयोजित करण्यात आला आहे.

# पनवेल बाजारात लिंबांची आवक वाढली

| पनवेल | प्रतिनिधी |

मार्च महिन्याच्या सुरुवातीलाच तापमानात वाढ झाल्याने लिंबूला मोठी मागणी निर्माण झाली असून, दर झपाट्याने वाढले आहेत. पनवेल कृषी उत्पन्न घाऊक बाजार समितीमध्ये दररोज होणारी लिंबांची आवक घटली आहे.

महाराष्ट्रातील श्रीगोंदा परिसरातून येणारा लिंबू यंदा कमी प्रमाणात उपलब्ध असल्याने व्यापाऱ्यांची अडचण वाढली आहे. या तुटवड्याची भरपाई करण्यासाठी मद्रास (तामिळनाडू) येथून लिंबू मागवले जात आहेत. मात्र, स्थानिक महाराष्ट्रातील लिंबाचे कव्हर पातळ व रसदार असते, तर मद्रास लिंबाचे कव्हर जाड असून, त्यामधील रसाचे प्रमाण कमी असल्याचे व्यापाऱ्यांचे म्हणणे आहे.

त्यामुळे हॉटेल, सरबत विक्रेते व रसवंत्यांना जादा लिंबू वापरावे लागत आहेत. घाऊक बाजारात दर वाढल्याने किरकोळ बाजारातही लिंबू महाग झाले असून, सर्वसामान्य ग्राहकांच्या खिशावर भार पडत आहे. उन्हाळ्यात मोठ्या प्रमाणावर खपणारे लिंबू सरबत, लिंबू पाणी, शरबत व थंड पेयांचे दर वाढण्याची शक्यता आहे.

**पान १ वरून**

## जंजिरा किल्ल्यावर महिलांना मोफत प्रवेश

संख्येने येथे येतात. सामान्य दिवसांत या किल्ल्याला भेट देण्यासाठी पर्यटकांकडून पुरातत्व विभागाकडून प्रवेश शुल्क आकारले जाते. मात्र, जागतिक महिला दिनाच्या निमित्ताने हा प्रवेश पूर्णपणे माफ करून महिलांना एक वेगळी आणि प्रेरणादायी भेट देण्यात आली आहे.

याचबरोबर जिल्ह्यातील इतर महत्त्वाच्या ऐतिहासिक स्थळांवरही महिलांसाठी विशेष सवलत देण्यात आली आहे. अलिबाग येथील कुलाबा किल्ला, रायगड किल्ला तसेच कुडा लेणी येथेही महिला दिनाच्या दिवशी प्रवेश शुल्क माफ करण्यात आले आहे. त्यामुळे महिलांना या ऐतिहासिक स्थळांना भेट देण्याची आणि इतिहासाचा अनुभव घेण्याची संधी उपलब्ध झाली आहे. या उपक्रमामुळे पर्यटकांमध्ये उत्साहाचे वातावरण असून, अनेक महिलांनी किल्ले आणि ऐतिहासिक स्थळांना भेट देण्यास सुरुवात केली आहे. अधिकाधिक महिलांनी या संधीचा लाभ घ्यावा, असे आवाहन पुरातत्व विभागाचे सहाय्यक संवर्धक बजरंग येलीकर यांनी केले आहे.

## महावितरणचे १४ कोटी वीजबिल थकीत

दर महिन्याला वेळेवर वीजबिल भरण्याचे आवाहन महावितरण कंपनीकडून सातत्याने केले जाते. मात्र काही ग्राहकांकडून दर महिन्याला बिल न भरल्याने थकबाकी वाढत चालली आहे. जिल्ह्यात आतापर्यंत लहान-मोठे उद्योग करणाऱ्या ५ हजार ६४ ग्राहकांनी तब्बल चार कोटी तीस लाख रुपयांचे वीजबिल थकविले आहे. कारखानदारीचा व्यवसाय चालविणाऱ्या २८५ ग्राहकांकडून एक कोटी साठ लाख रुपयांची थकबाकी आहे. तर घरगुती वीज वापर करणाऱ्या १९ हजार ९७० ग्राहकांकडून आठ कोटी वीस लाख रुपयांचे वीजबिल थकीत आहे. अशा प्रकारे एकूण २५ हजार ३१९ ग्राहकांनी मिळून १४ कोटी एक लाख रुपयांचे वीजबिल थकविले असून, त्याचा आर्थिक भार महावितरण कंपनीवर पडत आहे. मार्चअखेरपर्यंत ही थकबाकी वसूल करण्यासाठी महावितरण कंपनीने मोहीम हाती घेतली आहे. जिल्ह्यात विविध पथके तयार करून थकीतदारांकडून वसुलीचे काम सुरू करण्यात आले आहे. गेल्या अनेक दिवसांपासून महावितरणचे कर्मचारी थकीत ग्राहकांकडून वीजबिल वसूल करण्यासाठी प्रयत्न करत आहेत. बिल न भरणाऱ्या ग्राहकांविरोधात कडक कारवाईही केली जात आहे. फेब्रुवारी महिन्यात जिल्ह्यातील ७ हजार ५८० ग्राहकांचा वीजपुरवठा खंडित करण्यात आला आहे. त्यामुळे ग्राहकांनी तातडीने वीजबिल भरून सहकार्य करावे, असे आवाहन महावितरण कंपनीचे अधीक्षक अभियंता धनराज बिक्कड यांनी केले आहे.

**रीडिंग घेणाऱ्या कर्मचाऱ्यांवर संकट**

मागील काही महिन्यांपर्यंत दर महिन्याच्या तीन तारखेला महावितरण कंपनीचे कर्मचारी घराघरांत जाऊन मीटरची रीडिंग घेत असत आणि त्या आधारे वीज वापराचे बिल देत होते. तसेच ग्राहकांना वेळेवर बिल भरण्याचे आवाहनही करण्यात येत होते. मात्र, स्मार्ट मीटर प्रणाली लागू झाल्यानंतर कार्यालयातूनच रीडिंग आणि वीज वापराची माहिती घेण्याची प्रक्रिया सुरू झाली आहे. एका क्लिकवर वीज वापराची संपूर्ण माहिती महावितरण कंपनीला उपलब्ध होत असल्याने प्रत्यक्ष जाऊन मीटर रीडिंग घेण्याची गरज कमी झाली आहे. त्यामुळे मागील सहा महिन्यांपासून मीटर रीडिंग घेणाऱ्या कर्मचाऱ्यांसमोर मोठे संकट उभे राहिले आहे. स्मार्ट मीटरमुळे त्यांच्या रोजगारावर परिणाम होण्याची शक्यता निर्माण झाली असून, या कर्मचाऱ्यांवर बेकारीची कुऱ्हाड कोसळण्याची भीती व्यक्त केली जात आहे.

**थकीतदारांवर दृष्टीक्षेप**

| वर्गवारी | ग्राहक | रक्कम ( रुपये) |
|---|---|---|
| घरगुती | १९९७० | आठ कोटी २० लाख |
| व्यापारी | ५०६४ | चार कोटी ३० लाख |
| औद्योगिक | २८५ | एक कोटी ६० लाख |
| **एकूण** | **२५,३१९** | **१४ कोटी एक लाख** |

## युद्धझळा 'गॅस'वर!

स्वयंपाक केला जात होता. मात्र चुलीच्या धुरामुळे होणाऱ्या त्रासामुळे हळूहळू गॅस सिलिंडरचा वापर वाढला. वन विभागानेही पुढाकार घेत आदिवासी वाड्यांमध्ये तसेच दुर्गम भागात मोफत गॅस सिलिंडर उपलब्ध करून दिले. तसेच केंद्र सरकारच्या उज्वला योजनेंतर्गत मोठ्या प्रमाणात गॅस कनेक्शन देण्यात आले. परिणामी, आज जिल्ह्यातील बहुतांश घरांमध्ये गॅस कनेक्शन उपलब्ध झाले असून, चुलीची जागा गॅसने घेतली आहे.

गेल्या काही वर्षांत रायगड जिल्ह्यात गॅस वापराचे जाळे मोठ्या प्रमाणात विस्तारले आहे. घरगुती वापरासोबतच हॉटेल व्यवसाय, रेस्टॉरंट, लहान-मोठी खाद्यपदार्थांची दुकाने, चहा-वडापाव स्टॉल यांसाठीही मोठ्या प्रमाणात सिलिंडरचा वापर होत आहे. पर्यटनाच्या दृष्टीने महत्त्व असलेल्या रायगड जिल्ह्यात पर्यटकांची संख्या वाढत असल्यामुळे हॉटेल, कॉटेज आणि रेस्टॉरंट व्यवसायही वाढला आहे. जिल्ह्यात दोन हजारांहून अधिक हॉटेल, कॉटेज आणि रेस्टॉरंट कार्यरत असून, त्यातून अनेकांना रोजगार उपलब्ध झाला आहे. या सर्व व्यवसायांसाठी गॅस सिलिंडर अत्यावश्यक असल्याने त्याची मागणी प्रचंड वाढली आहे.

मागील काही महिन्यांपासून घरगुती आणि व्यावसायिक गॅस सिलेंडरच्या दरात काही प्रमाणात घट झाली होती. मात्र मध्यपूर्वेतील तणाव आणि युद्धजन्य परिस्थितीमुळे आंतरराष्ट्रीय स्तरावर ऊर्जा संकट निर्माण झाले आहे. त्याचा परिणाम आता भारतातील गॅस सिलिंडरच्या दरांवरही दिसून येत आहे.

पूर्वी घरगुती गॅस सिलिंडरसाठी ग्राहकांना सुमारे ८६३ रुपये मोजावे लागत होते, तर व्यावसायिक सिलिंडरसाठी एक हजार ७४६ रुपये खर्च करावे लागत होते. मात्र, आता दरवाढीनंतर घरगुती सिलिंडरमागे ६० रुपये अधिक द्यावे लागणार असून, व्यावसायिक सिलिंडरमागे ११५ रुपये वाढ झाली आहे. त्यामुळे घरगुती सिलिंडरची किंमत ९५० रुपयांच्या पुढे जाणार असून, व्यावसायिक सिलिंडरसाठी जवळपास १,९०० रुपयांपर्यंत खर्च करावा लागणार आहे. दरवाढीसोबतच सिलिंडरच्या उपलब्धतेचाही प्रश्न निर्माण झाला आहे. गॅस सिलिंडर मिळविण्यासाठी ग्राहकांना २५ ते ३० दिवस प्रतीक्षा करावी लागू शकते, अशी माहिती समोर आली आहे. त्यामुळे पुढील काही दिवसांमध्ये सिलिंडरचा पुरवठा कसा होणार आणि गॅस कंपन्यांकडून नियमित पुरवठा कधी सुरू होणार याकडे ग्राहकांचे लक्ष लागून राहिले आहे. दरम्यान, वाढत्या मागणी आणि मर्यादित साठा यामुळे नागरिकांनी गॅसचा वापर जपून करावा, असे आवाहनही करण्यात येत आहे. युद्धाच्या छायेत वाढलेले गॅस दर आणि संभाव्य टंचाई यामुळे सर्वसामान्य नागरिकांमध्ये चिंता व्यक्त केली जात आहे.

**रिफायनरींना उत्पादनवाढीचा आदेश**

केंद्र सरकारने आवश्यक वस्तू अधिनियम लागू केला आहे. तेल कंपन्यांकडे उपलब्ध प्रोपेन आणि ब्युट्रेनचा वापर करून जास्तीत जास्त तयार करण्याचे आदेश सरकारने दिले आहेत. त्यामुळे घरगुती गॅसचा तुटवडा होणार नाही, असे सरकारने स्पष्ट केले आहे. सध्या देशातंर्गत एलपीजी गॅसचा तुटवडा नसला तरी गॅस दरवाढीने ग्राहकांच्या काळजीत भर पडली आहे.

## पहिलीच्या प्रवेशासाठी वयोमर्यादा कडक

अशा मुलांनाच २०२६-२७ या शैक्षणिक वर्षात पहिलीच्या वर्गात प्रवेश दिला जाणार आहे. या नियमांमध्ये कोणतीही तडजोड केली जाणार नसल्याचेही स्पष्ट करण्यात आले आहे.

पूर्वी प्रवेशासाठी वयोमर्यादा ३१ मार्चपर्यंत निश्चित करण्यात आली होती. मात्र, आता ती बदलून ३१ डिसेंबर करण्यात आली आहे. या संदर्भात डिसेंबर २०२५ मध्ये शासनाने आदेश जारी केला असून राज्यातील सर्व सरकारी, अनुदानित आणि खासगी शाळांना याबाबत सूचना देण्यात आल्या आहेत. मुलांचा मानसिक आणि बौद्धिक विकास योग्य पद्धतीने व्हावा तसेच त्यांना बालपणाचा आनंद घेता यावा, यासाठी योग्य वयात शिक्षण सुरू होणे गरजेचे असल्याचे शिक्षकांचे मत आहे. प्रवेशासाठी मुलाचे जन्म प्रमाणपत्र हेच वयाचा अधिकृत पुरावा मानले जाणार आहे. प्राथमिक शिक्षण म्हणजे इयत्ता पहिली ते आठवी हे वय ६ ते १४ वर्षांदरम्यानचे असल्याचे शिक्षण विभागाने स्पष्ट केले आहे.

## तेजस्विनी पुरस्काराने महिलांचा सन्मान

हा कार्यक्रम अलिबागमधील पोलीस मुख्यालयाच्या जंजिरा सभागृहात मोठ्या उत्साहात पार पडला. यावेळी जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा रायगड प्रकल्प संचालक प्रियदर्शनी मोरे, शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाच्या अधिष्ठाता डॉ. पूर्वा पाटील, अलिबाग प्रेस असोसिएशनचे अध्यक्ष प्रकाश सोनावडेकर, रायगड जिल्हा मराठी पत्रकार संघाचे जिल्हा उपाध्यक्ष नागेश कुलकर्णी, तपस्वी गोंधळी, सर्व पदाधिकारी, सदस्य तसेच वेगवेगळ्या क्षेत्रातील मान्यवर, सन्मानमूर्ती व नागरिक, महिला मोठ्या संख्येने उपस्थित होत्या. यावेळी व्यावसायिक क्षेत्रात काम करणाऱ्या वंदना विजय सुर्वे, देविका देवेंद्र पाबेकर, प्राची विवेक देवळे, पोलीस दलात वाहतूक कर्मचारी म्हणून सेवा देणाऱ्या प्रियांका अमोल घरत, तसेच अगदी कमी वयात समुद्र पार करणारी सारा अभिजीत वर्तक या महिलांना तेजस्विनी पुरस्कार देऊन गौरविण्यात आले. यावेळी पोलीस अधीक्षक आंचल दलाल म्हणाल्या की, वेगवेगळ्या क्षेत्रात काम करणाऱ्या कर्तृत्ववान महिलांना निवडून तेजस्विनी पुरस्कार देण्याचा स्तुत्य उपक्रम अलिबाग प्रेस असोसिएशनने सुरू केला आहे. यानिमित्ताने महिलांचा सन्मान करण्याचे काम असोसिशनच्या माध्यमातून होत आहे. या पुरस्कारच्या माध्यमातून महिलांना उभारी देण्याचे कार्य संस्था करीत आहे. लग्नानंतर सासरचे नाव महिलेला मिळते. परंतु आई, वडिलांकडून मिळालेल्या संस्कारातून, संगोपनातून महिला समाजात नाव उंचावण्याचे काम करीत असतात. महाराष्ट्रामध्ये सावित्रीबाई फुलेंसह अनेक महिलांचे कार्य आदर्श घेण्यासारखे आहे. या भूमीत मला पोलीस अधीक्षक म्हणून काम करण्याची संधी मिळाली. कर्मभूमी म्हणून स्वीकार केल्याचा आनंद आहे, असेही पोलीस अधीक्षक आंचल दलाल म्हणाल्या.

यावेळी ग्रामीण विकास यंत्रणा, रायगडच्या प्रकल्प संचालक प्रियदर्शनी मोरे तसेच शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाच्या अधिष्ठाता डॉ. पूर्वा पाटील यांनीदेखील मोलाचे मार्गदर्शन केले.

## पालिकेची सुरक्षा 'ती'च्या हाती

प्रशासकीय इमारतींमध्ये या महिला सुरक्षा रक्षक तैनात करण्यात आल्या आहेत. कार्यालय परिसरात शिस्त आणि सुरक्षितता राखण्याची जबाबदारी त्या अत्यंत दक्षतेने पार पाडताना दिसत आहेत. कार्यालयात येणाऱ्या नागरिकांची नोंद घेणे, आवश्यक ती सुरक्षा तपासणी करणे, संशयास्पद हालचालींवर लक्ष ठेवणे तसेच परिसरात सुव्यवस्था राखणे अशी महत्त्वाची कामे त्या नियमितपणे करत आहेत. महिला सुरक्षा रक्षक आपल्या कर्तव्याबाबत जागरूक असून नागरिकांशी नम्रतेने संवाद साधत सेवा देताना दिसतात. कार्यालयीन वेळेत नागरिकांची मोठी वर्दळ असतानाही त्या संयम राखून परिस्थिती हाताळत सुरक्षेची जबाबदारी प्रभावीपणे सांभाळत आहेत. आज महिलांनी प्रशासन, उद्योग, शिक्षण, क्रीडा, लष्कर तसेच पोलीस दलासह विविध क्षेत्रांमध्ये आपली क्षमता सिद्ध केली आहे. त्याचप्रमाणे सुरक्षा क्षेत्रातही महिलांचे योगदान दिवसेंदिवस वाढत असून, त्या पुरुषांइतक्याच सक्षमपणे आपली कर्तव्ये पार पाडत असल्याचे या उदाहरणातून स्पष्ट होत आहे. जागतिक महिला दिनाच्या निमित्ताने पनवेल महानगरपालिकेच्या सुरक्षेची धुरा सांभाळणाऱ्या या महिला सुरक्षा रक्षकांच्या कार्याचे विशेष कौतुक केले जात आहे.

**जाहीर सुचना**

तमाम जनतेस या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येते की, मौजे भादाणे, ता. अलिबाग, जि. रायगड, येथील खालील परिशिष्टात नमूद केलेली शेतजमिन मिळकत श्री. संजय महादेव भगत, यांच्या निर्वेध मालकी हक्काची असून, सदर जमिन मिळकत, सदर मिळकतीच्या विद्यमान मालकांकडून, माझ्या अशिलांनी कायमस्वरुपी खरेदी करण्याचे मान्य व कबूल केले असून, त्या आशयाची बोलणी सदर मिळकतीचे विद्यमान मालक व माझे अशिला दरम्यान झालेली आहेत. सदरील जमिन मिळकत पूर्णतः निर्वेध व बिनजोखमी असल्या बाबतचा हवाला सदर मिळकतीच्या विद्यमान मालकांनी माझे अशिलांस दिला आहे.

खालील परिशिष्टामध्ये नमुद केलेल्या मिळकतीवरील श्री. संजय महादेव भगत यांच्या मालकी हक्काचा तपास करुन, मालकी हक्क निर्वेध असले बाबतचा दाखला त्यांस देणेचा आहे. तरी ज्या व्यक्ती/संस्था यांचा परिशिष्टात नमूद मिळकतीमध्ये गहाण, दान, बक्षिस, फरोक्त, लिज, लियन, चार्ज, अन्नवस्त्र, पोटगी, करारपत्र, मृत्यूपत्र, वहिवाट या अन्य कोणत्याही तऱ्हेचा हक्क हितसंबंध असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ (चौदा) दिवसांचे आत त्यासंबंधी लेखी हरकती खालील पत्त्यावर कागदोपत्री पुराव्यानिशी पाठवाव्यात. सदरच्या मुदतीत कोणाचीही कसल्याही तऱ्हेची हरकत न आल्यास सदर मिळकत निर्वेध आहे असे समजून तसा दाखला माझे अशिलांना देण्यात येईल व माझे अशिल त्यांचा सदर मिळकतीचा खरेदी व्यवहार पूर्ण करतील व मागाहून येणारी कोणतीही हरकत माझे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही, याची कृपया सर्वांनी नोंद घ्यावी, हे सर्वांस कळावे.

**वर नमूद केलेल्या मिळकतीचे परिशिष्ट**

| मौजे | भूमापन क्रमांक | उपविभाग | क्षेत्र (हे.आर) | आकार (रु.पैसे) |
|---|---|---|---|---|
| भादाणे, ता.अलिबाग. | २९ | १ | १-४३-०० **०-४४-२० पो.ख.** १-८७-२० एकूण | ३६-०६ |

संदर्भित शेतजमिन मिळकतीमधिल श्री. संजय महादेव भगत यांच्या मालकीची ०-५०-०० ( हे.आर ) शेतजमिन मिळकत सदर नोटीसचा विषय आहे.

अलिबाग,
दिनांक : ०७/०३/२०२६.

सही/
**(ॲड.सतिश शंकर पाटील)**
हिराबाग सोसायटी, तळमजला,
फ्लॅट नं.१, अे विंग, टिळक रोड,
अलिबाग-रायगड.
खरेदीदारांचे वकील

**जाहीर नोटीस**

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, मौजे फुफादेवीपाडा स.नं. १२/१०/ब क्षेत्र १ हे. ९२.०० आर, आकार २ रूपये २५ पैसे ही मिळकत या नोटीसीचा विषय आहे. यापुढे त्या मिळकतीस 'सदर मिळकत' असे संबोधण्यात आले आहे.

सदर मिळकत ही १) हेमंत लक्ष्मण गुळेकर, २) रविंद्र लक्ष्मण गुळेकर, ३) गुरुनाथ लक्ष्मण गुळेकर, ४) निशिकांत लक्ष्मण गुळेकर, ५) वैष्णवी शरद नार्वेकर व ६) पुजा प्रसाद कळझुणकर यांच्या सामायि मालकीची आहे. ती त्यांनी आमचे अशिलांस कायम मालकी हक्काने विकत देण्याबाबत त्यांच्या लाभात सामंजस्य करार स्वाक्षरीत करुन त्यांचेकडून भरीव रक्कम अंशदान म्हणून स्विकारलेली आहे.

सामंजस्य करारामध्ये ठरलेल्या अटी व शर्तींप्रमाणे खरेदी व्यवहार पुर्ण करण्यास आमचे अशिल सदैव तयार होते व आहेत. वर नमुद केलेल्या मिळकतीच्या मालकांनी करारनाम्यामधील अटी व शर्तींची पुर्तता करणे बाकी आहे व तशी पुर्तता झाल्यानंतर आमचे अशिल ठरल्याप्रमाणे विक्री व्यवहार पुर्ण करण्यास तयार आहेत.

मात्र आमच्या अशिलांच्या असे निदर्शनास आले आहे की, मिळकतींच्या मालकांनी सदर मिळकतीचा विक्री व्यवहार अन्य त्रयस्थ इसमांबरोबर करण्याचे प्रयत्न चालविले आहेत व ते त्रयस्थ इसमांबरोबर बैठका व बोलणी करीत आहेत. वास्तविक आमचे अशिलांबरोबर सामंजस्य करार झालेला असताना व त्यांचेकडून भरीव रक्कम अंशदान म्हणून स्विकारली असताना मिळकतीचे मालकांस सदर मिळकतीचा विक्री व्यवहार त्रयस्थ इसमांबरोबर करण्याचे कोणतेही अधिकार नाहीत.

सबब, तमाम जनतेस याद्वारे कळविण्यांत येते की, कुणीही मौजे फुफादेवीपाडा स. नं. १२/१०/ब या मिळकतीविषयी अथवा तिचे कोणत्याही भागाविषयी १) हेमंत लक्ष्मण गुळेकर, २) रविंद्र लक्ष्मण गुळेकर, ३) गुरुनाथ लक्ष्मण गुळेकर, ४) निशिकांत लक्ष्मण गुळेकर, ५) वैष्णवी शरद नार्वेकर व ६) पुजा प्रसाद कळझुणकर यांचे बरोबर अथवा त्यांचेपैकी कुणाही बरोबर कोणत्याही प्रकारचा हस्तांतरणाचा व्यवहार करु नये, केल्यास तो आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही व आमचे अशिल संबंधितांवर योग्य ती कायदेशीर कारवाई करतील. हे सर्वांस कळावे.

अलिबाग
तारीख : ८/३/२०२६

सही/-
**ॲड. गणेश गोविंद पाटील**
अे/ १,२, तळमजला,
'श्रुतीसारंग' को. ऑप. हा. सोसायटी,
युनियन बँकेसमोर, ब्राह्मणआळी,
अलिबाग, रायगड, ४०२ २०१.

# नेरळ ग्रामपंचायतीतील गैरव्यवहार उघडकीस

## ● बांधकाम व्यावसायिकांना अनधिकृत नळजोडण्या ● ग्रामपंचायत प्रशासक, अधिकाऱ्यांवर कारवाईची मागणी

| नेरळ | प्रतिनिधी |

कर्जत तालुक्यातील सर्वात मोठ्या समजल्या जाणाऱ्या नेरळ ग्रामपंचायतीमध्ये पाणी वितरण व्यवस्था करताना आर्थिक गैरव्यवहार झाला असल्याचे दिसून येत आहेत. या गैरव्यवहाराबाबत नेरळ ग्रामपंचायतचे माजी सरपंच, तथा पंचायत समितीचे सदस्य भगवान चंचे आणि ग्रामपंचायत माजी सदस्य प्रथमेश मोरे यांनी हा गैरव्यवहार उघडकीस आणला असून ग्रामपंचायत प्रशासक आणि ग्रामपंचायत अधिकारी यांच्यावर कारवाई करण्याची मागणी केली आहे.



नेरळ ग्रामपंचायत हद्दीतील पाणी प्रश्न मागील काही दिवसांपासून तापला आहे. गावातील सामान्य नागरिकांना पाण्यासाठी वणवण करावी लागत असताना, दुसरीकडे बिल्डरांना बेकायदेशीरपणे आणि देणगी किंवा विनापावती पाणी जोडणी देऊन लाखो रुपयांचा भ्रष्टाचार केल्याचा खळबळजनक आरोप स्थानिक नेत्यांनी केला आहे. ममदापूर ही स्वतंत्र ग्रामपंचायत असून या ग्रामपंचायतीचे स्वतंत्र नळपाणी वीज आहे. असे असताना ममदापूर हद्दीतील काही बिल्डरांना नियमबाह्य पद्धतीने चार पाणी कनेक्शन देण्यात आली आहेत. विशेष म्हणजे, या कनेक्शनसाठी ग्रामपंचायतीकडे कोणतीही अधिकृत पावती किंवा पाणी जोडणी दिली असल्याची नोंद नाही. संबंधित बिल्डरांनी काही लाख रुपये घेतले असल्याचे बोलले जात असून ग्रामपंचायतीमध्ये त्या नळजोडण्यांची कोणतीही नोंद नाही. तसेच, कोणत्याही प्रकारचे निधी किंवा देणगी यांच्या खात्यात नोंद झालेली नाही. हा गैरव्यवहार करणाऱ्या ग्रामपंचायत मधील अधिकारी वर्गावर आणि संबंधित बिल्डर यांच्याकडून कशाआधारे पाणी जोडणी घेतली, याची माहिती कर्जत पंचायत समितीचे सदस्य भगवान चंचे यांनी उपस्थित केला.

तुलसी बिल्डर्ससारख्या मोठ्या प्रकल्पांना २५ पाणी जोडण्या देण्यात आल्या आहेत. नेरळ गावातील अनेक भागांत, मोहाचीवाडी आणि खांडा पिण्याच्या पाण्याची गैरसोय आहे. मात्र, हेच ग्रामपंचायत प्रशासन पाणी जोडण्या देऊन स्थानिक लोकांच्या हक्काचे पाणी पळवत असल्याचे दिसून आले आहे.

### वरिष्ठ स्तरावरून चौकशीची मागणी

या सर्व गोंधळानंतर ग्रामपंचायत प्रशासनाने संबंधित बेकायदेशीर मोटारी जप्त करण्याचे आणि दोषींवर कारवाई करण्याचे आश्वासन दिले आहे. मात्र, नेरळमधील हा पाणी घोटाळा आता तालुक्यात चर्चेचा विषय ठरत असून, वरिष्ठ स्तरावरून याची चौकशी करण्याची मागणी ग्रामस्थांकडून होत आहे. हा घोटाळा करणारे आणि स्वतःची तुंबडी भरणारे नामानिराळे राहणार नाहीत ना? असा प्रश्न उपस्थित होत असून नेरळ ग्रामपंचायतीमध्ये आणखी कोणता घोटाळा बाहेर निघतो, याकडे सर्वांचे लक्ष लागून राहिले आहे. मात्र, बेकायदा नळजोडणी घेणाऱ्या बिल्डर लॉबीवर कारवाई होणार का? याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

या सर्व बाबतीत कर्जत पंचायत समितीचे सदस्य भगवान चंचे आणि ग्रामपंचायत माजी सदस्य प्रथमेश मोरे यांनी नेरळ ग्रामपंचायतीमध्ये जाऊन प्रशासक सुजित धनगर आणि ग्रामपंचायत अधिकारी अरुण कार्ले यांची भेट घेऊन अनधिकृतपणे दिलेल्या नळजोडण्या यांची माहिती घेतली. त्यावेळी मागील काही महिन्यांत अनेक नळजोडण्या देण्यात आल्या असून त्यांची कोणतीही नोंद ग्रामपंचायतीकडे नाही. त्याचवेळी ग्रामपंचायतीकडे पूर्वी अनेक वर्षांपासून असलेले देणगी पावती पुस्तक यांत कोणत्याही प्रकारचे देणगी यांच्या नोंदी नाहीत. एकीकडे नेरळ ग्रामपंचायतीमध्ये भ्रष्टाचार सुरू असताना दुसरीकडे ग्रामपंचायत कर्मचाऱ्यांचे पगार देण्यासाठी पैसे नसल्याचे कारण सांगितले जात आहे. याची चौकशी झाली पाहिजे, अशी मागणी भगवान चंचे यांनी केला.



● शिवजयंतीनिमित्त अलिबागमधील छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्याला शुक्रवारी (दि.६) माजी नगराध्यक्ष तथा विद्यमान नगरपरिषदेचे बांधकाम सभापती प्रशांत नाईक आणि उपनगराध्यक्षा ॲड. मानसी म्हात्रे यांनी पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. (छायाचित्रः समीर मालोदे)



● कुलाबा क्रीडा प्रबोधिनीच्यावतीने किल्ले विशालगड ते अलिबाग 'शिवज्योत पदयात्रा २०२६'चे आयोजन करण्यात आले होते. यावेळी ३२६ किलोमीटरचे अंतर २२ तास ३ मिनिटांत धावून पूर्ण करण्यात आले. या पदयात्रेत कुलाबा क्रीडा प्रबोधनीचे प्रमुख यतीराज पाटील आणि त्यांचे ६० विद्यार्थी सहभागी झाले होते. ही शिवज्योत अलिबागमध्ये आल्यावर छत्रपती शिवाजी महाराज चौकात स्वागत करण्यात आले. यावेळी रघुजी राजे आंग्रे, उप नगराध्यक्षा मानसी म्हात्रे, प्रवीण ठाकूर व नगरसेवक हुनी ठाकूर आदी उपस्थित होते. (छायाचित्रः समीर मालोदे)

## 'प्रथम प्रवेश दिन' उत्साहात

**श्रीवर्धन :** एकात्मिक बाल विकास सेवा योजनेअंतर्गत बागमांडले बिटमधील कोंढे तर्फे श्रीवर्धन येथील अंगणवाडी केंद्रात 'प्रथम प्रवेश दिन' मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी अंगणवाडीत नव्याने दाखल झालेल्या चिमुकल्या विहर्ष अविनाश बांद्रे याचे औक्षण करून जंगी स्वागत करण्यात आले. या विशेष दिनानिमित्त अंगणवाडी केंद्र आकर्षकरीत्या सजवण्यात आले होते. अंगणवाडी सेविका रजनी कासरुंग यांनी विहर्षचे औक्षण करून त्याला टिळा लावून स्वागत केले. तसेच त्याला शैक्षणिक खेळणी व भेटवस्तू देत अंगणवाडीतील शैक्षणिक प्रवासासाठी शुभेच्छा देण्यात आल्या.

# माथेरान नगरपरिषदेचा अनागोंदी कारभार

## मुख्याधिकारींकडे चौकशीची मागणी

| नेरळ | प्रतिनिधी |

माथेरान नगरपरिषद हद्दीत प्रशासक काळात घेण्यात आलेल्या निर्णयांमुळे माथेरान नगरपरिषदेची आर्थिक स्थिती कोलमडली आहे. गरज नसताना अनेक निर्णय घेऊन केलेल्या कारभाराची शासनाने चौकशी करावी, अशी मागणी विरोधी पक्षनेते सीताराम कुंभार यांनी कोकण आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांची भेट घेऊन निवेदनाद्वार केली आहे.



माथेरान नगरपरिषदेचे मुख्याधिकारी यांच्या भ्रष्ट आणि अनागोंदी कारभाराबाबत माथेरान नगरपरिषद मधील विरोधी पक्षाने आवाज उठवला आहे. माथेरान नगरपरिषदेत दोन वर्षे प्रशासकल राजवट होती आणि या कालावधीत मोठ्या प्रमाणात चुकीची कामे झाली असल्याचा शहरात बोलले जात आहे. त्यात हेरिटेज वस्तूंना बांधकाम परवानगी, पालिकेच्या हेरिटेज कार्यालयाची आपत्कालीन म्हणून करण्यात येत असलेली दुरुस्ती, पालिकेने प्रशासक काळात खरेदी केलेले स्वच्छता गृह आणि पाण्याचे शुद्धीकरण संच अशा अनेक प्रकरणी घेण्यात आलेल्या निर्णयामुळे माथेरान नागरपरिषद चर्चेत आहे. त्या विरुद्ध माथेरानमधील विरोधी पक्षाने जाब विचारला आहे. मात्र, रायगड जिल्हाधिकारी यांच्याकडून कोणत्याही प्रकारची चौकशी होत नसलेल्या माथेरान नगरपरिषद मधील विरोधी पक्षाच्या नगरसेवक यांनी कोकण आयुक्त कार्यालयात जाऊन डॉ. विजय सूर्यवंशी यांना भेटून निवेदन दिले आणि संबंधित विषयाची चर्चा केली.



# विविध मागण्यांसाठी खा. बाळ्यामामांची भेट

| नेरळ | प्रतिनिधी |

कर्जत तालुक्यातील विविध प्रलंबित प्रश्न आणि आगरी समाज संघटनेच्यावतीने करण्यात आलेल्या ठरावांवर चर्चा करण्यासाठी संघटनेच्या पदाधिकाऱ्यांनी खा. सुरेश तथा बाळ्यामामा म्हात्रे यांची सदिच्छा भेट घेतली. यावेळी हुतात्म्यांचा सन्मान आणि रेल्वे स्थानकांच्या नामकरणाबाबत खासदारांनी सकारात्मक प्रतिसाद देत पाठपुरावा करण्याचे आश्वासन दिले आहे.

क्रांतिकारक हुतात्मा भाई कोतवाल यांच्या बलिदान दिनी माथेरान येथील स्मारकावर, तर हुतात्मा हिराजी पाटील यांना माणिवली येथील स्मारकावर शासकीय मानवंदना देण्यात यावी, असा महत्त्वपूर्ण ठराव संघटनेच्या वतीने सादर करण्यात आला. यावर तातडीने पावले उचलत, राज्य सरकारच्या गृह विभागाला पत्र पाठवून सकारात्मक निर्णय घेण्याचे आश्वासन खा. म्हात्रे यांनी दिले. तसेच, कर्जत तालुक्यातील रेल्वे प्रवाशांच्या आणि अस्मितेच्या दृष्टीने महत्त्वाच्या मागण्यांवर कर्जत रेल्वे स्थानकाला हुतात्मा भाई कोतवाल यांचे नाव व नेरळ जंक्शन स्थानकाला हुतात्मा हिराजी पाटील यांचे नाव देण्यात यावे. हे दोन्ही विषय आगामी काळात नवी दिल्ली येथे रेल्वे मंत्रालयाकडे पाठपुरावा करून मार्गी लावण्याचे आश्वासन त्यांनी दिले. हुतात्मा हिराजी पाटील यांच्या नावाचे टपाल तिकीट काढण्यासाठी केंद्रीय दूरसंचार विभागाकडे पाठपुरावा करणार असल्याचेही त्यांनी नमूद केले. यावेळी कर्जत तालुका आगरी समाज संघटनेचे अध्यक्ष संतोष पेरणे, उपाध्यक्ष शिवाजी कराळे, संचालक अंकुश शेळके आणि संदीप म्हसकर उपस्थित होते.

# महाआरोग्य शिबिराचे आयोजन

| पनवेल | प्रतिनिधी |

जागतिक महिला दिनाचे औचित्य साधून शेतकरी कामगार पक्ष आणि पनवेल महानगरपालिकेच्या नगरसेविका महिला बालकल्याण समितीच्या सदस्य मनिषा म्हात्रे यांच्या तर्फे रविवारी (दि.८) मोफत आरोग्य तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. प्राचीन हेल्थकेअर मल्टीस्पेशालिटी हॉस्पिटल आणि डॉ. मंगेश डाके यांच्या विशेष सहकार्याने हे शिबीर पार पडणार असून, परिसरातील नागरिकांना मोफत आरोग्य सेवा देण्याचा संकल्प करण्यात आला आहे. हे शिबीर धाकटा खांदा येथील गणेश विद्यामंदिरात सकाळी साडेनऊ ते दुपारी २:०० या वेळेत संपन्न होणार आहे. या शिबिरामध्ये तज्ज्ञ डॉक्टरांचा सल्ला, रक्तदाब तपासणी, उंची व वजन मोजणी, आणि रँडम ब्लड शुगर तपासणी यांसारख्या प्राथमिक चाचण्या मोफत केल्या जाणार आहेत. तसेच, डॉक्टरांच्या सल्ल्यानुसार आवश्यकतेनुसार ईसीजी, पीएफटी या चाचण्यांसह मोफत औषध वाटप देखील करण्यात येणार आहे. विशेष म्हणजे, शासनाच्या विविध योजनांचा लाभ मिळवून देण्यासाठी पात्र लाभार्थ्यांना यावेळी आयुष्मान कार्ड देखील काढून देण्यात येणार आहे. नगरसेविका मनिषा म्हात्रे यांनी, शिबिराचा लाभ घेऊ इच्छिणाऱ्या नागरिकांनी आपले जुने हॉस्पिटल रिपोर्ट, मूळ आधार कार्ड (मोबाईल नंबर लिंक असलेले) आणि रेशन कार्ड सोबत आणावे. महिला दिनानिमित्त आयोजित या सामाजिक उपक्रमाचा जास्तीत जास्त नागरिकांनी लाभ घ्यावा, असे आवाहन केले आहे.

## महिलांची आरोग्य तपासणी

**रसायनी :** रसायनी-पाताळगंगा अतिरीक्त एमआयडीसी परिसरातील चावणे येथील कोकुयो कॅमलिन कंपनीत महिला दिनाचे औचित्य साधून शनिवारी (दि.७) विविध कार्यक्रम पार पडले. यावेळी येथील महिलांची आरोग्य तपासणी करण्यात आली. स्त्रीरोगतज्ज्ञ डॉ. पारुल साठे यांनी आरोग्य तपासणी करुन योग्य मार्गदर्शन केले. महिला पोलिस जाधव यांनी आपत्कालीन परिस्थिती आणि उपलब्ध प्रतिसाद यंत्रणेबद्दल देखील स्पष्टीकरण दिले.

चित्रलेखा पाटील यांचा पुढाकार | नगरसेवक संतोष जंगम यांचा पाठपुरावा

# आदिवासी बांधवांना मिळणार पक्की घरे

| खोपोली | प्रतिनिधी |

खालापूर नगरपंचायत हद्दीतील आदिवासी बांधव आजही कुडा मातीच्या घरात राहत आहेत. पावसाळ्यात आपला निवारा टिकविण्यासाठी त्यांना मोठी कसरत करावी लागते. ही समस्या लक्षात घेऊन स्थानिक नगरसेवक संतोष जंगम आणि माजी नगराध्यक्षा शिवानी जंगम यांनी शेकापक्षाच्या महाराष्ट्र प्रवक्त्या चित्रलेखा पाटील यांचाकडे मागणी केली. त्यांच्याकडून सीएसआर फंडातून प्राथमिक स्वरूपात शिरवलीवाडीतील ७ आदिवासी बांधवांना पक्की घरे बांधून दिली जाणार आहेत.



शेतकरी कामगार पक्षाचे कर्जत-खालापूर विधानसभा अध्यक्ष संतोष जंगम हे दांडवाडी, शिरवलीवाडीतील प्रभागातून नगरसेगवक म्हणून निवडणूने आले आहेत. त्यांनी आदिवासी भागत कॉंक्रीट रस्ते, पाणी, वीज अशा मूलभूत सुविधा पोहोचवून आदिवासी वाड्यांचा कायापालट केली आहे. परंतु, आजही आदिवासी बांधव कुडा मातीच्या घरात राहत आहेत. त्यांना पक्के घरे बांधली पाहिजे, असे स्वप्न संतोष जंगम आणि माजी नगराध्यक्षा शिवानी जंगम यांचे आहे. त्यासाठी शेकापच्या राज्य प्रवक्त्या चित्रलेखा पाटील यांची मदत घेत सीएसआर फंडातून आदिवासी बांधवांना पक्की घरे बांधण्यात येणार आहेत. त्यातील पहिले २०१५ फुटाचे स्लँबचे घर मठवाडी येथे बांधण्यात आले आहे. त्याचप्रकारे इतर सात घरे शिवलीवाडीत बांधण्यात येणार आहेत. त्यामुळे आदीवासी बांधवांनी संतोष जंगम यांच्यासह शेकापचे आभार व्यक्त केले आहेत.

नगराध्यक्ष रोशना मोडवे यांच्या हस्ते शनिवारी (दि.७) भूमिपूजन करून कामाचा शुभारंभ करण्यात आला आहे. यावेळी घरांच्या भूमिपूजनासाठी नगराध्यक्ष रोशना मोडवे, उपनगराध्यक्ष किशोर पवार, माजी नगराध्यक्षा शिवानी जंगम, माजी उपनगराध्यक्ष तथा स्थानिक नगरसेवक संतोष जंगम, नगरसेवक सचिन कांबळे, दिनेश फराळ, निशान पानपाटील, पांडुरंग मगर, नगरसेविका ममता चौधरी, ऋषिकेश चालके आणि आदिवासी बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

> "आदिवासी समाज नेहमीच आमच्या पाठीशी खंबीरपणे उभा असतो, म्हणूनच त्यांना मूळ समाजाच्या प्रवाहात आणणे हे आमचं मुख्य कर्तव्य आहे. शेकापच्या राज्य प्रवक्त्या चित्रलेखा पाटील यांच्या पुढाकारातून मठवाडीत एक प्रयोगिक तत्वावर घर बांधले आहे. तशीच सात घरे बांधून देण्यासाठी शुभारंभ केला आहे. ही चांगल्या दर्जाची स्लँबची घरे आहेत. त्यामध्ये शौचालय, हॉल, स्वतंत्र स्वयंपाकघर असणार आहे. हे घर तयार झाल्यावर आदिवासी बांधवांचा आनंद पाहून खऱ्या अर्थाने मानसिक समाधान प्राप्त होणार आहे."
>
> – शिवानी जंगम, माजी नगराध्यक्षा, खालापूर

## निवडक



### अलिबागेत शिवकालीन शस्त्रांचे प्रदर्शन

**अलिबाग :** छत्रपती शिवाजी महाराज यांची जयंती शुक्रवारी (दि.६) अलिबागमध्ये साजरी करण्यात आली. या जयंतीनिमित्त अलिबाग शहरातील छत्रपती शिवाजी महाराज चौक येथे भव्यदिव्य असे शिवकालीन शस्त्रांचे प्रदर्शन भरविण्यात आले होते. हा कार्यक्रम मावळा प्रतिष्ठानच्यावतीने आयोजित करण्यात आला होता. या प्रदर्शनाला तरुणांसह वेगवेगळ्या क्षेत्रातील दिग्गज मंडळींकडून उत्स्फुर्त प्रतिसाद मिळाला. या निमित्ताने अलिबागकरांना शिवाजी महाराजांच्या काळातील शस्त्रसाठ्याची माहिती मिळाली. या प्रदर्शनाला शुक्रवारी सायंकाळी अलिबाग नगरपरिषदेचे वीज व बांधकाम सभापती प्रशांत नाईक यांच्यासह ॲड. प्रवीण ठाकूर, पोलीस निरीक्षक किशोर साळे, नगरसेवक ॲड. ऋषीकेश माळी, समीर ठाकूर, अभय म्हामुणकर यांच्यासह अनेकांनी भेट दिली. या निमित्ताने अलिबागकरांना छत्रपती शिवाजी महाराजांच्या काळातील तलवार, भाले, तोफा, दांडपट्टा अशा अनेक प्रकारच्या शस्त्रांना प्रत्यक्षात पाहण्याची संधी मिळाली. या प्रदर्शनाला हजारोजणांनी भेट दिली. त्यांनी शिवकालीन शस्त्रांची ओळख पटवून घेतली. त्यांची माहिती आत्मसात करून घेतली.

### नगदी पिकांचे मोठे नुकसान

**माणगाव :** कोकणातील बागायतदार शेतकरी यंदाच्या हंगामात मोठ्या संकटात सापडले आहेत. बदलत्या हवामानाचा फटका बसल्यामुळे आंबा, काजू, नारळ, फणस आणि कोकम या कोकणातील प्रमुख नगदी पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. वर्षभर कष्ट घेऊन उभ्या केलेल्या बागांवर निसर्गाच्या अवकृपेने पाणी फिरल्याने शेतकऱ्यांवर आर्थिक संकट कोसळले आहे. या पार्श्वभूमीवर शासनाने नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना एकरी किमान ५ लाख रुपयांची नुकसानभरपाई जाहीर करावी, अशी जोरदार मागणी कोकणातील शेतकरी, बागायतदार आणि विविध संघटनांकडून करण्यात येत आहे. यंदा हिवाळ्यानंतर अचानक बदललेले हवामान, अवकाळी पाऊस, वाढलेली आर्द्रता, धुके आणि तापमानातील अस्थिरता यामुळे आंबा आणि काजू बागांवरील मोहोर मोठ्या प्रमाणात गळून पडला. अनेक ठिकाणी बागांमध्ये भरघोस मोहोर दिसत असतानाच काही दिवसांतच तो झाडाखाली पडल्याने शेतकऱ्यांच्या आशा धुळीस मिळाल्या. फळधारणा कमी झाल्याने उत्पादनात मोठी घट होणार असल्याचे चित्र स्पष्ट झाले आहे. कोकणातील रायगड, रत्नागिरी आणि सिंधुदुर्ग या जिल्ह्यांमध्ये आंबा-काजू बागायती हे शेतकऱ्यांचे मुख्य उत्पन्नाचे साधन आहे. अनेक शेतकरी वर्षभर मेहनत करून बागांची निगा राखतात, औषध फवारणी, खत, मजुरी आणि देखभालीसाठी मोठा खर्च करतात. मात्र, यावर्षी निसर्गाच्या अनिश्चिततेमुळे त्यांच्या मेहनतीचे फळ मिळण्याऐवजी मोठे आर्थिक नुकसान सहन करावे लागत आहे. फक्त आंबा आणि काजूच नव्हे तर नारळ, फणस आणि कोकम या पारंपरिक पिकांवरही याचा परिणाम झाला आहे. काही भागांत फळधारणा अत्यंत कमी झाली असून अनेक बागांमध्ये रोगांचा प्रादुर्भाव वाढल्याने उत्पादन घटले आहे.



### सुधागडात विकासकामांचा धडाका

**पाली/गोमाशी :** सुधागड तालुक्याचा विकास डोळ्यासमोर ठेवून शेतकरी कामगार पक्षाचे जिल्हा चिटणीस सुरेश खैरे यांच्या माध्यमातून विकास कामांचा घडाका सुरू आहे. नुकतेच जिल्हा परिषद शेष फंडातून ठाणाले येथे स्मशानभूमीचे भूमी पूजन व जिल्हा वार्षिक नियोजन फंडातून नवीन अंगणवाडीचे उद्घाटन करण्यात आले. सुरेश खैरे यांच्यासह किसनराव उमटे, मारुती फाटे, मोहिनी खामकर, मिलिंद शेळके, महेश जाधव, बाबुराव जाधव, बबन फाटे, विष्णू खंडागळे, विरेश्वर ठोंबरे, सुधीर साखरले, यतीन पटेल, सुभाष फाटे, चंद्रकांत पायगुडे, रवी ठाकूर, निलेकर नाना, रामा पवार, दत्तू पवार, सुवर्णा फाटे, वृषाली फाटे, धनश्री पांडव व ग्रामस्थ मंडळ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### खालापुरात टॉवर बॅटरी चोरीचा पर्दाफाश



**खोपोली :** खालापुरमध्ये घडलेल्या टॉवर बॅटरी चोरीच्या प्रकरणाचा स्थानिक गुन्हे अन्वेषण विभागाने (एलसीबी) यशस्वी उलगडा करत तिघांना अटक केली आहे. पोलिसांनी या कारवाईदरम्यान चोरीसाठी वापरण्यात आलेला सुमारे ७ लाख रुपये किंमतीचा टाटा कंपनीचा टेम्पोही जप्त केला आहे. खालापूर पोलीस ठाण्यात दोन गुन्हे दाखल करण्यात आले होते. या गुन्ह्यांचा तपास सुरू असताना पोलिसांनी घटनास्थळ तसेच परिसरातील सीसीटीव्ही फुटेजची बारकाईने पाहणी केली. फुटेजमध्ये संशयास्पद वाहनाची हालचाल दिसून आल्याने त्या वाहनाचा माग काढण्यात आला. पुढील तपासात गोपनीय बातमीदारांच्या मदतीने संशयितांचा शोध घेऊन तीन जणांना ताब्यात घेण्यात आले. अविनाश मनोहर चव्हाण (२६), रोहित मनोहर चव्हाण (२५) आणि विजय सुरेश चव्हाण (२६) अशी अटक करण्यात आलेल्या आरोपींची नावे आहेत. तसेच, तपासादरम्यान चोरीसाठी वापरण्यात आलेला सुमारे ७ लाख रुपये किंमतीचा टाटा कंपनीचा टेम्पो पोलिसांनी जप्त केला आहे. दरम्यान, परिसरात अशा प्रकारची संशयास्पद हालचाल आढळल्यास नागरिकांनी तात्काळ पोलिसांना माहिती द्यावी, असे आवाहन पोलिसांनी केले आहे.

# शिवरायांच्या जयघोषाने जिल्हा दुमदुमला

**छत्रपती शिवाजी महाराजांची ३९६वी जयंती तिथीप्रमाणे म्हणजेच फाल्गुन वद्य तृतीयेच्या दिवशी शुक्रवारी (दि.५) संपूर्ण जिल्ह्यात साजरी करण्यात आली. यावेळी जिल्ह्यातील विविध ठिकाणी शिवरायांच्या प्रतिमेला व स्मारकाला मान्यवरांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून मानवंदना देण्यात आली. यावेळी 'जय भवानी, जय शिवराय'च्या जयघोषाने संपूर्ण जिल्हा दुमदुमून निघाला होता. तसेच, विविध कार्यक्रमांचेदेखील आयोजन करण्यात आले होते.**



(छायाचित्र: गणेश चोडणेकर)

## मुरूडमध्ये शिवरायांना मानवंदना

**। आगरदांडा । प्रतिनिधी ।**

छत्रपती शिवाजी महाराजांच्या जयंतीचे औचित्य साधून मुरूड दत्तवाडी येथील महाराजांच्या पुतळ्याला प्रकाश गोजी यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून मानवंदना देण्यात आली. यावेळी 'जय भवानी', 'जय शिवाजी', 'हर हर महादेव', 'धर्मवीर संभाजी महाराज की जय' असा जयघोष करण्यात आला. तसेच, विविध कार्यक्रम देखील आयोजित करण्यात आले होते. यावेळी नगराध्यक्षा आराधना दांडेकर, नगरसेवक आदेश दांडेकर, रुपेश जामकर, माजी नगरसेवक प्रमोद भायदे, नगरसेविका प्रमिला माळी, अमित गोजी, राजेश मुळेकर, सुभाष माळी, चंद्रकांत अपराध, नगरसेविका देवायानी गुरव, श्रद्धा अपराध, प्रशांत कासेकर, विजय वाणी, मिलिंद भगत, सुभेदार, विजय सुर्वे, अच्युत चव्हाण, मंगेश मोहिते आदिंसह शिवप्रेमी उपस्थित होते.

## शिवभक्त प्रतिष्ठानतर्फे शिवजयंती साजरी

**। सारळ । प्रतिनिधी ।**

सारळ-रेवस गावात शिवभक्त प्रतिष्ठानतर्फे सार्वजनिक शिवजयंती उत्सव मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. प्रतिष्ठानचे संस्थापक सुशील भोसले यांच्या पुढाकारातून हा उत्सव यंदाही विविध सामाजिक, सांस्कृतिक आणि धार्मिक कार्यक्रमांनी पार पडला. उत्सवाची सुरुवात सकाळी छत्रपती शिवाजी महाराजांच्या मूर्तीचे पूजन करून करण्यात आली. त्यानंतर उद्‌घाटन सोहळ्यासह विविध धार्मिक कार्यक्रम पार पडले. दुपारनंतर आयुर्वेदिक आरोग्य शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. रात्री 'शिवगर्जना मावळ्यांची' हा संगीताचा बहारदार कार्यक्रम पार पडला.



## धारवलीत शिवजयंती उत्साहात साजरी

**। श्रीवर्धन । प्रतितनिधी ।**

श्रीवर्धन तालुक्यातील धारवली गावामध्ये छत्रपती शिवाजी महाराज यांची जयंती अत्यंत उत्साहात, भक्तिभावाने आणि जल्लोषात साजरी करण्यात आली. या निमित्ताने संपूर्ण गावात उत्सवाचे वातावरण निर्माण झाले होते. गावातील ग्रामस्थ तसेच तरुण मोठ्या संख्येने उपस्थित राहून शिवरायांना अभिवादन केले. सकाळी छत्रपती शिवाजी महाराजांच्या प्रतिमेचे पूजन करून पुष्पहार अर्पण करण्यात आले. त्यानंतर शिवजयंतीच्या निमित्ताने गावातून शिवरायांच्या प्रतिमेची भव्य मिरवणूक काढण्यात आली. मिरवणुकीदरम्यान घरोघरी महिलांनी औक्षण करून शिवरायांच्या प्रतिमेचे पूजन केले. संपूर्ण गाव ढोल-ताशांच्या गजरात आणि 'जय भवानी, जय शिवाजी'च्या घोषणांनी दुमदुमून गेले होते. या कार्यक्रमाला सुजित तांदळेकर यांच्यासह माजी सरपंच जगन्नाथ चाळके, मुंबई कुणबी समाज माजी अध्यक्ष सुभाष घोलप यांच्यासह पदाधीकारी व नागरिक उपस्थित होते.

## शिवजयंतीनिमित्त कामगारांचा सन्मान

**। रेवदंडा । विशेष प्रतिनिधी ।**

श्रमिक सेनेच्यावतीने साळाव येथील ग्रीन स्टील लिमिटेड येथे छत्रपती शिवाजी महाराजांच्या जयंतीचा उत्सव साजरा करण्यात आला. श्रमिक सेनेचे अध्यक्ष मा. खा. डॉ. संजीव नाईक यांच्या हस्ते कार्यक्रमाला सुरुवात झाली. या उत्सवात श्रमिकांच्या कर्तृत्वाला प्रोत्साहन देण्यासाठी श्रमिक सेना युनियनतर्फे 'बेस्ट वर्कर अवॉर्ड' प्रदान करण्यात आले. साळाव येथील काही निवडक कामगारांना हे पुरस्कार मिळाले. कामगारांच्या सातत्यपूर्ण मेहनतीमुळे ग्रीन स्टील लिमिटेडसारख्या मोठ्या कंपनीला यश मिळत असल्याचे खा. नाईक यांनी नमूद केले. कामगारांच्या कौशल्यामुळे उत्पादन वाढते, सुरक्षित वातावरण तयार होते आणि कंपनीचा दर्जा उंचावतो, असेही ते म्हणाले.




## निवडक



### रातवड विद्यालयात शिवजयंती साजरी

**माणगाव:** तालुक्यातील छत्रपती शिक्षण मंडळ कल्याण संचलित माध्यमिक विद्यामंदिर रातवड विद्यालयात तिथीनुसार शुक्रवारी छत्रपती शिवाजी महाराज जयंती मोठ्या उत्साहात व भक्तिमय वातावरणात साजरी करण्यात आली. कार्यक्रमाच्या प्रारंभी छत्रपती शिवाजी महाराज यांच्या प्रतिमेचे पूजन व पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. विद्यालयाचे मुख्याध्यापक, शिक्षकवृंद तसेच विद्यार्थ्यांच्या उपस्थितीत कार्यक्रमाची सुरुवात झाली. विद्यार्थ्यांनी शिवचरित्रावर आधारित विविध सांस्कृतिक कार्यक्रम सादर करून उपस्थितांची मने जिंकली. त्यामध्ये शिवकालीन पराक्रम वर्णन करणारे जोशपूर्ण पोवाडे, शिवजन्माचा पाळणा, प्रेरणादायी गीत सादरीकरण तसेच लाठी-काठीचे थरारक प्रात्यक्षिक यांचा समावेश होता. विद्यार्थ्यांच्या प्रभावी सादरीकरणामुळे संपूर्ण परिसर शिवभक्तीच्या जयघोषाने दुमदुमून गेला.




### 'जागर दुर्गांचा, ध्यास गडकोट संवर्धनाचा'

**चिरनेर :** जाणता राजा प्रतिष्ठान पागोटे-उरण व दुर्ग अभ्यासक कैलासराजे घरत यांच्यावतीने 'जागर दुर्गांचा, ध्यास गडकोट संवर्धनाचा' कार्यक्रम नवघर येथील रा.जि.प. शाळेत मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. या कार्यक्रमाला मिलिंद खारपाटील व विजय गायकर हे पाहुणे म्हणून उपस्थित होते. यावेळी त्यांच्या हस्ते दीपप्रज्वलन व छत्रपती शिवाजी महाराजांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करण्यात आला. सूत्रसंचालन विवेक चंद्रकांत पाटील यांनी केले. यावेळी उरण पंचायत समितीचे माजी उपसभापती महादेव बंडा, अविनाश म्हात्रे, सुनील जोशी, सामाजिक कार्यकर्ते मितेश पाटील, कौशिक ठाकूर, विशाल ठाकूर, रोशन ठाकूर, संजीव पाटील, भरत पाटील, उपसरपंच विश्वास तांडेल आदी मान्यवर उपस्थित होते. यावेळी शिवकन्या ओवी कैलासराजे घरत हिने पहाडी आवाजात गारद दिली. दुर्ग अभ्यासक पत्रकार कैलासराजे घरत यांनी विद्यार्थी आणि मान्यवर यांच्यासोबत ध्येय मंत्र आणि गडकोट प्रतिज्ञा घेतली व गडकील्यांची माहिती देत इतिहास जागविला.

## नागोठण्यात शिवज्योतीचे उत्साहात स्वागत



(छायाचित्र : महेश पवार)

**। नागोठणे । प्रतिनिधी ।**

नागोठणे शहर व ग्रामीण विभागातील गावांत शिवजयंतीचे आयोजन करण्यात आले होते. त्यानिमित्त येथील शिवप्रेमी नागरिक मोठ्या संख्येने गुरुवारी (दि.५) सायंकाळी शिवज्योत आणण्यासाठी रायगड किल्ल्यावर गेले होते. त्यांचे शुक्रवारी (दि.६) सकाळी साडेनऊ वाजता नागोठण्यातील हायवेनाका येथे आगमन झाले. त्यानंतर या शिवज्योतीचे मनसे जिल्हा संघटक गोवर्धन पोलिसानी यांच्या निवासस्थानासमोर स्वागत करण्यात आले. यावेळी गोवर्धन पोलिसानी, सरस्वती पोलसानी, तिरत पोलिसानी, पवन पोलसानी, संगीता पोलसानी, पवित्र पोलसानी, शिवराज पोलसानी आदींसह पोलसानी परिवाराने शिवज्योतीचे स्वागत करून पूजन केले. त्यानंतर ही शिवज्योत नागोठ्यातील छ. शिवाजी महाराज चौकात आल्यानंतर फटाक्यांची आतषबाजी करत शिवज्योतीचे स्वागत करण्यात आले.



**शिवसेना (ठाकरे गट) शाखेच्यावतीने छत्रपती शिवाजी महाराजांची जयंती खांदा वसाहत येथे उत्साहात साजरी करण्यात आली. ढोल-ताशांच्या गजरात महाराजांच्या प्रतिमेला अभिवादन करण्यात आले. परिसर भगव्या झेंड्यांनी सजवण्यात आला होता. शिवभक्त मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. परिसर 'जय भवानी, जय शिवाजी'च्या घोषणांनी दुमदुमून गेला होता. यावेळी शिवरायांच्या विचारांचा वारसा जपण्याचा संदेश देण्यात आला. (छायाचित्र: राजेश डांगळे)**




## कोरीगड येथून शिवज्योत पोहचली नेरळमध्ये

**। नेरळ । प्रतिनिधी ।**

नेरळ शिवजयंती उत्सव समितीच्यावतीने दरवर्षी शिवजयंतीनिमित्त शिवज्योत दौड आयोजित केली जाते. यावर्षी शिवज्योत पुणे जिल्ह्यातील कोरीगड येथून सुमारे ७० किमी अंतराचा प्रेरणादायी प्रवास पार करत नेरळ येथे आणण्यात आली. या शिवज्योत दौडचे नेरळ गावात शुक्रवारी (दि.६) सकाळी आगमन झाले.

त्यानंतर या शिवज्योत दौड मध्ये सहभागी झालेले तरुणांची दौड नेरळ गावातील छत्रपती शिवाजी महाराज चौक येथे विसर्जित केली. त्यावेळी शिवज्योत दौड मध्ये सहभागी झालेल्या सर्व तरुणांचे नेरळ सार्वजनिक शिवजयंती उत्सव समितीचे अध्यक्ष बंडू क्षीरसागर यांचे हस्ते स्वागत करण्यात आले. या शिवज्योत दौडीत प्रथमेश कर्णिक, शुभम कडू, दुर्वांकुर पवार, चिराग कडू, तन्मय दिसले, राहुल साळुंके, तुषार भोईर, भावेश भोईर, कुणाल कांबरी, विनायक भोईर, वेदांत शिंदे, केतन भोईर, कामेश कांबरी, आदित्य भोईर, वैभव कांबरी, जीवन भोईर, श्याम कडव, संतोष राठोड, निखिल धुळे, भूषण भोईर, सुदर्शन भोईर, प्रथमेश देशमुख, राजेश हाबळे, शिरीष भोईर आणि निखिल खडे या शिवभक्तांनी उत्साहाने सहभाग नोंदवला.

## कर्जतमध्ये शिवकालीन वस्तूंचे प्रदर्शन

**। नेरळ । प्रतिनिधी ।**

कोकण ज्ञानपीठ अभियांत्रिकी महाविद्यालय, कर्जत येथे छत्रपती शिवाजी महाराजांची जयंती मोठ्या उत्साहात आणि दिमाखात साजरी करण्यात आली. या कार्यक्रमाच्या निमित्ताने महाविद्यालयात शिवकालीन वस्तूंचे विशेष प्रदर्शन देखील आयोजित करण्यात आले होते. या प्रदर्शनामध्ये शिवकालीन शस्त्रांची प्रतिकृती, ऐतिहासिक वस्तू, छायाचित्रे तसेच शिवकालीन इतिहासाशी संबंधित विविध माहिती विद्यार्थ्यांसमोर मांडण्यात आली.तर इतिहास अभ्यासक सागर सुर्वे यांनी छत्रपती शिवाजी महाराज यांच्या इतिहासाची उजळणी करताना स्वराज्याचा इतिहास पुन्हा एकदा जिवंत करण्याचा प्रयत्न केला.



इतिहास संशोधक सागर सुर्वे हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. तसेच महाविद्यालयाचे प्राध्यापक, उप-प्राध्यापक, रजिस्ट्रार तसेच सर्व विभागांचे प्रमुख आणि मोठ्या संख्येने विद्यार्थी या कार्यक्रमाला उपस्थित होते. कार्यक्रमामुळे संपूर्ण महाविद्यालय परिसरात शिवमय वातावरण निर्माण झाले होते. सागर सुर्वे यांनी, 'शिवचरित्र' या विषयावर विद्यार्थ्यांना प्रेरणादायी मार्गदर्शन केले. आपल्या प्रभावी आणि अभ्यासपूर्ण व्याख्यानातून त्यांनी छत्रपती शिवाजी महाराजांचे पराक्रम, स्वराज्य स्थापनेमागील त्यांची दूरदृष्टी, उत्तम प्रशासन व्यवस्था, नेतृत्वगुण आणि राष्ट्रभक्ती यांविषयी सविस्तर माहिती दिली. शिवाजी महाराजांचे विचार आणि त्यांची कार्यपद्धती आजच्या तरुण पिढीसाठी प्रेरणादायी असून विद्यार्थ्यांनी त्यांच्या आदर्शांचा अंगीकार करून समाजासाठी कार्य केले पाहिजे, असा संदेश त्यांनी दिला. त्यांच्या व्याख्यानामुळे विद्यार्थ्यांमध्ये इतिहासाविषयीची जिज्ञासा आणि अभिमानाची भावना निर्माण झाली. तसेच, महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी शिवरायांवर आधारित विविध सांस्कृतिक कार्यक्रम सादर केले.

## तळा शहरात शिवजयंती उत्साहात

**। तळा । प्रतिनिधी ।**

तळा शहरात शिवजयंती उत्साहात साजरी करण्यात आली. यावेळी शिवप्रतिमेच्या स्थापनेसह विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. त्यात रक्तदान शिबिराचे देखील आयोजन करण्यात आले होते. सायंकाळी शहरातील बळीचा नाका येथे विरजोली-रोहा येथील शिवशंभू मर्दानी आखाड्यामार्फत दांडपट्टा, तलवारबाजी, लाठी काठी, भाला, कुऱ्हाडी व आगीचे चित्तथरारक सादरीकरण करण्यात आले. आखाड्याचे सादरीकरण पाहण्यासाठी नागरिकांनी एकच गर्दी केली होती. रात्री गो.म.वेदक विद्यामंदिर रंगमंचावर ऑर्केस्ट्राचे देखील आयोजन करण्यात आले होते. त्यातील सहभागी कलाकारांनी उपस्थित रसिकांना मराठी संस्कृतीचे दर्शन घडविले. या कार्यक्रमासाठी जिल्हाप्रमुख प्रमोद घोसाळकर, तालुका प्रमुख प्रदूम ठसाळ, शहर प्रमुख राकेश वडके, कोअर कमिटी सदस्य लीलाधर खातू यांसह सर्व नगरसेवक तसेच पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.




**उरण तालुक्यातील सर्वात मोठे स्मारक | विंधणे गावाला शिवसृष्टीचे स्वरूप**

## उरणमध्ये भव्य शिवस्मारकाचे अनावरण

**। चिरनेर । प्रतिनिधी ।**

छत्रपती शिवाजी महाराजांचा इतिहास समस्त तरुणाईला प्रेरणादायी ठरावा, यासाठी विंधणे गावाच्या प्रवेशद्वारा जवळ महाराजांच्या पूर्णाकृती अश्वारूढ व आकर्षक तटबंदी असलेल्या भव्य शिवस्मारकाचे अनावरण गुरुवारी (दि.५) लोकार्पण करण्यात आले. त्यामुळे विंधणे गावाला शिवसृष्टीचे स्वरूप आले असून गावाच्या सौंदर्यात भर पडली आहे.

उरण तालुक्यातील विंधणे गावातील फ्रेंड्स फॉर एव्हर सेवाभावी संस्थेच्या अथक प्रयत्नातून तसेच ग्रामस्थांच्या लोकवर्गणीसह, लोकप्रतिनिधी, विविध कंपन्या, संघटना, संस्था, उद्योजक, कामगार या दानशूरांच्या सहकार्याने हे स्मारक उभारण्यात आले आहे. शिवजयंतीच्या पूर्वसंध्येला गुरूवारी या स्मारकाचे लोकार्पण आमदार महेंद्र थोरवे यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी माजी आमदार मनोहर भोईर, उद्योगपती पी.पी. खारपाटील, राजेंद्र खारपाटील, नगराध्यक्ष भावना घाणेकर यांच्यासह वेगवेगळ्या क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते. यावेळी कमोठे नवीमुंबई येथील शंकुल नाशिक ढोल पथकाच्या वाद्यवृंदात आणि 'जय शिवाजी, जय भवानी'च्या शिवगर्जनेसह फटाक्यांच्या आतषबाजीत व तुतारीच्या निनादात हा नेत्र दीपक शिवसोहळा पार पडला. यावेळी श्री छत्रपती शिवाजी महाराजांना अभिवादन करीत मानाचा मुजरा करण्यात आला.

धायरी पुणे येथील शिल्पकार राम माळी यांनी हे १०.३० फुट उंचीचे व १.५ टन वजनाचे श्री छत्रपती शिवाजी महाराजांचे पूर्णकृती अश्वारूढ शिल्प साकारले असून, उरण तालुक्यातील हे सर्वात मोठे शिल्प आहे. साधारणता: ६५ लाख रुपयांच्या निधीतून हे शिवरायांचे शिल्प उभे करण्यात आले आहे. चौथरा व तटबंदीसाठी नांदेड येथून आणलेल्या काळ्या दगडाचा वापर करण्यात आला असून, शिर्डी व ओडिसा येथील कारागिरांनी या तटबंदीचे काम केले आहे. शिवस्मारकात मावळे व तोफा अशी शिल्पे उभारण्यात आली असून, विंधणे गावात शिवसृष्टी निर्माण झाली आहे. त्यामुळे, विंधणे गावाच्या सौंदर्यात भर पडली आहे. यावेळी महाअभिषेकाबरोबर शिवव्याख्याते धीरेंद्र ठाकूर यांचे शिवचरित्रावर व्याख्यान झाले. प्रसिद्ध निवेदिका रंजना केणी यांनी अभ्यासपूर्ण व प्रभावी असे सूत्रसंचालन केले.

शिवजयंतीच्या मुख्य दिवशी शुक्रवारी (दि.६) शिवबा राजांचा जन्मोत्सव, महाआरती, भव्य पालखी मिरवणूक, जुन्या कमिटीच्या पदाधिकाऱ्यांचा सत्कार इत्यादी कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. रात्री अंतरराष्ट्रीय किर्तीचे युवा शाहीर रामानंद उगले यांच्या पोवाडा व लोकगीतांचा कार्यक्रम सादर करण्यात आला. या सोहळ्यास अनेक मान्यवरांसह विंधणे ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.





## म्हसळ्यात सर्वपक्षीय शिवजयंती साजरी

**। म्हसळा । प्रतिनिधी ।**

म्हसळा येथे शिवजयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. गर्जा महाराष्ट्र प्रतिष्ठान म्हसळा आणि शिवसेना युवा सेना, राष्ट्रवादी काँग्रेस, काँग्रेस, शिवसेनेच्या बहुसंख्य कार्यकर्त्यांनी या मिरवणुकीत सहभाग घेऊन खऱ्या अर्थाने शिवजयंतीची शोभा वाढवून एका नव्या पर्वाला सुरुवात केली. यामध्ये शहर प्रमुख अभय कळमकर, माजी नगराध्यक्ष संजय कर्णिक, नगराध्यक्ष अनिकेत पानसरे, माजी सभापती महादेव पाटील, पंचायत समिती सदस्य बबन मनवे, बाबू बनकर, तुकाराम पाटील, संतोष सावंत, कौस्तुभ करडे, तालुका प्रमुख अमित महामुणकर, नगरसेविका राखी करंबे, गर्जा महाराष्ट्र प्रतिष्ठानचे अध्यक्ष सचिन करडे, उपशहर प्रमुख दीपल शिर्के, राजाराम तिलाटकर, प्रसाद बोर्ले, विशाल सायकर, यतीन करडे, नरेश विचारे, छोटू करडे, प्रसन्न निजामपूरकर आदी मान्यवर उपस्थित होते.

## अभिष्टचिंतन ज्येष्ठ नागरिकांचे

८ मार्च

१) श्री.शरद लक्ष्मण वैरागी ब्राम्हणआळी, अलिबाग, ८-३-१९४४

२)श्री.मनोहर बाळाराम उन्दिरे अलिबाग कोळीवाडा, ८-३-१९४०

भिलजी, अलिबाग, १-३-१९५७

## कृषीवलच्या वाचकांना आवाहन




अलिबाग येथील श्री कच्छी जैन भवन चॅरिटेबल ट्रस्टच्या वतीने अन्नदानासाठी एक अभिनव योजना आखली आहे. जिल्हारुग्णालयात दाखल असलेल्या रुग्णांच्या एका नातेवाईकाला जेवणाची सोय करण्यात आली आहे. या योजनेत दररोज किमान ७०/८० लोक जेवत असतात. या जेवणाचा खर्च प्रति दिवस रु. ३००० असून ही देणगी देणाऱ्याचा फोटो कृषीवलमध्ये छापला जाईल. तरी जास्तीत जास्त लोकांनी अन्नदान सेवेचा लाभ घेऊन या सामाजिक उपक्रमात सहभागी व्हावे असे आवाहन कृषीवल करीत आहे. **संपर्क- ८०५५३२५६७८ (बीपीन राठवा) ९२२६०५५१५५ (अमित शहानंद)**

**- मुख्य संपादक, कृषीवल**

**आजचे अन्नदाते**

**दूर्वेश नितीन म्हात्रे स्म रणार्थ अलिबाग**



**स्व. डॉ. भास्कर टी. तांबोळी, जयंती निमित्त अलिबाग**



**सौ. ज्योती दीपक पवार, वाढदिवस अलिबाग**

# आदिवासी वाड्यांत बालसुरक्षा

## • सोंडेवाडी-चांगेवाडी ग्रामस्थांचा उत्स्फूर्त प्रतिसाद

**। रसायनी । प्रतिनिधी ।**

बालकांचे शोषण, बालविवाह रोखण्यासाठी आणि त्यांच्या हक्कांचे संरक्षण करण्यासाठी केवळ कायदे असून चालत नाही, तर समाजात जागरूकता असणे आवश्यक आहे. हीच गरज ओळखून रायगड जिल्हा पोलीस दलाच्या मार्गदर्शनाखाली खालापूर पोलीस ठाणे आणि जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी कार्यालय (रायगड-अलिबाग) यांच्या वतीने खालापूर पोलीस ठाण्याच्या हद्दीतील सोंडेवाडी व चांगेवाडी येथे एका विशेष जनजागृती कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. गुरुवारी (दि.५) मार्च रोजी पार पडला. या कार्यक्रमाचे सूक्ष्म नियोजन रायगड पोलीस आणि खालापूर पोलीस प्रशासनाकडून करण्यात आले होते, ज्याचे सर्व स्तरांतून कौतुक होत आहे.



### बालविवाहावर सखोल चर्चा

कार्यक्रमात प्रामुख्याने बालविवाहाचे शारीरिक आणि मानसिक दुष्परिणाम यावर सखोल चर्चा करण्यात आली. अश्वपरिस फाऊंडेशनच्या डॉ. इशिका शेलार आणि प्रेरणा फाऊंडेशनच्या बेबीत कांबळे यांनी ग्रामीण भागातील माता-पित्यांना आवाहन केले की, मुलींचे वय १८ आणि मुलांचे वय २१ पूर्ण झाल्याशिवाय त्यांचे लग्न करू नका. बालविवाह हा केवळ गुन्हा नसून तो मुलांच्या भविष्याचा घात करणारा प्रकार असल्याचे त्यांनी पटवून दिले.

### • पोलिसांकडून नागरिकांच्या शंकांचे निरसन

कार्यक्रमात जिल्हा बाल संरक्षण कक्ष आणि चाईल्ड हेल्पलाईन रायगड यांच्यामार्फत १०९८ या आपत्कालीन क्रमांकाची माहिती देण्यात आली. प्रकल्प समन्वयक प्रकाश पवार यांनी सांगितले की, मुलांवरील अन्याय रोखण्यासाठी हा क्रमांक २४ तास सज्ज आहे. तसेच सहायक संरक्षण अधिकारी (खालापूर) मिथुन गुंजाळ यांनी पोलीस प्रशासन आणि बाल संरक्षण यंत्रणा कशा प्रकारे हातात हात घालून काम करतात, यावर प्रकाश टाकला.

रायगड जिल्ह्याचे पोलीस अधीक्षक अंचल दलाल आणि वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांच्या सूचनेनुसार, खालापूर पोलीस ठाण्याने या कार्यक्रमाचे आयोजन अत्यंत प्रभावीपणे केले. ग्रामीण भागातील नागरिकांपर्यंत पोहोचून त्यांना कायद्याची भीती न घालता, विश्वासात घेऊन बाल हक्कांची माहिती देणे हा या नियोजनाचा मुख्य उद्देश होता. खालापूर पोलीस ठाण्याच्या कर्मचाऱ्यांनी प्रत्यक्ष सोंडेवाडी व चांगेवाडी भागात जाऊन ग्रामस्थांना या उपक्रमात सहभागी करून घेतले.

खालापूर पोलिसांनी केलेल्या उत्तम नियोजनामुळे या कार्यक्रमाला सोंडेवाडी आणि चांगेवाडी परिसरातील सुमारे ७० ते ८० महिला व पुरुषांनी उपस्थिती लावली. उपस्थित नागरिकांनी पोलिसांशी संवाद साधून आपल्या शंकांचे निरसन केले. आमच्या गावात अशा प्रकारे पोलीस आणि प्रशासन स्वतःहून येऊन मार्गदर्शन करत असल्यामुळे आम्हाला सुरक्षित वाटते, अशा भावना काही ग्रामस्थांनी व्यक्त केल्या.

## महाडमध्ये जन आरोग्य योजना सुरु

**। महाड । प्रतिनिधी ।**

शासनाच्या योजनेचा एक भाग म्हणून महाड शहरांतील कोकण कार्डिऑक केअर हॉस्पिटलमध्ये हृदयविकार रुग्णांसाठी महात्मा ज्योतिबा फुले जन आरोग्य योजना सुरु झाली असून या योजनेचा लाभ गरीब गरजू रुग्णांनी घ्यावा त्याच प्रमाणे या योजनेची माहिती जास्तीत जास्त लोकांपर्यत पोहचवावी असे आवाहन डॉ. आदित्य म्हमणकर यांनी केले आहे

योजनेसाठी आयुष्यमान योजनेत येणाऱ्या रुग्णांना योजनेचा फायदा होणार असून या योजनेअंतर्गत येणाऱ्या लोकांनी लोकांनी तात्काळ आयुष्यमानकार्ड काढावे असे आवाहनही डॉ. म्हामणकर यांनी केले आहे.

योजना तीन टप्प्यात राबवली जाणार आहे. पहिल्या टप्प्यात ॲन्जोप्लास्टिक दुसऱ्या टप्प्यात या सारखे गंभीर आजारामध्ये अशा रुग्णांना आयसियूमध्ये उपचार प्रणालीचा वापर तर तिसऱ्या टप्प्यात इतर काही आजांरासह




सामान्य आजारांचा समावेश यासह इतर शस्त्रक्रिया आदींचा समावेश असणार आहे. महाडच्या कोकण कार्डिकेअर या सेंटरमध्ये आतापर्यत गेल्या दहा वर्षात १००० ॲन्जोग्राफी व २०० वर ॲन्जोफ्लास्टिकच्या यशस्वी शस्त्रक्रिया करण्यात आल्या आहेत यामुळे या योजनेचा लाभ जास्तीत रुग्णांनी घेण्यासाठी ७५५८५४०८०१, ८२०८२८०३९२ संपर्क करा असे आवाहन डॉ. म्हमणकर यांनी केले आहे.




## कळंबोलीत आरोग्य शिबिराला प्रतिसाद

**। पनवेल । प्रतिनिधी ।**

आंतरराष्ट्रीय महिला दिनाच्या निमित्ताने कळंबोली येथे आरोग्य तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. शिबिरास परिसरातील नागरिकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. यावेळी शेकडो महिला रुग्णांची तपासणी करण्यात आली. शिबिरात रक्तदाब, मधुमेह, कान-नाक-घसा तपासणी, डोळ्यांची तपासणी करण्यात आली. खारघर, नवी मुंबई येथील मेडिकल हॉस्पिटलच्या मुख्य डॉक्टरांसह सुमारे १० जणांच्या वैद्यकीय पथकाने नागरिकांची सविस्तर तपासणी केली. शिबिरात जवळपास शेकडो रुग्णांची तपासणी करण्यात आली. तपासणीनंतर डॉक्टरांनी नागरिकांना संतुलित आहार, नियमित व्यायाम आणि वेळोवेळी आरोग्य तपासणी करण्याबाबत मार्गदर्शन केले. रामदास शेवाळे, सायली सरक यांच्या मार्गदर्शनाखाली हे आरोग्य शिबीर आयोजित करण्यात आले होते. या उपक्रमामुळे परिसरातील अनेक महिलांना आणि नागरिकांना मोफत आरोग्य तपासणीचा लाभ मिळाला.

## बनावट सही करून चेक वटवला

**नवीन पनवेल :** बनावट सही मारून बनावट चेक खात्यात वटवल्याप्रकरणी अनोळखी ईसमाविरोधात पनवेल शहर पोलीस ठाण्यात चार मार्च रोजी गुन्हा दाखल करण्यात आला. संकेत शिंदे हे कर्मचारी राज्य विमा निगम श्रम एवं रोजगार मंत्रालय भारत सरकार यांच्या पनवेल येथे कार्यालयात ब्रँच मॅनेजर आहेत. पनवेल कार्यालयाच्या खात्याची रोखपाल यांनी बॅलन्स चेक केला. यावेळी खात्याच्या बॅलन्समध्ये तफावत आढळून आली. म्हणून त्यांनी एसबीआय बँकेच्या कॅशियरला संपर्क साधला. स्टेटमेंट तपासले असता ९६ हजार ९०० रुपये रक्कम खिरी, उत्तरप्रदेश येथील एका बँक खात्यात ट्रान्सफर झाल्याचे दिसून आले. तसेच आणखी दोन चेकच्या रकमा खात्यातून डेबिट झाल्या मात्र, त्या पुन्हा रिव्हर्स झाल्याचे दिसून आले.

## महिला जनजागृती कार्यशाळेचे आयोजन



**।अलिबाग । प्रतिनिधी ।**

भारत सरकारच्या कौशल्य विकास व उद्योजगता मंत्रालयाच्या माध्यमातून माध्यमातून रायगड जिल्ह्यामध्ये संस्थापक अध्यक्षा डॉ. मेधा सोमैया व डॉ नितीन गांधी यांच्या मार्गदर्शनाखाली कार्यरत असणारी जन शिक्षण संस्थान रायगड व डॉ. बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठ लोणारेच्या स्वयंसिद्ध समितीच्या संयुक्त विद्यमाने परिसरातील महिला, युवती व भगिनींसाठी जागतिक महिला दिनाचे औचित्य साधून शनिवारी (दि.७) मार्च रोजी महिला कौशल्य जनजागृती कार्यशाळेचे आयोजन विद्यापीठात करण्यात आले होते.

कार्यक्रमा प्रसंगी महिला सक्षमीकरणासाठी सकारात्मक मानसिकता गरजेची किंमत मुख्य प्रशिक्षण व जे. एस. एस रायगडचे संचालक डॉ. विजय कोकणे यांनी व्यक्त केली. कार्यक्रमा प्रसंगी समन्वयक डॉ. संगीता मेटकर यांनी स्वयंसिद्ध महिला उपक्रमांतर्गत जागतिक महिला दिन साजरा करून महिलांना सकारात्मक दृष्टिकोनातून प्रेरित करण्याचा मुख्य उद्देश डोळ्यासमोर ठेवून डॉ. बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठने सदर व्यासपीठ उपलब्ध करून दिली असल्याची माहिती दिली.

कार्यक्रमास विद्यापीठाचे कुलगुरू डॉ कारभारी. वि. काळे, डॉ. अमित शेष, डॉ. संजय नलबलवार, डॉ. संगीता मेटकर, प्राध्यापक महिला-भगिनी व युवती यांच्या उपस्थित होते.


## भावना ग्रुपतर्फे रक्तदान शिबीर

**नवीन पनवेल :** भावना ग्रुप नवी मुंबई येथे कर्मचाऱ्यांसाठी रक्तदान शिबीर आयोजित करण्यात आले. रक्तदान शिबीर भावना ग्रुपचे राजेश शहा, अपर्णा शहा यांच्या मार्गदर्शना खाली राबवण्यात आले. शिबिरामध्ये जे जे महानगर ब्लड बँक भायखळा मुंबई, येथून डॉक्टर एवं नर्स यांची उपस्थिती होती. भावना ग्रुपनी आपल्या कर्मचाऱ्यांकडे केवळ कर्मचारी नसून पारिवारिक दृष्टीने पाहतात हे यावेळी दिसून आले. कर्मचाऱ्यांच्या शारीरिक मानसिक स्थितीला मजबुती देण्याचे कार्य हे घडताना दिसून येत आहे. भावना ग्रुप नेहमी नवनवीन उपक्रमांद्वारे सांस्कृतिक कार्यक्रमांद्वारे मालक व कर्मचारी यामधील नातं नेहमी जोडण्याचे आणि टिकवण्याचे हेतू प्रत कार्यशील आहे हे जाणवते.

# साप्ताहिक राशिभविष्य ०८ मार्च ते १४ मार्च २०२६


ज्योतिषी : मिलिंद पाटील, सारळ-अलिबाग
मोबा.९४०४७९१७९८

### कामाची दगदग वाढणार




**मेष :** हा सप्ताह मेष राशीधारकांना प्रकृतीची काळजी घेणे गरजेचे राहील आठवड्याच्या शेवटी स्थिती सामान्य होणार आहे, तो पर्यत दम धरणे क्रम प्राप्त राहील. घराबाबत प्रश्न निर्माण होऊ शकतात कोर्ट कचेरी ही होऊ शकते. आपण कितीही काम केलेत तरी आपल्या अधिकारी वर्गाचे समाधान होणार नाही घरात ही अशीच स्थिती राहील. कामात दगदग वाढणार आहे. स्थावर मालमत्तेची कामे करताना विचारपूर्वक करावीत. हातचे सोडून पळत्याच्या पाठी जाऊ नका, कामकाज नसलेल्याना अचानक काम हाती येणार आहे, त्यामुळे हाती पैसा खेळू शकेल. कमी पैसे असले तरी हातातील संधी सोडू नका, आपल्या जिवलगा सोबत वेळ घालवण्याची संधी उपलब्ध होईल, योग्य त्या रीतीने त्याचा फायदा घ्या. नोकरदारवर्गाने मोठ्या मंडळी बरोबर गोड बोलून राहावे, जुन्या समस्या व चिंता मिटणार आहेत. अमावस्याच्या दिवशी श्वानाला खाण्यास द्या. **महिलांना** : घरात एखादे मंगल कार्य होणार आहे, त्याची तयारी करावी लागेल. आपल्या परिश्रमाचे योग्य फळ मिळणार आहे. नवीन नोकरी असणाऱ्याना वातावरण चांगले भेटणार आहे. कुटुंबात एखाद्या चांगल्या कार्याचा योग आखला जाईल. **शुभ दिनांक** : ०९, १०.

### घराच्या जबाबदाऱ्या पार पाडा



**वृषभ :** हा सप्ताह वृषभ राशीसाठी उसताहपूर्ण असणार आहे, नोकरी धंद्यासाठी केलेला प्रवास यशस्वी होणार आहे. आपण केलेला लहान व्यवहार ही फायदा देणारा ठरणार आहे. व्यवसायात एखादे लक्ष प्राप्त होण्याचा संभव आहे. महत्वाच्या कामासाठी आपली निवड होऊन आपल्यावर जबाबदारी सोपवली जाणार आहे. आपण मेहनतीने ती यशस्वी करू शकाल प्रॉपर्टी बाबत व्यवहार होण्याचा संभव आहे. योग्य तो निर्णय घेण्यास हरकत नाही. प्रेम विवाहात बदल करण्यास बोलणी होऊ शकतात, आपण ताणून धरू नका नाहीतर आपला तोटा होऊ शकतो. भावनेच्या भरात घेतलेला निर्णय चुकीचा असू शकतो. मनोरंजनासाठी जास्त खर्च करू नका. विवाहिताना घराच्या जबाबदाऱ्या पार पडताना नाकी नऊ येतील. थोड संयम अधिक काळ धरणे आवश्यक राहील. इतर दिवस चिंतेत टाकणारे नसले. संतती बाबत ही चिंता असू शकते. **महिलांना** : आपल्या पूर्वजांना स्मरण करून तो दिवस त्यांच्यासाठी देणे आपल्यासाठी हितकारक असेल. पूर्वजांसाठी अमावस्येस पितृपीडा स्तोत्र वाचने हितकारक आहे. **शुभ दिनांक** : ११,१२.

### अनावश्यक खर्च टाळा




**मिथुन :** राशीसाठी या सप्ताहातील ग्रहमान पाहता आपण आपल्या खर्चावर योग्य नियंत्रण ठेवल्यास बऱ्याच गोष्टी साध्य करता येतील. आर्थिक बाजू ठीक असली तरी अनावश्यक खर्चावर मात्र कटाक्षाने निर्बंध ठेवणे हितकारक राहील. आपल्या रागावर नियंत्रण ठेवणे योग्य राहील, आपला राग एकदम बाहेर पडणारा असतो, त्या वाफ जाई पर्यन्त थांबणे हितकारक असेल त्यासाठी वादविवादाचे प्रसंग कटाक्षाने टाळा. आर्थिक गुंतवणूक सध्या नको. व्यवहारात चढउतार संभवतात. तरीही हाती घेतलेल्या कामात सफलता मिळेल. त्यामुळे आपले काम थांबवू नका, नोकरदारांना काहीसा दिलासा मिळेल. ५० पुढील व्यक्तिनि प्रकृतीस्वास्थ्य जपा, विशेषतः मोसमी आजारांपासून सावध राहा. एका बाजूने आपल्याला जोडीदाराची उत्तम साथ मिळणार आहे. कलाक्षेत्राला उत्तम हा कालावधी उत्तम असून, पितरांचे स्मरण करणे म्हत्वाचे आहे. **महिलांना** : महिलांना त्यांच्या कलागुणांना प्रोत्साहन मिळणारा कालावधी आहे, एखादा सत्कार ही होण्याचा संभव आहे. प्रवासाचे योग संभवतात, आपल्या बोलण्यावर मात्र योग्य नियंत्रण ठेवणे गरजेचे आहे म्हणजे इतरांची नाराजी होणार नाही. **शुभ दिनांक** : १३, १४

### प्रलोभनांपासून दूर राहा




**कर्क :** या सप्ताहात कर्क राशीधारकास त्याने घेत असलेल्या श्रमाचा योग्य परतावा मिळाल्याचे समाधान मिळू शकेल. नोकरदारांना दिलासा मिळेल. प्रकृतीस्वास्थ्याबाबत अधिक दक्ष राहा, विशेषतः खाण्याची पथ्ये पाळा, उष्णतेच्या व डोळ्यांच्या विकारांबाबत सावध राहा. जोडीदाराची योग्य साथ मिळणार असल्याने एखादे मोठे काम करण्यास हरकत नाही, आपण आपल्या उद्योग-व्यवसाय क्षेत्रात काही बदल करणे महत्त्वाचे ठरणार आहे, पर्यायाने आपणावर येणाऱ्या आव्हानांना आपण सहजपणे सामोरे जाऊ शकाल. इतरांच्या मतांना जास्त महत्त्व न देता आपणास योग्य वाटणाऱ्या गोष्टींना प्राधान्य द्या. सरकारी नियमांचे पालन करा. विवाहइच्छुकांच्या आशा पल्लवित होतील. प्रलोभनांपासून दूर राहा. आपल्याला नोकरी-व्यवसायात प्रगती करण्याची संधी प्राप्त होईल. आपल्या प्रयत्नांना चांगला प्रतिसाद मिळू शकेल. शेतीविषयक कामांना गती मिळेल. **महिलांना** : आपल्या स्वभावातील हेकेखोरपणावर मात्र प्रतिबंध करा. थोड हट्टीपणा बाजूला ठेऊन जोडीदाराच्या मनाप्रमाणे वागा, घरातील वातावरण बदलून जाईल एखादे शुभ कार्य करण्याबाबत ठरवले जाईल. **शुभ दिनांक** : ०८, ०९.

### शुभकार्य होण्याची शक्यता




**सिंह :** राशीसाठी या सप्ताहात ग्रहांची उत्तम साथ मिळणार असल्याने आपण अपेक्षित गोष्टी साध्य करू शकाल. नोकरदारांनी मात्र वरिष्ठांशी जुळवून घेण्याचे धोरण स्वीकारावे. विद्यार्थ्यांना अध्ययनात अपेक्षित यश मिळू शकेल. विवाहइच्छुकांच्या आशा-आकांक्षा पल्लवित होतील. कलागुणांना प्रोत्साहन मिळेल. प्रकृतीबाबत मात्र सावधानता बाळगा, विशेषतः उष्णतेच्या विकारांबाबत सावध राहा. सरकारी नियमांचे पालन कटाक्षाने करा. आर्थिक बाजू सांभाळा. अनावश्यक खर्चापासून लांब रहा बचती बाबत सजग राहा जोडीदाराची साथ मिळेल. पदवीधारकाने अभ्यास सुरू करावा प्रवास संभवतो. घरात एखादे शुभकार्य होण्याची शक्यता राहील. शेतीविषयक कामांना गती मिळेल. नोकरदारांना दिलासा मिळेल. कौटुंबिक वादविवाद मात्र कटाक्षाने टाळण्याचा प्रयत्न करा. राजकीय क्षेत्रात जम बसवू शकाल. कुटुंबाकडून अपेक्षित सहकार्य मिळेल. **महिलांना** : विशेषतः मोसमी आजारांपासून सावध राहा. वैवाहिक जोडीदाराशी जुळवून घ्याव लागेल घरात काही किंमती वस्तूची खरेदी कराल शुभ मनोरंजनामध्ये जागरण टाळणे हितावह आहे. **शुभ दिनांक** : १०,१३.

### हिशोबी राहणे आवश्यक




**कन्या :** राशीसाठी या सप्ताहाचे ग्रहमान पाहता ते आपणास पुष्कळशा बाबतीत साथ देणारे असल्याने आपले कार्य सफल करू शकाल. विरोधकांची धास्ती बाळगण्याचे कारण नाही, ते नामोहरम होतील. आपल्या कामकाजात अधिक लक्ष देऊन ते पार पाडण्याचा प्रयत्न करा. सामाजिक क्षेत्रात आपला दबदबा वृद्धिंगत होईल. सरकारी नियमांचे पालन करा. व्यवसायात प्रगतीची संधी मिळेल. नोकरदारांना दिलासा मिळेल. प्रलोभने टाळा. आठवड्याच्या शेवटी महत्त्वाची कामे हाती न घेतल्यास, पुढे ढकलल्यास सर्व दृष्टीने हितकारक ठरू शकेल. कामाची जबाबदारी वाढण्याची शक्यता राहील. कलागुणांना प्रोत्साहन मिळेल. संगणक व तांत्रिक क्षेत्रातील व्यक्तींना प्रगतीची संधी मिळेल. आर्थिक व्यवहारात मात्र सावधानता बाळगा. मोठी गुंतवणूक करण्याचे टाळा. अंमवशेस प्रवास टाळावा. **महिलांना** : बाहेर पडताना तब्बेतीची पूर्ण काळजी घेणे आवश्यक आहे, थंड पदार्थ अजिबात घेऊ नये त्या पासून लांब राहणे उत्तम ठरेल संतती कडून खुश खबर मिळणार आहे, लांब फिरण्यास जाण्याचे नियोजन केल जाईल तीर्थयात्रा करण्यास हरकत नाही. **शुभ दिनांक** : ०८, ११.

### धार्मिक कार्यात सहभाग घ्या




**तुळ :** राशीसाठी या सप्ताहाचे ग्रहमान पाहता आपल्या मेहनतीलाच यशाची झालर प्राप्त होण्याची शक्यता असल्याने त्याचा योग्य उपयोग करणे सर्व दृष्टीने ठीक राहील. नोकरदारांनी आपल्या वरिष्ठांशी जुळवून घेण्याचे धोरण स्वीकारणे हितकारक राहील. आपल्या श्रम ाला योग्य न्याय दिला जाईल. कौटुंबिक वातावरण वादाच्या प्रसंगाने बिघडणार नाही याची दक्षता घ्या. सरकारी कर्मचारीवर्गाने नको त्या प्रलोभनात अडकू नका. गुरूकृपेचा लाभ घेता येईल. सरकारी नियमांचे पालन कटाक्षाने पाळा. आपण प्रत्येक बाबतीत सकारात्मक विचाराने वागण्याचा प्रयत्न केल्यास पुष्कळशा गोष्टी साध्य करू शकाल. बढती व बदली बाबत विचार होऊन नोकरदारांना दिलासा मिळू शकेल. आक बाबतीत तज्ञांचा सल्ला घेतल्या शिवाय व्यवहार करू नये. विशेषतः मुलांच्या कलागुणांना चांगला वाव मिळेल. प्रवासाचे योग संभवतात. **महिलांना** : धार्मिक कार्यात अधिक रस घ्याल. आप्तेष्टांशी सामंजस्याने वागणे योग्य राहील. प्रकृती स्वास्थ्य जपा, विशेषतः खाण्याची पथ्ये पाळा व नियमित व्यायाम करा. कोणाशीही नाराजी पत्करू नका. **शुभ दिनांक** : १२,१४.

### गैरसमजापासून दूर राहा



**वृश्चिक :** राशीसाठी या सप्ताहाचे ग्रहमान पाहता एकूण वातावरण चांगले राहिल्याने आपणास आनंद घेता येईल. आपल्या बोलण्यावर योग्य नियंत्रण ठेवल्यास गैरसमजापासून दूर राहू शकाल. गोड बोलून आपला कार्यभाग साधण्याचे धोरण स्वीकारणे योग्य राहील. सरकारी नियमांना प्राधान्य द्या व ते कसोशीने पाळा. आपण कार्यक्षेत्राबाबत दुसऱ्यांवर विश्वास न ठेवता स्वतः जातीने लक्ष घातल्यास आपण आपले उद्दिष्ट गाठू शकाल. कामाचा उत्साह वाढला तरी आपल्या रागावर योग्य नियंत्रण ठेवणे आवश्यक आहे. मित्रमंडळी व आप्तेष्टांच्या गाठीभेटी होतील. नोकरदारांना दिलासा मिळेल. प्रवासाचे योग संभवतात. हाती घेतलेल्या कामांना मार्गी लावण्याचा प्रयत्न करा. घरगुती वातावरनात गोडवा येऊ शकेल, बाहेर फिरताना आपल्या किमंती वस्तु सांभाळणे गरजेचे राहील. सार्वपित्री अमवस्या असताना दुपारी माशांना खाण्यास देणे भाग्यकारक आहे. **महिलांना** : मुलांना प्रोत्साहन देण्याचा प्रयत्न करावा. तरीही ग्रहमान पाहता आपण प्रत्येक कार्यात शांतता बाळगून, विचारपूर्वक वागून निर्णय घेतल्यास हा सप्ताह तुमच्या दृष्टीने चांगला जाईल. **शुभ दिनांक** : ०९, १०.

### अहंकारावर मुरड घाला




**धनु :** राशीसाठी या सप्ताहात आपण संयम व जिद्द यांचा योग्य वापर केल्यास आपले ध्येय गाठू शकाल. खर्चाचे प्रमाण वाढणार असल्याने वेळीच अनावश्यक खर्च टाळा. नोकरदारांना बढती मिळू शकेल. आर्थिक बाजू ठीक ठेवता येईल. प्रकृतीबाबत अधिक दक्ष राहा, विशेषतः खाण्यापिण्याची पथ्ये पाळा. वरिष्ठांशी व सहकाऱ्यांशी बोलताना सावधपणे वागावे. हितशत्रूंबद्दल चिंता करू नका, त्यांना गप्प बसवू शकाल. आवश्यक तेव्हा आपल्या बुध्दीकौशल्याचा उपयोग करा. वैवाहिक जोडीदाराची उत्तम साथ मिळेल. आपण काळ, काम व वेग यांचे योग्य गणित सांभाळल्यास हा आठवडा चांगला घालवू शकाल. कलात्मक आनंद देणाऱ्या कामात गुंतवून घेतल्यास त्याचा आनंद घेऊ शकाल. वादाचे प्रसंग उद्भवणार नाहीत याची दक्षता घ्या. आपल्या अहंकारावर मुरड घातल्यास हितकारक ठरू शकेल. पण आपण आपल्या बोलण्यावर मात्र योग्य नियंत्रण ठेवा. अंमवशा असताना घरात वाद घालू नका. **महिलांना** : हाती घेतलेल्या कामांचा निपटारा करा. आर्थिक बाजू ठीक राहील. घरातल्यानची मर्जी राखता येईल. आर्थिक व्यवहारात मात्र गुंतून जाणार नाही याची दक्षता घ्या. **शुभ दिनांक** : ११,१२.

### तडजोडीची भूमिका घ्या




**मकर :** हा साप्ताह मकर राशीसाठी प्रलोभन समोर आले तरीही नको त्या प्रलोभनात अडकून जाऊ नका. बौद्धिक क्षेत्राला उत्तम वाव मिळेल. व्यवसाईक लाभ घेऊ शकतील, प्रकृतीबाबत आपण चालढकलपणा न करता पथ्ये पाळा. नियमित व्यायाम करा, मसालेदार पदार्थ खाण्याचे व चहा टाळा. आपण अध्ययनातील क्षेत्रात कठोर परिश्रम व सातत्य अंमलात आणल्यास आपल्या यशाचा आलेख उंचावू शकाल. नोकरदारांनी वरिष्ठांशी मिळते-जुळते घेण्याचे धोरण स्वीकारल्यास उत्तम राहील. वादाचे प्रसंग उद्भवणार नाहीत याची दक्षता घ्या. राजकीय व्यक्तीचे राजकीय क्षेत्रात वर्चस्व राहू शकेल. काही भाग्यवंतांना दोनाचे चार हात होण्याची संधी मिळू शकेल, निर्णय मात्र विचारपूर्वक घ्यावा. आपण सर्व बाबतीत व कार्यक्षेत्रात शांततेने परिस्थिती हाताळल्यास आपणास अपेक्षित यश मिळू शकेल. शनिदेव किंवा मारुतीला तेल वाहा. **महिलांना** : आपणास प्रोत्साहित करणाऱ्या घटकांना जाणून घ्या व मग त्यांचा अवलंब करा. आर्थिक बाजू ठीक राहील. शेतीविषयक कामकाजांना चालना मिळेल. संतातीच्या प्रकृतीबाबत आपण अधिक दक्ष राहा, डॉक्टरचा सल्ला घ्या. **शुभ दिनांक** : १३, १४.

### व्यवहारात सावधानता बाळगा



**कुंभ :** या सप्ताहातील ग्रहमान पाहता आपण प्रत्येक बाबतीत संयमाने वागल्यास व त्याप्रमाणे कृती केल्यास हा सप्ताह चांगला जाऊ शकेल. कामकाजात निर्माण होणाऱ्या प्रश्नांना शांतपणे व संयमाने हाताळल्यास पुष्कळशा गोष्टी साध्य होऊ शकतील. प्रत्येक गोष्टींचा आस्वाद घेताना त्याचा अतिरेक होणार नाही याची दक्षता घ्या. नको त्या प्रलोभनात अडकू नका. नोकरदारांना व व्यावसायिक क्षेत्राला चांगला काळ राहील. हितशत्रूंची चिंता करण्याचे कारण नाही, ते गप्प बसतील. आपण आपला आत्मविश्वास वाढविण्याचा प्रयत्न केल्यास पुष्कळशा गोष्टी साध्य करता येणे शक्य आहे. नोकरदारांनी वरिष्ठांशी मिळते-जुळते घेण्याचे धोरण स्वीकारल्यास हितकारक ठरू शकेल. आर्थिक व्यवहारात सावधानता बाळगा. साहसी कृत्ये कटाक्षाने टाळावीत. विरोधकांच्या हालचालींवर कडक नजर ठेवावी, त्यांना संधी मिळणार नाही याची दक्षता घ्या. विद्यार्थीवर्गाला अध्ययनात यशाची अपेक्षा ठेवू शकाल. अमावस्याच्या दिवशी पितरांची आठवण काढा. **महिलांना** : जिद्द व आत्मविश्वासाने नियोजित कामे पार पाडा. सध्या मोठी गुंतवणूक टाळावीत. आरोगयाबाबत हलगर्जीपणा करू नका, जिवलगाकडून भेटवस्तु मिळेल. **शुभ दिनांक** : ११, १४.

### नव्या ओळखी होतील



**मीन :** साप्ताहात मीन राशीसाठी खर्चात वाढ होणारा जाणार आहे, व्यापार करणाऱ्या व्यक्तिना साह्य न मिळाल्या मुळे त्रास सहन करावा लागेल, जो चिकाटी धरून राहील त्याचे नशीब पळफळणार आहे. कोणतीही कृती आताताईपणे न करता विचार पूर्वक करा या आठवड्यात आपल्यावर जबाबद्ऱ्या येणार आहेत, या जबाबाद्ऱ्या पार पाडताना आपला कस लागणार आहे, त्यामुळे आपल्याला झेपतील इतकीच जबाबदारी स्वीकारा. आपल्यात असणारी सकारात्मक बाजू आपल्याला अडचणी सोडवण्यास मदत करतील. सरकारी क्षेत्रात असणाऱ्या व्यक्तीना मान सन्मान मिळणार आहे. कुटुंबात वाद विवादाचे कारण बनू नका. देव दर्शनाला जाण्याचा बेत आखला असेल तर ही इच्छा आता फलद्रूप होणार आहे. आठडवड्याच्या शेवटी राजकारणात आपल्याला मानसन्मान मिळणार आहे. व्यापारात शेवटी-शेवटी फायदा होणार आहे. **महिलांना** : महिलावर्गाचा वेळ दुसऱ्यांची भांडणे सोडवण्यात जाणार आहे, मात्र अशावेळी सत्याची बाजू घ्या त्यामुले यश प्राप्त होईल, कोणीतरी आपली कानउघडणी करण्याची गरज निर्माण होईल, तुमची ताकद तुमच्या विचारातआहे. आर्थिक लाभासाठी आमवशेला श्री सूक्त वाचने गरजेचे आहे. **शुभ दिनांक** : ९, १२.

# पालीत महाराजस्व समाधान शिबिरास प्रतिसाद



। सुधागड–पाली । प्रतिनिधी ।

सुधागड तालुक्यातील पाली येथे शनिवारी (दि.७ मार्च) मंडळ पालीच्या वतीने छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबिर टप्पा क्रमांक १ चे आयोजन करण्यात आले. हे शिबिर पाली बल्लाळेश्वर गणपती मंदिरातील भक्त निवास क्रमांक १ येथे पार पडले. या शिबिरात लाभार्थ्यांना महसूल विभागाच्या १५ हून अधिक सेवांचा लाभ देण्यात आला. सातबारा उतारे, फेरफार नोंदी, नामांतरण, वारस नोंद प्रक्रिया, उत्पन्न, जाती व निवासी दाखले अशा विविध सेवांचा लाभ नागरिकांना एकाच ठिकाणी मिळाला.

कार्यक्रमास रवी पाटील, सहआयुक्त कोकण विभागीय आयुक्त कार्यालय, दीपा भोसले उपजिल्हाधिकारी माणगाव, उत्तम कुंभार तहसीलदार सुधागड–पाली, निवासी नायब तहसीलदार भारत फुलपगारे, महसूल नायब तहसीलदार ज्ञानेश्वर अडसुळे, साजिद शेख उपअधीक्षक भूमि अभिलेख सुधागड, नकुल पोळेकर निवडणूक नायब तहसीलदार, तालुका कृषी अधिकारी सुधागड, सुखदेव वाढणकर पुरवठा निरीक्षण अधिकारी, अंकुश साळवे मंडळ अधिकारी पेडली, गणेश साळुंखे मंडळ अधिकारी नांदगाव, ग्राम महसूल अधिकारी विमल घोलवे यांच्यासह ग्राम महसूल अधिकारी, भूमी अभिलेख कर्मचारी, कृषी विभाग अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते. शिबिराचा राजकीय व सामाजिक कार्यकर्ते, सामान्य जनता, महिला व शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित राहून शिबिराचा लाभ घेतला.

यावेळी रवी पाटील यांनी उपस्थितांना मार्गदर्शन करताना शासनाच्या उपक्रमाचा उद्देश सांगितला. दीपा भोसले उपजिल्हाधिकारी माणगाव व तहसीलदार उत्तम कुंभार यांनीही नागरिकांना मार्गदर्शन करून शिबिराचा लाभ घेण्याचे आवाहन केले. या शिबिरामुळे नागरिकांना त्यांच्या दैनंदिन महसुली कामांसाठी मोठी सोय झाली असून प्रशासन व नागरिक यांच्यात थेट संवाद साधण्याची संधी मिळाली.

# श्रीवर्धनमध्ये स्त्रीरोग तपासणीचे आयोजन

। श्रीवर्धन । प्रतिनिधी ।

महिलांच्या आरोग्याबाबत जागरूकता वाढविणे आणि त्यांना वेळेवर योग्य वैद्यकीय तपासणी व उपचार उपलब्ध करून देणे या उद्देशाने श्रीवर्धन येथील मातोश्री हॉस्पिटलच्या वतीने जागतिक महिला दिनानिमित्त विशेष मोफत स्त्रीरोग तपासणी व उपचार शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. हे शिबीर रविवारी (दि.८) मार्च रोजी सकाळी ११.०० ते दुपारी ३.०० या वेळेत आयोजित करण्यात येणार असून श्रीवर्धन परिसरातील महिलांनी व किशोरवयीन मुलींनी या शिबिराचा लाभ घ्यावा, असे आवाहन आयोजकांनी केले आहे.

या शिबिरामध्ये पुण्यातील स्त्रीरोग व प्रसूतीशास्त्र तज्ञ डॉ. अबोली कदम–तळेकर तसेच डॉ. अमृता मुकेश श्रीवर्धनकर या महिलांची मोफत तपासणी करून आवश्यक ते वैद्यकीय सल्ला व उपचार देणार आहेत. ग्रामीण भागातील अनेक महिलांना स्त्रीरोगांसंदर्भात योग्य वेळी तपासणी मिळत नाही किंवा संकोचामुळे त्या उपचार घेत नाहीत. त्यामुळे अशा शिबिरांमुळे महिलांना तज्ज्ञ डॉक्टरांकडून मार्गदर्शन व उपचार घेण्याची चांगली संधी उपलब्ध होणार आहे.शिबिरात महिलांसाठी विविध प्रकारच्या आरोग्य तपासण्या व मार्गदर्शन सुविधा उपलब्ध करून देण्यात येणार आहेत. त्यामध्ये प्रसूतीपूर्व तपासणी, प्रसूतीनंतरची तपासणी, वंध्यत्व निवारण व उपचार, गर्भपिशवीसंबंधित समस्या व त्यावरील उपचारांचा समावेश आहे. याशिवाय किशोरवयीन मुलींना येणाऱ्या शारीरिक व हार्मोनल समस्यांबाबत मार्गदर्शन केले जाणार असून कुटुंब कल्याण नियोजन, आरोग्यदायी मातृत्व व महिलांच्या सर्वांगीण आरोग्याबाबत सल्ला दिला जाणार आहे. शिबीर मातोश्री हॉस्पिटल, वाणी आळी, ता. श्रीवर्धन, जि. रायगड येथे आयोजित करण्यात आले असून श्रीवर्धन व परिसरातील सर्व महिला, तसेच किशोरवयीन मुलींनी या मोफत आरोग्य शिबिराचा लाभ घ्यावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

**वाचकांसाठी निवेदन**

कृषीवल वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची शहानिशा करुनच वाचकांनी संबंधितांशी व्यवहार करावेत. वर्तमानपत्रातून प्रसिद्ध जाहिरातीतील उत्पादने, सेवा किंवा त्यासंदर्भातील दावे यांची नागेश पब्लिशर्स प्रा. लि. कोणतीही हमी घेत नाही. त्या मजकुराच्या अथवा दाव्याच्या पूर्ततेसंदर्भातील कोणतीही जबाबदारी नागेश पब्लिशर्स प्रा.लि. चे मुद्रक, प्रकाशक, संपादक किंवा मालक यांच्यावर राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.

- मुख्य संपादक

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने असे कळविणेत येते की, आमचे पक्षकारांनी मौजे मूद्रे खुर्द, ता. कर्जत, जि. रायगड येथील खालील वर्णनाची बिनशेती प्लॉट मिळकत, त्या मिळकतीचे मालक विजया रविंद्र भालेराव यांचेकडुन विकत घेणेचे ठरविले आहे.

| सर्व्हे नंबर व हिस्सा नंबर | प्लॉट नंबर | क्षेत्रफळ चौरस मीटर | आकार रु. पै. |
|---|---|---|---|
| १०/४/ब/१अ | ९ | १७३-०० | ३-४६ |

सबब सदर बिनशेती प्लॉट मिळकतीच्या व्यवहाराबाबत कोणाचीही दान, गहाण, फरोक्त, साठेकरार, लिज, लीन, ताबेकब्जा अथवा अन्य कोणत्याही प्रकारची हरकत असल्यास त्यांनी त्यांची हरकत सदरची नोटीस प्रसिद्ध झाले पासून १० दिवसांचे आत खालील सही करणार ॲडव्होकेट यांचेकडे प्रथमदर्शनी लेखी पुराव्यासह हरकत दाखल करावी.

वरीलप्रमाणे मुदतीत कोणतीही हरकत दाखल न झाल्यास सदर बिनशेती प्लॉट मिळकत निर्वेध व बोजारहीत आहे असे समजून वरील मिळकतीचा व्यवहार आमचे पक्षकारांकडून त्या मिळकतीचे मालकांबरोबर, पूर्ण केला जाईल. मागाहून येणाऱ्या तक्रारीस आमचे पक्षकार जबाबदार राहणार नाहीत याची नोंद घ्यावी.

दिनांक : ०८/०३/२०२६.

**ॲड.सी.बी.ओसवाल**
बी.कॉम.एल.एल.बी.
दिनकर-निमकर अपार्टमेन्ट
बाजारपेठ कर्जत, ता. कर्जत,
जि. रायगड -४१०२०१.

## जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की,

ज्याअर्थी मौजे-जिते, ता.कर्जत, जि.रायगड येथील पुढीलप्रमाणे वर्णनाची बिनशेती मिळकत भोगवटादार रकान्यामधील नमुद इसमाच्या खुद्द मालकीची बिनशेती मिळकत असून सदर मिळकत श्री. हेमंत सजनराव शेवाळे व इतर १ यांनी खरेदी करणेचे ठरविले आहे. त्यामुळे त्यासंदर्भात आम्ही सदर मिळकतीच्या मालकी हक्कांची पडताळणी करीत आहोत.

**-: जमीन मिळकतीचे वर्णन :-**

**मौजे - जिते, ता. कर्जत, जि. रायगड येथील मिळकत.**

| भोगवटाधारकाचे नाव | सर्व्हे नं./हिस्सा नं./प्लॉट नं. | क्षेत्रफळ आर.चौ.मी. | आकार रू.पै. |
|---|---|---|---|
| श्री.जयंत पांडुरंग आंबेकर | ८९/अ/५ | ५.२२.५० यापैकी अविभक्त हिस्सा २.२५.७५ आर.चौ.मी. | ५२.२५ |

**वरील प्रमाणे बिनशेती मिळकत त्यामधील तदंगभुत सर्वहक्कहितसंबंध यासुद्धा.**

त्याअर्थी विद्यमान मालकांव्यतिरिक्त सदर बिनशेती मिळकतीसंदर्भात अगर तिचे कोणत्याही भागावर कुणाही तिऱ्हाईतांचे गहाण दान, बक्षीस, फरोक्त, करारनामा, लिज, चार्ज, ॲटॅचमेंट, अन्न-वस्त्र निवारा, कुळ हक्क, ताबा-कबजा, एम.ओ.यु., हुकूमनामा, मनाई आदेश, जप्ती, वहिवाट, हिस्सा, संपादन रिक्विझेशन अगर त्याप्रकारचे कोणतेही हक्क-हितसंबंध निगडीत असल्यास अगर सदर मालकी हक्कांस कुणाचीही हरकत असल्यास अशा हितसंबंधीत व्यक्ती, संस्था इत्यादींनी त्यांच्या लेखी हरकती जरूर त्या कागदोपत्री पुराव्यानिशी सदर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासुन ७ (सात) दिवसांचे आत आमच्या खालीलप्रमाणेच्या पत्त्यावरील कार्यालयात सादर कराव्यात.

विहित मुदतीमध्ये कुणाचीही हरकत न आल्यास सदर बिनशेती मिळकतीवरील विद्यमान मालक श्री. जयंत पांडुरंग आंबेकर यांचे मालकी हक्क निर्वेध व बोजारहित आहेत असे समजुन ना हरकत दाखला देण्यात येईल व सदर बिनशेती मिळकतीचा व्यवहार पुर्ण करण्यात येईल. मुदतीनंतर आलेल्या हरकती ग्राहय धरल्या जाणार नाहीत, हे सर्व जाहीर व्हावे.

कर्जत
दिनांक : ०८/०३/२०२६

सही /-
**ॲडव्होकेट, मिनाक्षी जगन्नाथ भासे**
पत्ता - शॉप नं.१६, श्री नेमीनाथ हाईटस्,
मुद्रे (बुद्रुक), ता.कर्जत, जि.रायगड ४१० २०१.
मो.नं. ७४१०१४८१२१/७७९८१५११८८
minakshibhase@gmail.com

## जाहीर सूचना

याद्वारे **सूचना** देण्यात येते की, आम्ही **(१) दरायस फली कावराणा,** ज्यांचा पत्ता डी३, पाल्लोनजी मॅन्शन, ४३ कफ परेड, मुंबई - ४००००५, आणि **(२) झाल फली कावराणा,** जांचा पत्ता बी४ पाल्लोनजी मॅन्शन, ४३ कफ परेड, मुंबई - ४००००५ असा आहे (एकत्रितपणे "**मालक**"), यांच्या यात खाली लिहिलेल्या परिशिष्टामध्ये अधिक विशेषरित्या वर्णन केलेला मालमत्तेच्या ("**मालमत्ता**") संबंधातील अधिकार, हक्क आणि हितसंबंधांची चौकशी करीत आहोत.

**यात यावरील संदर्भित केलेले परिशिष्ट :**

**कोणत्याही** आणि सर्व व्यक्ती (कोणत्याही बँका किंवा वित्तीय संस्था किंवा एनबीएफसी किंवा इतर कोणत्याही कर्जदात्यासह) यांना सदर मालमत्तेच्या किंवा त्यातील कोणत्याही भागाच्या संबंधातील विक्री, हस्तांतरण, अदलाबदल, मृत्युपत्र, धारणाधिकार, आकार, गहाण (समन्याय किंवा अन्य) बक्षिस, न्यास, मृत्युपत्रीत देणगी, वारसा, कब्जा, भाडे, भाडेपट्टा, पोट-भाडेपट्टा, अभिहस्तांकन, भाडेदारी, पोट-भाडेदारी अनुज्ञप्ती, काळजीवाहू तत्व, भागीदारी विलेख, सुविधा अधिकार, विभाजन, कर्ज, प्राप्य वस्तूंचे तारण गहाण, हमी, एकाधिकार, परिरक्षा, भोगवटा, अधित्याग, अधित्यजन किंवा कोणताही करारनामा, विलेख, दस्तऐवज, लिखित, उत्तराधिकार, कुटुंब व्यवस्था/तडजोड, विवाद, प्रलंबित वाद, कोणत्याही न्यायालयाचा हुकुमनामा किंवा आदेश, कोणत्याही प्राधिकरणाने संमत केलेला निवाडा किंवा कोणत्याही हुकूमनाम्यान्वये किंवा कायद्याच्या प्रचालनाद्वारे, करार, विकास अधिकार किंवा एफएसआय वापर किंवा टीडीआर किंवा भार किंवा अधिकार, संभाव्य विकास वापरण्याचे अधिकार व प्रसंविदा किंवा लाभाधिकारी अधिकार, कोणत्याही न्यासा खालील हितसंबंध, चीर्भोगाधिकार किंवा अग्रक्रयाधिकार, कोणत्याही स्वरूपाचे अन्य काही असेल तर किंवा यात यावर नमूद केलेले या मालकांचे हक्क विलेख आणि/किंवा मालमत्ता किंवा त्यातील कोणताही भाग याद्वारे सदर मालमत्तेच्या किंवा त्यातील कोणत्याही भागाच्या संबंधातील कोणताही अधिकार, हक्क, शेअर, दावा, लाभ, आक्षेप, इस्टेट, मागणी आणि/किंवा हितसंबंध (''दावे'') असणाऱ्या कोणत्याही आणि सर्व व्यक्तींनी (कोणतीही बँक किंवा वित्तीय संस्था किंवा एनबीएफसी किंवा अन्य कोणतेही ऋणको यांच्या समावेशासह) आम्हाला या जाहिरातीच्या तारखेपासून १४ (चौदा) दिवसांच्या आत यात याखाली नमूद केलेल्या पत्त्यावर या दाव्याच्या हार्ड कॉपीसह objections@veritaslegal.in वर पाठींबा देणाऱ्या दस्तावेजी पुराव्यासह लेखी स्वरूपामध्ये ज्ञात होण्यासाठी कळविणे आवश्यक आहे. यात कसूर झाल्यास अशा व्यक्तीचे किंवा व्यक्तींचे दावे/तथाकथित दावे/आक्षेप दुर्लक्षित करण्यात येतील किंवा सर्व आशा आणि उद्देशाकरिता त्यांचा अधित्याग किंवा परित्याग करण्यात आलेला आहे, असे समजण्यात येईल आणि ते कोणत्याही पद्धतीने बंधनकारक राहणार नाहीत.

**(मालमत्तेचे वर्णन)**

तालुका अलिबाग, जिल्हा रायगड, महाराष्ट्र येथील कृषी जमिनीचे ते सर्व तुकडे आणि भाग खालीलप्रमाणे :

| अनु. क्र. | मालकाचे नाव | गट क्र. | गांव | क्षेत्रफळ (७/१२ उताऱ्यानुसार) | सीमा |
|---|---|---|---|---|---|
| १ | दरायस फली कावराणा | ८५ | सुरेखर | ०-३५-२० हे.आर. | पूर्वेस : गट क्र. ८३ व ८४. पश्चिमेस : गट क्र. ८६ व ८७. उत्तरेस : गट क्र. ८२. दक्षिणेस : गट क्र. ८८. |
| २ | दरायस फली कावराणा | ८६ | सुरेखर | ०-१८-२० हे.आर. | पूर्वेस : गट क्र. ८५. पश्चिमेस : गट क्र. ९४. उत्तरेस : गट क्र. ९४. दक्षिणेस : गट क्र. ८७. |
| ३ | दरायस फली कावराणा | ८७ | सुरेखर | ०-२०-२० हे.आर. | पूर्वेस : गट क्र. ८५. पश्चिमेस : गट क्र. ९४. उत्तरेस : गट क्र. ८६. दक्षिणेस : गट क्र. ८८. |
| ४ | दरायस फली कावराणा | ८८ | सुरेखर | ०-९५-१० हे.आर. | पूर्वेस : गांव आगरसुरे येथील गट क्र. २६२. पश्चिमेस : गट क्र. ९४. उत्तरेस : गट क्र. ७९, ८४, ८५ व ८७. दक्षिणेस : गट क्र. ८९. |
| ५ | झाल फली कावराणा | ८९ | सुरेखर | ०-७८-२० हे.आर. | पूर्वेस : गांव आगरसुरे येथील गट क्र. २६१ व २६२. पश्चिमेस : गट क्र. ९० व ९४ (भाग). उत्तरेस : गट क्र. ८८. दक्षिणेस : गांव आगरसुरे येथील गट क्र. ९० व गट क्र. २६० (भाग). |
| ६ | झाल फली कावराणा | २६१ | आगरसुरे | ०-२७-० हे.आर. | पूर्वेस : रस्ता. पश्चिमेस : गांव सुरेखर येथील गट क्र. ८९. उत्तरेस : गांव आगरसुरे येथील गट क्र. २६२ व गांव सुरेखर येथील गट क्र. ८८. दक्षिणेस : गांव आगरसुरे येथील गट क्र. २६०. |
| ७ | दरायस फली कावराणा | २६२ | आगरसुरे | ०-१७-० हे.आर. | पूर्वेस : रस्ता. पश्चिमेस : गांव सुरेखर येथील गट क्र. ८८. उत्तरेस : गांव आगरसुरे येथील गट क्र. २६३ व गांव सुरेखर येथील गट क्र. ७९. दक्षिणेस : गट क्र. २६१. |

मालमत्तेवर उभ्या असलेल्या घर क्र. १३६९ आणि १३७० आणि इतर इमारतींसह (उदा., गट क्र. ८५, ८७, ८८ आणि २६२), आणि त्यावर असलेल्या झाडे, इतर वृक्षारोपण, विहीर आणि बोअरवेलसह.

आज दिनांक ९ मार्च, २०२६

**व्हेरिटास लीगल करीता**
वकील आणि सॉलिसिटर्स
**सही/–**
**रुस्तम मुल्ला**
भागीदार
objections@veritaslegal.in
फोर्ब्स बिल्डिंग, पहिला मजला,
चरणजीत राय मार्ग,
फोर्ट, मुंबई – ४००००१.

## जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, आमचे अशिलानी मौजे किहीम, तालुका अलिबाग, जिल्हा रायगड येथील खालील वर्णनाची मिळकत त्या मिळकतीचे विद्यमान मालक श्री.अतुल महादेव भगत यांचेकडून खरेदी घेण्याबाबत बोलणी चालू आहेत. त्या मिळकतीचे सविस्तर वर्णन खालीलप्रमाणे,

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | भूमापन क्रमांक व उपविभाग | क्षेत्र (हे.आर) | आकार | भुधारणा पध्दत |
|---|---|---|---|---|
| किहीम | ३५० | ०.६३.१० ०.०४.९० ०.६८.०० | १.०० | वर्ग-१ |

सदरहू वर्णन केलेली मिळकत निर्वेध व बोजारहीत असल्याची व ती मिळकत कायमस्वरुपी विकण्याचा पुर्ण हक्क व अधिकार असल्याची हमी सदर मिळकतीचे विद्यमान मालकांनी आमचे अशिलांस दिलेली आहे. तथापी सदर मिळकतीत अन्य कुणाचाही गहाण, दान, बक्षीस, फरोक्त, साठेकरार, मृत्युपत्र, अन्नवस्त्र, जाती, शित, कर्जाचा बोजा, जामिनकी, कुळहक्क, कब्जा वारसाहक्क, मालकी, एम. ओ. यु. करार, ताबे कब्जा वहीवादी, रस्ता वहीवाट, कोर्टकचेरी वगैरे संबंधी कसल्याही प्रकारने हक्क अगर हितसंबंध अगर तक्रार/हरकती असल्यास त्यांनी त्यांची हरकत ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून १४ दिवसाचे मुदतीत लेखी स्वरूपात प्रथमदर्शनी कागदोपत्री पुराव्यासह खाली सही करणार यांचेकडे सादर कराव्यात. तशी लेखी हरकत वा तक्रार दिलेल्या मुदतीत आली नाही, तर सदर मिळकतीवर विद्यमान मालकाशिवाय अन्य कोणाचाही कसलाही हक्क, हितसंबंध अधिकार नाही. वा असल्यास तो त्यांनी स्वेच्छेने सोडुन दिला आहे असे समजून, गृहीत धरून सदरचा विक्री व्यवहार बोलणे सफल झाल्यास खरेदीखत नोंदणीकृत करून पूर्ण केला जाईल व या मुदतीनंतर आलेल्या हरकती व तक्रारी आमचे अशिलांवर बंधनकारक रहाणार नाहीत याची सर्वांनी नोंद घ्यावी.

अलिबाग
दिनांक : ०६/०३/२०२६

सही/-
**ॲड. सचिन सदानंद पाटील**
पत्ता : कुरूळ, ता अलिबाग, जि. रायगड
मो.नं.९८८१६३७९२४/७९७२७७९९०२

## जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, आमचे अशिनांच्या सुचनेवरून मी मौजे आवास, ता. अलिबाग, जि. रायगड येथील खाली नमूद परिशिष्टात वर्णन केलेल्या मिळकतीच्या (सदर मिळकत), विद्यमान मालकांचे, त्या मिळकतीचे मालकी हक्कांचे निर्वेधतेची पडताळणी करीत आहे. मिळकतीचे मालकांनी असे निवेदीत केले आहे की, सदर मिळकतीमध्ये त्यांस पुर्णपणे व निर्वेध मालकीहक्क आहेत.

तरी ज्या इसमांचा सदर मिळकतीमध्ये अथवा त्यांतील कोणत्याही भागावर अथवा भागामध्ये करार, संमतीज्ञापन, भागीदारी, खरेदी, भाडेपट्टा, पोटभाडेपट्टा, वारसा, बोजा, दान, गहाण, हस्तांतरण, अदलाबदल, विश्वस्त, कुळवहिवाट, ताबा, परवाना, वहिवाट, कसवणुक, पोटगी, मृत्यूपत्र, कौटुंबिक व्यवस्था, तडजोड, कोर्टाचा हुकुमनामा, वहिवाटीच्या रस्त्याचा करार या अथवा अन्य कोणत्याही प्रकारचा हक्कहितसंबंध असल्यास, त्यांनी तसे आम्हास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ दिवसांचे आत खाली दिलेल्या आमचे पत्त्यावर कागदोपत्री पुराव्यांसहित रजिस्टर्ड पोस्ट ॲ.डी. द्वारे लेखी कळवावे. मुदतीत तसे कुणीही न कळविल्यास, सदर मिळकतीमध्ये कुणाचाही कोणताही हक्कहितसंबंध नाही अथवा असल्यास तो कायम स्वरूपी सोडून देण्यात आला आहे, असे समजण्यात येईल व विद्यमान मालकांचे सदर मिळकतीचे मालकी हक्क निर्वेध आहेत असे गृहित धरुन आमचे अशिल नियोजीत खरेदी-विक्री व्यवहार पूर्ण करतील. नोटीस मुदतीनंतर आलेली कोणतीही तक्रार, हरकत अथवा दावा विचारात घेतला जाणार नाही.

**परिशिष्ट**
**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | गट नं./हि.नं. | क्षेत्र (हे.आर.) | आकार (रू. पैसे) | विद्यमान मालकांचे नाव |
|---|---|---|---|---|
| आवास | ४२२/२ | १-१०-६० पो.ख. ०-०२-६० १-१३-२० (पैकी ०-४०-००) | ५.४३ (१.९६) | यतिन अमृत पटेल |

अलिबाग
तारीख : ८/३/२०२६

सही/-
**ॲड. गणेश गोविंद पाटील.**
अे/१,२, तळमजला,
'श्रुतीसारंग' को. ऑप. हा. सोसायटी,
युनियन बँकेसमोर, ब्राह्मणआळी,
अलिबाग, रायगड, ४०२ २०१.

## जाहीर नोटीस

तमाम लोकांस कळविण्यात येते की, आमचे अशिल मे श्रीजी लाइफस्पेसस प्रोजेक्टस एलएलपी, यांनी (नवीन भाडेपट्टेदार/भूखंडधारक) मेसर्स एनएनडी अंबरनाथ एलएलपी यांच्याकडुन लिहुन घेण्याचे ठरविले त्या भुखंडाचे सविस्तर वर्णन खालीलप्रमाणे. मिळकत ही मेसर्स एनएनडी अंबरनाथ एलएलपी यांनी त्रिपक्षीय करारनामा हा दिनांकः १७/११/२०२५ रोजी निष्पादित करुन सहदुयम निबंधक पनवेल यांच्या कार्यालयामध्ये दस्तऐवज अनु.क्र.पवल-१/९००८/२०२५, दिनांक: ०२/१२/२०२५ अन्वये नोंदणी करण्यात आला असून त्रिपक्षीय करारनामाच्या अधीन भुखंडाबाबत अधिनियम, १८९४ च्या कलम १८, कलम २८अ व कलम २८अ (३) खाली वाढीव मावेजा आणि भाडेपट्ट्याची रक्कम विषयक न्यायालयीन दावा क्रमांक. एस.सी.एस. २५४/२०२५ रजिस्टर आहे या दाव्याव्यतिरिक्त कुठल्याही प्रकारचा न्यायालयीन दावा प्रलंबित नाही, सदरचा भुखंड हा नवीन भाडेपट्टेदार/नवीन भूखंडधारक/परवानाधारक यांनी सिडकोची पुर्व परवानगी घेऊन ५० टक्के म्हणजेच अंदाजे १०९९.९५ चौ. मी. क्षेत्र हस्तांतरित करण्याचे ठरविले आहे. तरी या जाहीर नोटीसीने असे कळविण्यात येते की, खाली उल्लेखित भुखंडाचे ५० टक्के क्षेत्र आमचे अशिल मे. श्रीजी लाइफस्पेसस प्रोजेक्टस एलएलपी यांच्या लाभांत हस्तांतरण करुन घेण्यासंदर्भातील, सिडकोमार्फत हस्तांतरण परवानगी मिळाल्यानंतर त्या क्षेत्रासंदर्भात आमचे अशिलांनी त्रिपक्षीय करारनामा नोंदणी करून हस्तांतरण करण्याचे निश्चित केले आहे. तरीही या जाहीर नोटीशीने असे कळविण्यात येते की, सदर कराराची पूर्तता/भुखंडाचे हस्तांतरण करण्यापुर्वी, सदर भुखंड हा निर्वेध, बिनकर्जी, बोजारहित, निजोखमी नाही असे असणे आवश्यक आहे, उपरोक्त भुखंडावर अन्यथा कोणाचा कोणत्याही प्रकाराचा हक्क, हितसंबध म्हणजेच कोणत्याही व्यक्तिला, देवाणघेवाण, हक्क, व्याज, वाटा, लीज, उप-लीज, भाडेकरार, उप-भाडेपट्टा, परवाना, धारणाधिकार, गहाण, शुल्क, भार, व्यवसाय, करार, ट्रस्ट, आराम, भेट, वारसा, मृत्युपत्र, देखभाल, ताबा, विकास हक्क, राइट ऑफ वे, आरक्षण, करार, लिस-पेंन्डस, कौटुंबिक व्यवस्था/सेटलमेंट, कोणत्याही न्यायालयाचा हुकुम किंवा आदेश, एल्एल्पी, भागीदारी किंवा इतर कोणत्याही स्वरूपाचे त्यांचे आक्षेप असल्यास ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून पंधरा (१५) दिवसांचे आत त्यांचे आक्षेप लिखित स्वरूपात पुराव्यानिशी खालील पत्त्यावर नोंदवणे आवशक आहे. जर या मिळकतीबाबत लिखित स्वरूपात कोणतेही दावे स्वाक्षरीसह, दस्तऐवजासह प्राप्त झाले नाहीत, कोणांकडूनही, कोणत्याही प्रकारची तक्रार अगर हरकत आली नाही, तर वर नमूद केल्याप्रमाणे नोटीस कालावधीत त्याच्या/तिच्या/त्यांच्या दाव्याचे समर्थन केले जाणार नाही आणि त्यावर विचार ही केला जाणार नाही तर आमचे अशिल सदरहु भुखंडासंदर्भातील सिडकोची पूर्व परवानगी घेऊन व्यवहार पूर्ण करतील याची नोंद घ्यावी, कळावे,

**भूखंड/मिळकतीचे वर्णन**

भुखंड कमांक : ०२, सेक्टर- ०२, क्षेत्रफळ २१९९.९० चौ.मी. यापैकी १०९९.९५ चौ.मी., मौजे करंजाडे, तालुका पनवेल, जिल्हा रायगड

**मिळकतीच्या चतु:सिमा खालील प्रमाणे:-**

उत्तरेस : भुखंड कमांक १
दक्षिणेस : भुखंड क्रमांक ३
पुर्वेस : २०.०० मीटर रूंद रस्ता
पश्चिमेस : भुखंड कमांक: ११/१२

**सही वकील अजीत व्ही. सिंह (खरेदीदारासाठी)**
अजीत सिंह ॲण्ड असोसिएटस्
(वकील व कायदेशीर सल्लागार)
पत्ता: १६/१७, १ मजला, साई चेंबर,
प्लॉट नं. ४४, सेक्टर- ११, सी.बी.डी. बेलापूर,
नवी मुंबई, ता. आणि जि. ठाणे
फोन नं. ०२२-४००२ ६१४२/९८२०५२३०७७
ई मेल- ajeet_advocate@yahoo.co.in
दिनांक: ०७/०३/२०२६

## तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी सुधागड यांचे न्यायालयात

क्र. फौजदारी/कात-९/आवक क्र.१०६०/२०२६

श्री.अशोक उमाजी पोंगडे, रा.वाकणगाव पो.पाच्छापूर
ता. सुधागड. जि. रायगड — अर्जदार

विरुद्ध

ग्रामपंचायत अधिकारी, ग्रामपंचायत अडुळसे
ता. सुधागड. जि. रायगड — सामनेवाले

**जन्म मृत्यु नोंदणी अधिनियम १९६९ मधील कलम १३ (३) प्रमाणे जन्म-मृत्युबाबत**

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीद्वारे कळविणेत येते की श्री. अशोक उमाजी पोंगडे, रा. वाकणगाव पो.पाच्छापूर ता.सुधागड जि.रायगड यांनी त्यांची आई मनोरमा उमाजी पोंगडे यांचा मृत्यू दिनांक १७/०९/२०२४ रोजी मौजे वाकणगाव ता.सुधागड जि. रायगड येथे झाला आहे. परंतु त्याची नोंद अद्यापपर्यंत ग्रामपंचायत कार्यालयात केली नाही असे प्रतिज्ञापत्रात नमुद करून त्यांच्या मृत्यू नोंदीचा आदेश मिळणेबाबत अर्ज तहसिल कार्यालय सुधागड येथे सादर केला आहे.

सदर मनोरमा उमाजी पोंगडे यांच्या मृत्यू नोंदीच्या तारखेबाबत कोणाची हरकत असल्यास ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झालेच्या दिनांकापासून पंधरा दिवसाच्या आत तहसिल कार्यालय, सुधागड पाली येथे स्वत: अथवा आपल्या प्रतिनिधीमार्फत लेखी स्वरूपात हरकत दाखल करावी. जर सदर मुदतीत हरकत न आल्यास अर्जदार यांनी सादर केलेल्या पुराव्याच्या आधारे मृत्यू नोंद करण्याचे आदेश पारीत करणेत येईल. असे या जाहीर नोटीसीद्वारे प्रसिद्ध करणेत येत आहे.

ठिकाण :- सुधागड पाली
दिनांक :- ०४/०३/२०२६/-

सही/-
**(उत्तम कुंभार)**
**तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी सुधागड**

## अलिबाग येथील मा. दिवाणी न्यायाधीश, वरिष्ठ स्तर यांचे न्यायालयात

दिवाणी चौकशी अर्ज क्र. / २०२६
(वारस दाखला मिळणेकरीता)

श्रीमती स्मिता शंकर मोहिते — अर्जदार
वय: ४१ वर्षे, व्यवसाय-गृहीणी,
रा: नवेदर नवगाव, अलिबाग
ता.अलिबाग जि. रायगड

**विरूद्ध**

कोणीही नाही. — सामनेवाला

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की.

कै.देवू शंकर मोहिते ही अर्जदाराची आई होती व कै.गिरीजा शंकर मोहिते ही अर्जदाराची बहिण होती. कै.गिरीजा शंकर मोहिते यांचे निधन दि. १८/०२/२०१६ रोजी व कै.देवू शंकर मोहिते या दि. २३/११/२०२३ रोजी मयत झालेल्या आहेत. दोघीही त्यांच्या राहत्या घरी नवेदर नवगाव ता.अलिबाग येथे मयत झालेल्या आहेत.

कै.गिरीजा शंकर मोहिते या अविवाहीत मयत झाल्या असल्यामुळे अर्जदार ही एकमेव वारस असून अर्जदार व्यतिरिक्त अन्य कोणीही वारस नाहीत. कै. गिरीजा शंकर मोहिते यांचे नावे भारतीय स्टेट बँक शाखा थळ ता. अलिबाग, जि. रायगड येथे मुदत ठेव. ३४२०९७११३९२ ही ८,४८,३९६/- (अक्षरी आठ लाख अठठेचाळीस हजार तीनशे शहयाण्णव मात्र) या रकमेची होती. सदर एफडीची मुदत दि. १८/०९/२०२४ रोजी पूर्ण झालेली असून पुर्ण झाले वेळी व्याजासह सदर एफडी रू.९,५५,७१२/- (अक्षरी नऊ लाख पंचावन्न हजार सातशे बारा मात्र) एवढी होती. मुदतठेव. ३४२०९७१०२२९ ही रू. ६,७५,३१९/- (अक्षरी सहा लाख पंच्याहत्तर हजार तीनशे एकोणवीस मात्र) एवढया रकमेची होती. सदर एफडींस अर्जदार हिची आई म्हणजेच कै.देव शंकर मोहिते या नॉमिनी होत्या. सदर एफडीची मुदत दि. १८/०९/२०२४ रोजी पूर्ण झालेली असून पुर्ण झाले वेळी व्याजासह सदर एफडी रू. ७,६०,७४२/- (अक्षरी सात लाख साठ हजार सातशे बेचाळीस मात्र) एवढी होती. सदर मुदतबंध ठेवींची मुदत दि. १८/०९/२०२४ रोजी समाप्त झाली आहे. सदर कै. गिरिजा शंकर मोहिते यांस अर्जदार यांचे व्यतिरिक्त अन्य कोणीही वारस नसल्याने कै. गिरिजा शंकर मोहिते यांचे नावे असलेल्या मुदतबंद ठेवींना अर्जदार यांचे नांव लावावयाचे असल्याने अर्जदार भारतीय स्टेट बँक शाखा थळ, थळबाजार अलिबाग यांच्याकडे गेले असता त्यांनी अर्जदार यांना न्यायालयातून वारस दाखला आणण्यास तोंडी सांगितले आहे. सबब, अर्जदार यास मे. कोर्टाकडून वारस दाखला प्राप्त होणे आवश्यक झाले आहे. वरील कारणासाठी अर्जदार याने मे. कोर्टात कै. गिरीजा शंकर मोहिते यांचे कायदेशीर वारस असल्याबाबत वारस दाखला मिळण्यासाठी अर्ज केलेला आहे.

वरील अर्जदार यांचे व्यतिरिक्त कै. गिरीजा शंकर मोहिते यांना अन्य कोणीही वारसदार असल्यास ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झालेपासून ३० दिवसांचे आत या चौकशी अर्जाचे कामी आपली लेखी हरकत कागदोपत्री पुराव्यांसहीत दाखल करावी.

जर कोणी या चौकशी अर्जाचे कामी हजर राहून लेखी हरकत दाखल केली नाही, तर अर्जदार यांना तसा वारस दाखला देण्यात येईल व त्यानंतर येणाऱ्या कोणत्याही हरकतीचा विचार केला जाणार नाही.

येणेप्रमाणे जाहीर नोटीसीचा मसुदा दिला.

सदरची नोटीस आज तारीख २८/०२/२६ रोजी माझ्या सहीनिशी व कोर्टाच्या शिक्क्यानिशी प्रसिद्धीस दिली आहे.

सही /- **(वरिष्ठ/कनिष्ठ लिपीक)** — **न्यायालयीन शिक्का** — सही /- **(सहाय्यक अधिक्षक)**


**क्लासिफाईड**
**जाहिरात छोटी, उपयुक्तता मोठी**

- **नागावमधील हॉटेलमध्ये काम करण्यासाठी स्टाफची** आवश्यकता आहे. रिसेप्शनिस्ट, किचन हेल्पर लेडीज, कॉन्टिनेंटल कुक, ब्रेकफास्ट कुक,मेन्टेनन्स पर्सन, वेटर,हाऊसकीपर, हाऊसकिपिंग सुपरवायझर,रिसॉर्ट मॅनेजर (क्वालिटी कंट्रोल), इच्छुक उमेदवारांनी सकाळी १० ते ५ या वेळेत संपर्क साधावा अथवा व्हॉटसॲप वर मेसेज करावा. मोबाईल – ७५५९१८४६१२
- **ब्लॉक विकणे आहे.** चेंढरे ग्रामपंचायत हद्दीतील ६६० स्क्वे फूट संपर्क : ९०२८५६५९१७, ९८२२०३१०१७
- **बांधकाम साहित्य विक्री दुकानात अकाऊंटस** टॅलीचा अनुभव असलेली मुलगी पाहिजे. किमान २/३ वर्षाचा अनुभव संपर्क– ८८०६६८३२३२, ८००७८९३२३२
- **कर्जतमधील एका नामांकित** सोसायटीतील २ bhk बंगला विकणे आहे. एजंट क्षमस्व संपर्क– ९६०४१२३५५४/+९८२२४९९३२१
- **वॉन्टेड अलिबागेतील वृद्ध अपंग जोडप्यास** रात्री साडेदहा ते पहाटे साडेचारपर्यंत पेशंटला मदतनीस म्हणून सावध झोप असणारी महिला वृद्ध मदतनीस पगार रोजच्या रोज आठशे रूपये. ८५३०३०९७६५

**जाहिरातीसाठी संपर्क : (०२१४१) २२२२९०/ २२२७६१**

**ऐश्वर्य ज्वेल कलेक्शन**

१ ग्रॅम सोन्याचे प्लेटींग
दागि नविन डिझाइन्स



मोत्याचे दागिने- तन्मणी, चींचपेटी, बांगड्या, बाजुबंद. गॅरंटीचे दागिने- मंगळसूत्र, बांगड्या, पाटल्या, हार, माळ. डायमंड- कुंदन- पोलकी- सेट- मॅचिंग बांगड्या- कानातले. सर्व नामांकित कंपन्यांची कॉस्मेटीक्स, परफ्यूम, डीओ. वाजवी भाव आणि भरपूर व्हरायटीसाठी प्रसिद्ध दुकान.

**२/१२ पी.एन.पी. नगर, अलिबाग.**
**मोबाईल : ९८६०६५८५६५**




## राशीभविष्य

- **मेष** : काही प्रभावी लोकांनी मदत केल्याने उत्साह वाढेल. आर्थिक गुंतवणूक करु शकाल.
- **वृषभ** : घर सुशोभीत करण्यासाठी आकर्षक वस्तूंची खरेदी कराल. मोठी आर्थिक उलाढाल होईल.
- **मिथुन** : नोकरीच्या शोधात असणाऱ्यांना सुसंधी लाभतील. नाविन्यपूर्ण कलाकृतींचा ध्यास घ्याल.
- **कर्क** : नोकरीत वरिष्ठांकडून जबाबदारी सोपवली जाईल. करमणुकीच्या कार्यक्रमाचा आस्वाद घ्या.
- **सिंह** : समाजात आपल्या मतांचा आदर होईल. धाडसी निर्णय घेतले जातील. कामाची आखणी कराल.
- **कन्या** : बौद्धिक आणि कलाक्षेत्रात सुसंधी लाभतील. कामाचा ताण वाढणार आहे. प्रतिष्ठा वाढेल.
- **तूळ** : जिद्द आणि महत्त्वाकांक्षेमुळे कार्यसिद्धी होईल. भागीदारीच्या व्यवसायात अनुकूलता राहील.
- **वृश्चिक** : विवाहेच्छुक तरुणांचे विवाह जमतील. व्यवसायातील योजना मार्गी लागतील. विकास होईल.
- **धनु** : विश्वास आणि प्रामाणिकपणाने कार्य सिद्धीस जाईल. भागीदारीच्या व्यवसायात प्रगती होईल.
- **मकर** : आरोग्याच्या जुन्या तक्रारी वाढतील. उपासनामार्गामध्ये चांगली अनुभूती येईल. संपत्ती वाढेल.
- **कुंभ** : व्यवसायातील निर्णय विचारपूर्वक घ्यावे. जुन्या मित्रमंडळींचा सहवास लाभेल.
- **मीन** : सत्कार्यासाठी प्रवास घडतील. प्रिय व्यक्तींच्या भेटीगाठी होतील. घरातलं वातावरण आनंदी राहील.

सौंदर्यसाधना

## केस चमकदार होण्यासाठी...

केस गळणं, पांढरे होणं, कोंडा, चाई या समस्यांनी महिलावर्गाला हैराण करून सोडलं आहे. कितीही काळजी घेतली तरी प्रदूषण, रसायनयुक्त उत्पादनांचा वापर या कारणांमुळे केस खराब होतात, निस्तेज दिसतात. केसांची चमक टिकवून ठेवण्यासाठी आपण एक सहज सोपा उपाय करू शकतो. आपण चेहऱ्याला वाफ देतो. पण केसांना वाफ देण्याचा विचार कधी केला आहे का? या प्रक्रियेचे अनेक लाभ आहेत. चला तर, मग केसांना वाफ देण्याची प्रक्रिया समजून घेऊ या.

स्कॅल्पवरची छिद्रं बळकट नसतील तर केस गळणं, कोंडा होणं अशा समस्या निर्माण होतात. हे टाळण्यासाठी केसांना तेल लावण्याआधी वाफ द्या. वाफेमुळे छिद्रं व्यवस्थित उघडतील आणि केसांना लावलेलं तेल मुळांपर्यंत पोहोचेल. तेलांमधले पोषक घटक लाभल्याने केस बळकट होतील तसंच त्यांची वाढही वेगाने होईल. वाफ दिल्यामुळे स्कॅल्पवरची त्वचा स्वच्छ होते. केस धुतल्यानंतर शँपूमुळे त्वचेवरची धूळ, घाण निघून जाते. मात्र यातली घातक रसायनं केसगळतीला कारणीभूत ठरतात. **(क्रमश:)**

## ८ मार्च

दिनविशेष

- **२०१३** : दहशतवाद संपवेपर्यत पाकिस्तानबरोबरचे संबंध सुधारण्याची शक्यता नाही, पंतप्रधान डॉ. मनमोहनसिंग यांचं स्पष्टीकरण.
- **२०१५** : ऑल इंग्लंड बॅडमिंटन स्पर्धेत कॅरोलिना मरिनकडून साईना नेहवालचा पराभव. उपविजेतेपद मिळाले.
- **२०१६** : शकुंतला डोले गॅमलिन अरुणाचल प्रदेशच्या मुख्य सचिवपदी नियुक्त.
- **२०१८** : आंध्र प्रदेशला विशेष राज्याचा दर्जा देण्यावरुन मोदी-चंद्राबाबूंमध्ये झालेली चर्चा निष्फळ.

स्मार्ट टिप्स

## स्मार्टफोन हरवला तर...

छोट्यांनो, फोन हरवण्याच्या, चोरी होण्याच्या बऱ्याच घटना घडतात. स्मार्टफोनमध्ये आपली महत्त्वाची माहिती असते. डाटा सेव्ह केलेला असतो. फोटो, सोशल मीडिया अकाउंट्स असं बरंच काही असतं. आता हा फोन दुसऱ्या कोणाच्या हाती लागला तर काय करायचं, आपला डाटा कसा सुरक्षित ठेवायचा असे प्रश्न आपल्याला पडतात. सध्याच्या तंत्रज्ञानाच्या युगात अशक्य असं नाहीच नाही. हरवलेला फोन तुम्ही अगदी सहज लॉक करू शकता. तुमचा किंवा घरातल्या कोणाचा फोन हरवला तर त्यातला डाटा कसा वाचवायचा हे जाणून घेऊ या.

* दुसऱ्या फोन किंवा कॉम्प्युटरवर क्रोम ब्राउजर ओपन करा. यात 'माय अकाउंट डॉट गुगल डॉट कॉम/फाईंड युवर फोन गाईड' असं टाईप करावं लागेल. मग 'ओके'वर क्लिक करा.

* तुमच्या मोबाईलमध्ये जीमेल खातं असतं. त्याचा ईमेल आयडी आणि पासवर्ड नोंदवून लॉग इन करा. **(क्रमश:)**

आरोग्यमंत्र

## धोकेही लक्षात घ्या

मेंदूचे कार्य पूर्वीप्रमाणे करण्यासाठी शॉक पद्धती वापरली जाते, याची माहिती आपण घेतली. या अभ्यासात सहभागी शास्त्रज्ञांनी सांगितले की, काही काळानंतर ही पद्धती केवळ रुग्णालयांपुरतीच मर्यादित राहणार नाही, तर घराघरात पोहोचण्यास सुरुवात होईल. घरातील 'ब्रेन स्टिम्युलेशन' यंत्राची किंमत २० हजार ते ४० हजार रुपये आहे. भविष्यात या तंत्राचा वापर कॅफिनप्रमाणे करता येईल, असे संशोधकांचे म्हणणे आहे. म्हणजेच आज ज्या प्रकारे मेंदूची क्रिया वाढवण्यासाठी लोक कॉफी किंवा चहा पितात;



त्याच पद्धतीने एक दिवस त्यांच्या मेंदूला धक्का बसेल. सध्या घरी ब्रेन स्टिम्युलेशन तंत्र वापरणारे म्हणतात की, त्यांना त्याचा फायदा होत आहे. त्यांचे मन पूर्वीपेक्षा अधिक सतर्क झाले आहे. मेंदू उत्तेजित करण्याचे तंत्र सामान्यतः डॉक्टरांच्या देखरेखीखाली रुग्णालयांमध्ये वापरून पाहिले जाते. पण आज घरच्या घरी त्याचा वापर केल्याने आरोग्यतज्ज्ञांची चिंता वाढली आहे. प्रोफेसर ॲना वेक्सलर म्हणाल्या, की मेंदूच्या उत्तेजनाद्वारे मानसिक आरोग्याचे विकार घरीच बरे करण्याचा ट्रेंड वाढला आहे. नैराश्य आणि चिंता या शीर्षस्थानी आहेत. वापरकर्ते दिवसातून दोनदा २० मिनिटांसाठी घरी मेंदूला उत्तेजन देणारे उपकरण वापरतात. थोडक्यात मानसिक आरोग्यावर घरी उपचार करण्याचा ट्रेंड वाढत आहे. तथापि, त्याचे काही दुष्परिणाम होऊ शकतात. यामध्ये त्वचेला खाज सुटणे, मुंग्या येणे आणि जळजळ होणे यांचा समावेश होतो. त्यामुळेच वैद्यकीय देखरेखीखाली तंत्रज्ञानाचा वापर करणे योग्य आहे.

## पंचांग

**रविवार, ८ मार्च २०२६**
विश्वावसूनाम संवत्सर, शके १९४७,
फाल्गुन कृ. ५, चंद्रराशी : तूळ,
नक्षत्र : स्वाती, योग : ध्रुव,
सूर्योदय ६.५५, सूर्यास्त ६.४४

## फॉरवर्ड्स

**शराफतों क़ी यहाँ क़ोई अहमियत ही नहीं...**

**क़िसी क़ा क़ुछ ना बिगाड़ो तो कौन डरता हैं...!**

## वेगळ्या वाटा


आपल्याकडे सध्या फिरतीच्या नोकरीसाठी अनेकविध पर्याय उपलब्ध झाले आहेत. फिरता फिरता तुम्हाला काय करता येईल, याविषयी...

* इव्हेंट को ऑर्डिनेटर म्हणून काम करताना तुम्ही मस्त भटकंती करू शकता. विविध ठिकाणी आयोजित होणाऱ्या इव्हेंट्ससाठी तुम्हाला फिरता येईल. विविध फेस्टिवल्स तसंच ट्रेड शोच्या आयोजनाची जबाबदारी घेता येईल. यासाठी देशाविदेशात फिरून नव्या लोकांच्या ओळखी करून घेता येतील. * समाज सेवेच्या माध्यमातूनही फिरता येईल. स्वयंसेवक म्हणून विविध ठिकाणी जाता येईल. **(क्रमश:)**

ॲक्सेसरीज

## या बॅग्ज हव्यातच

व्यक्तिमत्त्वाला उजाळा देण्यासाठी आवश्यक असणाऱ्या ॲक्सेसरीजच्या यादीत ट्रेंडी बॅगचं स्थान खूप वरचं आहे. त्यातही पाच बॅग मस्ट हॅव आहेत.



* कशावरही वापरता येण्यासारखी आणि व्हर्सटाईल अशी स्टायलिश बॅकपॅक तुमच्याकडे असायला हवी. बॅकपॅक कशीही कॅरी करता येते. ऑकेजनला साजेशी बॅकपॅक विकत घ्या. ऑफिस तसंच कॅज्युअल लूकसाठी लेदरची, जीम किंवा कॉलेजसाठी स्पोर्टी तर प्रवासासाठी रफ अँड टफ बॅकपॅक घेता येईल. * ऑफिस, बिझनेस मिटिंगला जाताना लेदरची ब्रिफकेस शोभून दिसते. सुटाबुटात मिरवताना या लूकला साजेशी ब्रिफकेसही हवी. भरपूर कप्पे असलेली ब्रिफकेस घ्या. * कॉलेज असाइनमेंट्स असो किंवा ऑफिस, लॅपटॉप कॅरी करावाच लागतो. महागडा लॅपटॉप कॅरी करण्यासाठी तुमच्याकडे दणकट लॅपटॉप बॅग हवी. स्मार्ट लॅपटॉप बॅगमुळे तुम्ही सुपरस्टायलिश दिसता. * पुस्तकं, कागदपत्रं, वह्या ठेवण्यासाठी तुमच्याकडे मेसेंजर बॅग हवी. स्लिंग बॅगप्रमाणे ती खांद्याला अडकवता येते. यामुळे रफ अँड टफ लूक मिळतो. * वीकेंडला फिरायला जाताना वीकेंडर बॅग नेण्याचाही ट्रेंड आहे.

खेचाखेची

## साहेब हीच कमाई

आज शेजाऱ्याने विचारलं, साहेब, आर्थिक वर्ष २०२५-२६ संपत आलं. वर्षभरात किती बचत करता?

.
.
.

मी म्हटलं, खर्च, टॅक्स, शेअर मार्केटमधलं नुकसान, हे सगळं कापून आपण मला मानाने 'साहेब' म्हणालात ना, तेवढंच वाचतं!

## वेगळं काही

इथल्या तुरुंगात दोन हजार लोक काम करतात. गंमत म्हणजे तुरुंगात टाकण्यासाठी इथे एकही गुन्हेगार उरलेला नाही. एक अहवालानुसार २०१३ मध्ये या देशात अवघे १३ कैदी होते. २०१८ पर्यंत इथे एकही कैदी उरलेला नव्हता. इथल्या कायदा मंत्रालयानेही याबाबत सुतोवाच केलं होतं. २०१६ मध्ये त्यांनी दिलेल्या अहवालानुसार पुढच्या पाच वर्षांमध्ये देशातल्या गुन्हेगारीत दर वर्षी ०.९ टक्क्यांची घट होईल, अशी अपेक्षा होती. गुन्हेगारीच नसल्यामुळे नेदरलँड सर्वात सुरक्षित देश बनला आहे. इथल्या तुरुंगांमध्ये काम करणाऱ्या दोन हजारपैकी ७०० लोकांना दुसऱ्या विभागात सामावून घेण्यात आलं आहे तर उर्वरित १३०० लोकांसाठी नोकरीचा शोध सुरू आहे.

## विचार करा

संगोपन

आपल्याकडील बौद्धिक मूल्यमापनाची पद्धत अत्यंत चुकीची आहे. क्रमिक पुस्तकांतला अभ्यास समजत नाही किंवा लक्षात ठेवून लिहिता येत नाही, ती मुलं कुचकामी असल्याचं समजलं जातं. अशा स्थितीत हे जग फक्त हुशार आणि मध्यम बुद्धीच्या मुलांनी जगण्याच्याच योग्यतेचं आहे असं कमी बुद्धिमत्ता असणाऱ्या मुलांना वाटू लागतं त्यावेळी ती नाराज होतात. स्वतःवरच चिडतात, निराश होतात आणि स्वतःपासून आणि त्यांना समजून घेऊ न शकणाऱ्या पालकांपासून दूर पळून जाण्याच्या नादात आत्महत्येचा प्रयत्न करतात. अशा वेळी जगण्यासाठी क्रमिक शिक्षण हाच एकमेव उपयुक्त मार्ग आहे का, याचा विचार पालकांनी केला पाहिजे. एखाद्या मुलाला दहावी पास होता नाही आलं तर त्याला त्याच्या आवडत्या विषयाचं प्रशिक्षण देऊन करिअर करू दिलं तर काय बिघडेल? ते मूल आपल्या क्षेत्रात हिरीरीनं पुढे जाईल. निदान आत्महत्या करून अकालीच आयुष्य कुस्करून टाकणार नाही. मुलांना आत्महत्त्यांसाठी प्रवृत्त करणारं दुष्टपणाचं संगोपन नकळत आपल्याकडून घडत नाही ना याचा पालकांनी विचार केला पाहिजे.



## सुडोकू ७५ [redacted]

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | ३ | | | | ७ | |
| | | | | | ८ | | २ | ९ |
| ४ | ९ | ५ | | | | ३ | | |
| | | | ८ | | | २ | | ७ |
| | | २ | | ६ | | ९ | | |
| ८ | | ३ | | | ४ | | | |
| | | ७ | | | | ८ | १ | ६ |
| ३ | २ | | ७ | | | | | |
| | ६ | | | | ९ | | | |

**टीप -**
* या चौकटीमध्ये सर्व रिकाम्या घरांमध्ये १ ते ९ पैकी अंक वापरून चौकट पूर्ण करायची आहे. यामध्ये प्रत्येक आडव्या ओळीत, उभ्या ओळीत व ३ ह्र ३ लहान चौकटीमध्ये १ ते ९ पैकी प्रत्येक अंक एकदा आणि एकदाच आला पाहिजे.
* आधी छापून दिलेले अंक बदलता येणार नाहीत.
* अशा तऱ्हेने पूर्ण झालेले उत्तर नेहमी एकच असते. पर्यायी उत्तरे असू शकत नाहीत.

## सुडोकू ७४ चे उत्तर [redacted]

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ९ | ६ | ३ | ५ | ७ | ४ | ८ | १ | २ |
| १ | ५ | ७ | ८ | ६ | २ | ३ | ४ | ९ |
| ४ | ८ | २ | ९ | ३ | १ | ५ | ७ | ६ |
| ३ | ४ | ५ | ७ | १ | ९ | ६ | २ | ८ |
| २ | ९ | ८ | ६ | ४ | ३ | १ | ५ | ७ |
| ७ | १ | ६ | २ | ५ | ८ | ४ | ९ | ३ |
| ६ | ७ | १ | ३ | २ | ५ | ९ | ८ | ४ |
| ८ | ३ | ४ | १ | ९ | ७ | २ | ६ | ५ |
| ५ | २ | ९ | ४ | ८ | ६ | ७ | ३ | १ |

## शब्दकोडे क्रमांक ७५

| | | | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | | ४ | ■ | ५ | ६ | | ७ | ८ | ९ | ■ | १० | |
| ११ | | | ■ | १२ | | | | ■ | १३ | | | १४ | ■ | |
| | ■ | १५ | १६ | | ■ | | ■ | १७ | | ■ | १८ | | १९ | |
| २० | २१ | | | ■ | २२ | | २३ | | ■ | २४ | | ■ | २५ | |
| ■ | | ■ | २६ | | | ■ | २७ | | २८ | | ■ | २९ | | ■ |
| ३० | | ३१ | | ■ | ३२ | | | ■ | | ■ | ३३ | | | ३४ |
| | ■ | | ■ | ३५ | | ■ | ३६ | | ■ | ३७ | | ■ | ३८ | |
| ३९ | ४० | | ४१ | | ■ | ४२ | | ■ | ४३ | | ■ | ४४ | ■ | |
| ■ | | ■ | ४५ | | ४६ | | ■ | ■ | ४७ | | ४८ | | ४९ | |
| ५० | | ५१ | | ■ | ५२ | | ■ | ५३ | | ■ | ५४ | | | ■ |
| | ■ | ५५ | | ५६ | | ■ | ५७ | ■ | ५८ | | | ■ | ५९ | |
| ■ | ६० | | | | ■ | ६१ | | ६२ | ■ | ■ | ६३ | ६४ | | ■ |
| ६५ | | ■ | | ■ | ६६ | | ■ | | ■ | ६७ | | | ■ | ६८ |
| ■ | ६९ | | | ■ | ७० | | ■ | ७१ | ७२ | | ■ | ७३ | | |
| ७४ | | ■ | ■ | ७५ | | | | | | ■ | ७६ | | ■ | |

**आडवे शब्द :-**
१) प्रतिनिधी निवडण्याची क्रिया
५) आतापावेतो
१०) पातक
११) मिंधा
१३) मखर
१३) मृत्युचा राजा
१५) भरीवच्या विरुद्ध
१७) भीती, वचक
१८) रमापती
२०) श्रीरामाची गोष्ट
२२) स्पष्टपणे, भीडभाड न ठेवता (बोलणे)
२४) कोथिंबीरीचे बी
२५) हरभरा, फुटाणे
२६) चांदणी
२७) रसाळ
२९) अंत:करण
३०) दूर करणारा, घालविणारा
३२) वसन, वस्त्र
३३) एक लांबटांग्या प्राणी
३५) मोटार (इं)
३६) पान
३७) हात
३८) डोंगर
३९) शहाजहानने बांधलेली एक ऐतिहासिक वास्तू
४२) हेकट, हटवादी
४३) टरफल
४५) एखाद्याचे (प्राण) वाचविणे
४७) स्वच्छंदी
५०) आपला-परका ही भावना
५२) धर्मोपदेशिका (इं)
५३) थरथर
५४) पूजासाहित्याचे ताट
५५) हस्तेपरहस्ते
५८) रेशीमाचे जाडसर कापड
५९) विविध
६०) बडबड
६१) ध्वनी
६३) निवडक
६५) तात्पर्य, सारांश
६६) कुंभाराची भट्टी
६७) आश्रय
६९) शिक्षक
७०) च्या बरोबर
७१) एक क्रूर जंगली प्राणी
७३) देशाचे नाणे
७४) स्वत:ला
७५) जन्म मृत्यू
७६) पुष्कळ

**उभे शब्द :-**
१) निर्लज्ज
२) वेखंड
३) भेकड
४) सरोज
५) नौदल
६) सततचे नामस्मरण
७) गाणे गाणारा
८) काळ, मृत्युदेवता
९) फुलणे, अतिशय फुगणे
१४) खर्चाच्या विरुद्धची बाजू
१६) नाटक, चित्रपट यांची थोडक्यात कहाणी
१७) धैर्य, साहस
१९) सोन्याचे हरीण
२१) होडी
२२) वार्ताहर
२३) शाब्दिक हजामत
२४) द्रव्य, पैसाअडका
२८) बातमी
२९) प्रचंड, खूप मोठा
३०) निर्माण करणारा
३१) रक्कम, ठराविक पैसे
३३) बाण
३४) किल्लूयावरचा आधिकारी
३५) कालू, शिंपला
३७) भांडण, दुही
४०) भयंकर उष्णता, स्वप्नात दिसणा-या गोष्टी
४१) जो ऐनवेळी उपस्थित असतो त्याचा फायदा होतो या अर्थाची एक म्हण
४२) वध, हिंसा, ठार मारणे
४३) पापुद्रा
४४) कारण
४६) औदार्य, देण्याची इच्छा
४८) वागण्याची पद्धत
४९) विनाकारण
५०) मिळकत, उत्पन्न
५१) प्रहात, सूर्य उगवण्याचा काळ
५६) बाजार
५७) लबाडीचा हेतू
६०) नवरदेवास घालण्याचा हार
६१) बोलाविणे
६२) अटीतील जोडीने येणारे शब्द,
६४) सजीव निर्जीव सर्व भाग
६६) बैठण, बसकर योगाचा प्रकार
६७) इच्छा (हिं)
६८) यज्ञोपवित
७२) वाळवंट, युद्ध

**(उत्तर उद्याच्या अंकात)**

## मागील शब्दकोड्याचे उत्तर

| | | | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| चं | द | न | ■ | रा | जी | व | लो | च | न | ■ | सा | व | धा | न |
| प | र | वा | न | गी | ■ | त | प | ■ | व | स | न | ■ | म | ग |
| क | वा | ■ | ग | ■ | छा | न | ■ | श | रा | ब | ■ | स | ण | ■ |
| ■ | जा | ग | र | ण | ■ | वा | र्थ | क्य | ■ | ब | ल | क | ■ | खे |
| ध | ■ | ज | पा | ■ | ता | डी | ■ | ते | ढ | ■ | व | ट | व | ट |
| म | ना | ■ | ल | वं | ग | ■ | दे | व | ■ | क | ण | ■ | च | र |
| क | च | रा | ■ | द | ■ | क | ■ | ढे | कू | ण | ■ | चौ | क | ■ |
| दा | ■ | ज | न | न | म | र | ण | ■ | च | व | दा | र | ■ | सां |
| री | त | स | र | ■ | का | न | ■ | पा | क | ■ | दा | स | बो | ध |
| ■ | ■ | वा | क | डा | ■ | क | म | त | र | ता | ■ | ■ | ध | ■ |
| स | सा | णा | ■ | क | स | र | ■ | क | णे | र | ■ | मा | क | ड |
| म | ध | ■ | बे | घ | र | ■ | श | नि | ■ | क | मा | ल | ■ | ब |
| ■ | क | स | दा | र | ■ | न | व | रा | त्र | ■ | रा | ■ | पा | र |
| भा | ■ | का | णा | ■ | पा | व | ■ | स | य | सु | मा | र | ■ | ■ |
| ट | वा | ळ | ■ | द | श | ल | क्ष | ■ | स्थ | ■ | री | त | भा | त |

रायगड जिल्ह्याची भूमी ही इतिहास, परंपरा आणि कर्तृत्वाची साक्ष देणारी आहे. या भूमीत अनेक धाडसी, जिद्दी आणि दूरदृष्टी असलेल्या महिलांनी विविध क्षेत्रांत उल्लेखनीय कामगिरी करून समाजाला नवी दिशा दिली आहे. शिक्षण, सामाजिक कार्य, प्रशासन, उद्योग, क्रीडा, कला आणि राजकारण अशा अनेक स्तरांवर महिलांनी आपल्या कर्तृत्वाची ठसा उमटवला आहे. आंतरराष्ट्रीय महिला दिनाच्या निमित्ताने रायगड जिल्ह्यातील अशाच कर्तृत्ववान महिलांचा लेखाजोखा मांडण्याचा हा एक छोटासा प्रयत्न आहे. आपल्या मेहनतीने, जिद्दीने आणि समर्पणाने समाजात वेगळी ओळख निर्माण करणाऱ्या या महिलांचा प्रवास अनेकांसाठी प्रेरणादायी ठरतो. त्यांच्या कार्याचा गौरव करताना नव्या पिढीला प्रगतीचा आणि आत्मविश्वासाचा संदेश देणे, हाच या विशेष लेखामागील उद्देश आहे.

# झुंजार महिला संपादक : वैशाली कडू






रायगड जिल्ह्यातील उरणसारख्या छोट्या शहरातून साप्ताहिक चालवणे म्हणजे तारेवरची कसरत! अनेकांनी प्रयत्न केले, अनेकांची वृत्तपत्रे बंद पडली. पण या सगळ्यांना छेद देत सौ. वैशाली घन:श्याम कडू यांनी 'साप्ताहिक प्रांजल'च्या माध्यमातून गेली १२ वर्षे उरणमध्ये पत्रकारितेचा झेंडा बुलंद ठेवला आहे.

घर, संसार, जबाबदाऱ्या आणि त्याचबरोबर समाजकारण या सगळ्यांचा समतोल साधत त्यांनी उरणमधून 'प्रांजल'ची ठाम सुरुवात केली. दर सोमवारी नियमित प्रसिद्ध होणारे हे साप्ताहिक आज उरणमधील सर्वसामान्यांचे 'हक्काचे व्यासपीठ' बनले आहे.

अन्यायग्रस्तांच्या वेदनांना शब्द देणे, प्रशासनाच्या ढिलाईवर बोट ठेवणे, सामान्य माणसाच्या प्रश्नांना आवाज देणे हे काम सौ. वैशाली कडू यांनी निर्भीडपणे केले. त्यांच्या लेखणीतून अनेक प्रश्न थेट सत्तेच्या दारात पोहोचले. त्यामुळे 'प्रांजल' हे केवळ साप्ताहिक न राहता जनतेचा लढवय्या आवाज ठरले आहे. त्यांच्या कार्याची दखल घेत द्रोणागिरी महोत्सवात 'द्रोणागिरी पुरस्कार' देऊन त्यांचा गौरव करण्यात आला. तसेच साई देवस्थान वहाळ तर्फे महिला दिनानिमित्त 'आदर्श महिला पुरस्कार' प्रदान करण्यात आला. हा सन्मान केवळ व्यक्तीचा नसून उरणमधील निर्भीड पत्रकारितेचा आहे.१२ वर्षांपूर्वी लावलेले 'प्रांजल'चे छोटे रोपटे आज भक्कम वटवृक्ष बनले आहे.

सामाजिक, शैक्षणिक आणि लोकहिताच्या प्रश्नांवर थेट प्रहार करणारे हे साप्ताहिक अल्पावधीतच उरणमध्ये प्रभावी ठरले आहे.

"लेखणी हीच ताकद, आणि सत्य हाच धर्म," या भूमिकेतून त्या समाजहितासाठी झुंज देत आहेत. आजपर्यंत सौ. वैशाली कडू यांनी आपल्या पत्रकारितेतून गोर गरीब सर्वसामान्य जनतेला न्याय दिला आहे. त्यामुळे एक आदर्श गृहिणी आदर्श संपादक म्हणून त्यांचा सर्वत्र गौरव होत आहे.

**शब्दांकन / लेखन – विठ्ठल ममताबादे, उरण**

# सामाजिक क्षेत्रातील सक्रिय महिला सामाजिक कार्यकर्त्या : भूमिका सिंह

भूमिका सिंह या लायन्स क्लब ऑफ द्रोणागिरी आणि द्रोणागिरी फाउंडेशनच्या अध्यक्षा आहेत. गेल्या अनेक वर्षांपासून त्या सामाजिक कार्यात सक्रिय असून समाजाच्या उन्नतीसाठी आपला वेळ, ऊर्जा आणि नेतृत्व समर्पितपणे देत आहेत. त्यांच्या कार्यातून समाजाबद्दलची जबाबदारी आणि गरजूंबद्दलची संवेदनशीलता स्पष्टपणे दिसून येते.

त्यांच्या सामाजिक कार्याची सुरुवात कपडे वाटप उपक्रम, बीच स्वच्छता अभियान आणि पर्यावरण संवर्धनासाठी वृक्षारोपण यांसारख्या साध्या पण अर्थपूर्ण उपक्रमांपासून झाली. छोट्या स्तरावर सुरू झालेले हे कार्य हळूहळू व्यापक मानवतावादी चळवळीत रूपांतरित झाले आणि त्यातून मोठ्या प्रमाणात सामाजिक परिवर्तन घडून आले.

शिक्षण आणि बालकल्याण हे त्यांच्या कार्याचे प्रमुख क्षेत्र ठरले. झोपडपट्टीतील मुलांना मोफत शिक्षण देणे, दर रविवारी शैक्षणिक उपक्रम आयोजित करणे, गरजू मुलांना मोफत अन्न वितरण करणे तसेच आर्थिक अडचणीत असलेल्या विद्यार्थ्यांची शाळेची फी भरणे अशा विविध उपक्रमांद्वारे त्यांनी शिक्षण क्षेत्रात महत्त्वपूर्ण योगदान दिले आहे. त्यांचा ठाम विश्वास आहे की शिक्षण हे गरिबीच्या दुष्टचक्रातून बाहेर पडण्याचे सर्वात प्रभावी साधन आहे.



भूमिका सिंह या ज्येष्ठ नागरिकांच्या सेवेसाठीही कटिबद्ध आहेत. निराधार व गरजू वृद्धांना आधार देऊन त्यांना वृद्धाश्रमात सन्मानाने स्थायिक करण्याचे कार्य त्यांनी केले आहे. त्यांच्या आयुष्याच्या उत्तरार्धात त्यांना योग्य काळजी, सन्मान आणि भावनिक आधार मिळावा यासाठी त्या सातत्याने प्रयत्नशील असतात. आरोग्य क्षेत्रातही त्यांनी विविध मोफत वैद्यकीय शिबिरे आयोजित करून गरजू नागरिकांना आवश्यक आरोग्यसेवा उपलब्ध करून दिली आहे.

तरुणांना योग्य दिशा देणे हे त्यांच्या कार्याचे आणखी एक महत्त्वाचे अंग आहे. त्या नियमितपणे सत्रे, नेतृत्व विकास कार्यशाळा आणि प्रेरणादायी कार्यक्रम आयोजित करून युवकांना सामाजिक जाणीव, जबाबदारी आणि व्यक्तिमत्त्व विकासासाठी प्रेरित करतात. त्यांच्या मार्गदर्शनामुळे अनेक युवक आणि ज्येष्ठ नागरिक समाजकार्यात सक्रिय सहभागी झाले आहेत.

लायन्स क्लबच्या सहकार्याने त्यांनी विविध क्षेत्रांमध्ये अनेक प्रभावी उपक्रम यशस्वीपणे राबवले आहेत. अलीकडेच त्यांच्या नेतृत्वाखाली ३५० हून अधिक हेल्मेटचे वाटप करून रस्ते सुरक्षिततेबाबत व्यापक जनजागृती करण्यात आली.

सामाजिक सेवेत दिलेल्या उल्लेखनीय योगदानाबद्दल त्यांना अनेक पुरस्कार आणि सन्मान प्राप्त झाले आहेत. त्यांचे समर्पण, करुणा आणि नेतृत्वगुण हे समाजात सकारात्मक व दीर्घकालीन बदल घडवण्याच्या त्यांच्या ध्येयाचे प्रतीक आहेत.

**शब्दांकन – विठ्ठल ममताबादे, उरण**

# अष्टपैलू महिला व्यक्तिमत्त्व : भाविका सुतार

रायगड जिल्ह्यातील सुधागड तालुक्यातील एक पोटलज खुर्द या लहानशा खेडेगावात ११ जुलै १९८७ रोजी शेतकरी कुटुंबात माझा जन्म झाला. माझे वडील चिंतामण हुले यांचा व्यवसाय शेती तर आई मोलमजुरी करत असत. तिला वाढवण्यासाठी तिच्या आजीचा मोठा हातभार होता. तिचे प्राथमिक शिक्षण आपल्या जन्म गावी पोटलज हिते झाले.ती अतिशय काटक असल्यामुळे तिला जंगलात जाऊन आंबे काढणे रानमेवा गोळा करणे,बैलगाडी हाकलने,विहिरीत पोहणे याची खूप आवड होती. कुटूंबाची परिस्थिती अतिशय बेताची म्हणून तिने पुढील शिक्षण पाली येथील मुलींच्या वसतिगृहात राहून १२ वी पर्यंत पूर्ण केले. तिला अभ्यासाबरोबर खेळाची देखील खूप आवड होती. शालेय स्पर्धे तून कबड्डी आणि खो खो खेळातून तालुका जिल्हा आणि राज्य स्तरीय खेळात आपली ओळख निर्माण केली.



महाराष्ट्र राज्य कबड्डी पंच परीक्षा उत्तीर्ण झाली.ती अतिशय जिद्दी, धाडसी, हुशार असल्यामुळे बारावीला कला शाखेत तालुक्यात प्रथम आली. आपल्या कुटूंबाचे नावलौकिक केले. तिची कौटुंबिक परिस्थिती गरीब असल्यामुळे तिला रोजगारासाठी मुबंई जावे लागले. मात्र तिचे मन तिते रमेना तिला शिक्षणाचा ध्यास लागला होता. त्यावेळी तिला मोठा भाऊ सुधीर आणि बहीण गीता यांनी स्वतःची हौसमौज न करता आपल्या बहिणीला शिक्षणासाठी आर्थिक मदत केली. तसेच त्याच्या गावात रहाणारे शिक्षक संजय थळे यांच्या सहकार्याने आणि मार्गदर्शनाने पुढील शिक्षणासाठी मदत झाली. तिच्यातील असणाऱ्या गुणवत्तेमुळे तिचा डीएडला माणगाव हिते नंबर लागला. दोन वर्षाचा डीएड अभ्यासक्रम पूर्ण झाल्यानंतर ती नागोठणे येथे कोकण एज्युकेशन सोसायटीच्या विद्यालयात सेवेत रुजू झाली. मात्र तिने आपले शिक्षण अविरत चालू ठेवले.

१५ मे २०१४ रोजी भूषण सुतार यांच्या बरोबर विवाह झाले. तिच्या कुटूंबात पती आणि एक मुलगा आणि मुलगी असा छोटे कुटूंब आहे त्यानंतर माझे उर्वरित शिक्षण पूर्ण करण्यास माझ्या पतीने मोलाचे सहकार्य केले.

लग्नानंतर मी एम ए शिक्षण, डीएसएम, बीएड अभ्यासक्रम पूर्ण करून माध्यमिक स्तरावर अध्यापन करण्याची संधी संस्थेनी उपलब्ध करून दिली. मी विद्यालयात अध्यापन करीत असताना मला विद्यालयाने जी जबाबदारी दिली ते आव्हान म्हणून स्वीकारून पूर्ण केली. मी ज्या परिस्थितीतून शिक्षण पूर्ण केले ती परिस्थिती बेताची होती मात्र आता तसे राहिली नाही काळ बद्दलला परिस्थिती बदलली मात्र नेहमी मी जाणीव ठेवूनच समाजात वावरत असते. माझा विद्यार्थी हा या देशाचा सुसंकृत नागरिक घडला पाहिजे हा माझी नेहमी प्रयत्न असतो. **

# आदर्श शासकीय कर्मचारी अपर्णा पंकज तांडेल

स्त्री म्हटली की अनेक भूमिका आल्या मुलगी, बहीण, पत्नी, आई, सासू अशा अनेक भूमिका एका स्त्रीला निभवाव्या लागतात. अशीच एक आदर्श भूमिका निभावत आहेत त्या उरण तालुक्यातील चिरनेर गावातले विद्युत वायरमन कै. नरेश रामा ठाकूर यांची जेष्ठ कन्या अपर्णा नरेश ठाकूर. वडिलांचा मृत्यू नंतर त्यांच्या जागेवर महावितरण जसखार शाखेत कार्यरत असलेल्या अपर्णा नरेश ठाकूर यांनी शिक्षण पूर्ण केले. नंतर केले. लग्नानंतर सौ. अपर्णा पंकज तांडेल या नावाने त्या सर्वांना परिचित झाल्या. सध्या ते वरिष्ठ तंत्रज्ञ म्हणून पदावर कार्यरत आहेत.त्या एक उत्तम गृहिणी, एक उत्तम सरकारी कर्मचारी आहेत. एक मुलगा त्याची सकाळी ७ ची शाळा, नवरा ओएनजीसी न्हावा येथे कामाला आहे. घरातली तयारी, दोघांचे डब्बे, घरातला काम आवरून स्वतःची नोकरी सांभाळतात, त्यातच अपर्णा या वसुली पथकात असल्याने रोज प्रत्येक गावात जाऊन महाविरणच्या ग्राहकांना भेटते व भेटून वसुली करते. अपर्णा यांना कामावर असताना विविध समस्यांना सामोरे जावे लागते. पण त्या कधीही निराश झालेल्या नाहीत. वेळच्या वेळी दिलेली वसुली यादी नेहमी पूर्ण करतात, घरी आल्यावर कामाचा ताण -तणाव घराच्या बाहेर ठेवायचं या तत्वाने त्या वागतात. अपर्णा नरेश ठाकूर उर्फ सौ. अपर्णा पंकज तांडेल व श्री पंकज पंढरीनाथ तांडेल ही आदर्श पती पत्नीची जोडी आहे. अपर्णा यांच्या पाठीशी त्यांच्या सुख दुःखात त्यांचे पती पंकज तांडेल (चिरनेर उरण) हे नेहमी उभे असतात. त्यांचे नेहमी सहकार्य असते.एक आदर्श पत्नी, एक आदर्श आई म्हणून त्या सर्वांना परिचित आहेत. अपर्णा यांचा कुटुंबाला अभिमान वाटतो. घरात असताना व घराबाहेर शासकीय कर्मचारी म्हणून कार्यरत असताना एक आदर्श व्यक्तिमत्व म्हणून जनता त्यांच्याकडे पाहते.



**शब्दांकन – विठ्ठल ममताबादे, उरण**



# स्त्री संवेदना

स्वतंत्र आम्ही, स्वयंसिद्धा आम्ही,
तरीही का थट्टेचा विषय आम्ही,
रणरागिणी आम्ही, चंडिका आम्ही,
तरीही का असुरक्षित आम्ही,
बलात्कारीचे का सावज आम्ही,
आत्मनिर्भर आम्ही,
निर्धारी आम्ही,
तरीही का निराधार आम्ही,
धोरणी आम्ही,
कार्यक्षम आम्ही,
तरीही का अबला आम्ही,
वात्सल्य आम्ही,
करुणा आम्ही,
सण आम्ही, उत्सव आम्ही,
तरीही एकच दिवस का
महिला दिनाचा,
रोजच होऊ दे जागर
स्त्री- शक्तीचा,
वाण ते हळदीकुंकवाचे,
वसा तो सावित्रीचा,
स्त्रीत्वाची जाणीव मनी,
एकी पोटी दुसरी जन्म घेई,
तरीही का असे ती पोरकी,
भावनाशील आम्ही,
एकमेकींच्या सखी आम्ही,
तरीही का मनमोकळ्या
संवादाची अढी मनी, तोडून बंधन
कडवटपणाचे,
जोडूया एक नवे नाते,
माझी वेदना,तुझी संवेदना व्हावी,
मी एक स्त्री, तुझ्यातील
स्त्रीत्वाचा सन्मान करी.



– दिव्या पवार
(चेंबूर कर्नाटक हायस्कूल, सहाय्यक शिक्षिका)

# यशस्वी व्यावसायिका रोशनी गुरव

एक गृहिणी ते एक यशस्वी व्यावसायिका म्हणून रोशनी गुरव ह्या गृहिणी आपले घर सांभाळताना, खूप संघर्ष करून टेलरिंग क्षेत्रात काम करून आपले नाव व्हावे, याकरिता काहीतरी नवीन करावे म्हणून नऊवारी साडीचे तीन ठिकाणी प्रशिक्षण घेऊन मागील सात आठ वर्षापासून उरण शहरात बाजारपेठ मध्ये नऊवारी साडी शिवण्याचे काम करत आहेत, आज त्यांच्याच नावाने रोशनी नऊवारी साडी म्हणून त्यांचे दुकान उरणमध्ये प्रसिद्ध आहे. उरण शहरात नऊवारी साडी शिवण्याचे एकमेव दुकान असा त्यांचा प्रवास चालू आहे. आपले नाव करून एक यशस्वी गृहिणी ते एक यशस्वी व्यावसायिका म्हणून त्यांनी त्यांची ओळख निर्माण केली आहे.आदर्श गृहिणी, आदर्श पत्नी अशा वेगवेगळ्या भूमिका निभावत त्यांनी व्यवसायात उंच गगन भरारी घेतली आहे. विश्वास, प्रामाणिकपणा, कार्यतत्पर, ग्राहकांना नम्रतेने बोलणे, वेळच्या वेळी सर्व कामे करणे हे त्यांच्या व्यक्तिमत्वाची वैशिष्ट्य आहेत. सर्वसामान्य गृहिणी ते एक यशस्वी व्यावसायिक म्हणून त्यांची सर्वत्र ओळख आहे. महिलांच्या गरजा ओळखून त्यांनी त्या गरजा पूर्ण करण्याच्या दृष्टीने, महिलांना चांगली सेवा सुविधा देण्याच्या दृष्टीने व्यवसायात प्रवेश केला व त्या यशस्वी सुद्धा झाल्या आहेत. त्यांच्या या आदर्श व्यक्तिमत्त्वाची सर्व महिला प्रेरणा घेत आहेत. आदर्श घेत आहेत.



**शब्दांकन – विठ्ठल ममताबादे, उरण**

# शिक्षण क्षेत्रातील आदर्श व्यक्तिमत्व ज्योती पाटील

श्रीमती ज्योती ज्ञानेश्वर पाटील यांचे शिक्षण डी.एड., बी.ए., बी.एड., डिप्लोमा इन स्कूल मॅनेजमेंट असे असून २०१३ पासून त्या जनरल एज्युकेशन इन्स्टिट्यूट (नेटिव्ह इन्स्टिट्यूट) च्या इंग्लिश मिडीयम मध्ये शिक्षक म्हणून कार्यरत आहेत व २०२० पासून प्राथमिक इंग्लिश मिडीयम स्कुल मध्ये मुख्याध्यापक म्हणून कार्यरत आहेत. ज्योती पाटील यांनी आपल्या कार्यातून नेतृत्व, कर्तृत्व व प्रभावी वक्तृत्वाची उज्ज्वल परंपरा जोपासली आहे. शैक्षणिक, सांस्कृतिक, क्रीडा व सामाजिक क्षेत्रात विद्यार्थ्यांना ज्ञानरूपी दागिन्यांप्रमाणे पैलू पाडण्याचे कार्य आजपर्यंत त्यांनी अत्यंत एकनिष्ठेने केले आहे. ज्योती पाटील यांच्या व्यक्तिमत्त्वात शिस्त, संवेदनशीलता, दूरदृष्टी आणि कार्यतत्परता यांचा सुंदर संगम दिसून येतो. विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी त्या केवळ शिक्षणच देत नाही, तर संस्कार, मूल्ये आणि आत्मविश्वासही देत असतात.



बुद्धिचातुर्य, अचूक निर्णयक्षमता आणि व्यवस्थापन कौशल्य यांमुळे ज्योती पाटील या अध्यापन क्षेत्रात उल्लेखनीय व प्रेरणादायी कार्य करत आहेत. ज्ञानसागरात मुक्त विहार करणाऱ्या राजहंसांना ज्ञानरूपी अमृतकण पोहोचविणाऱ्या ज्योती पाटील यांना सन २०२३-२४ चा संस्थेचा दादासाहेब तात्याबा सातपुते स्मृती पुरस्कार तसेच श्री. ज्ञानेश्वर तुकाराम मेटकरी पुरस्कृत आदर्श मुख्याध्यापक पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले, ही अत्यंत अभिमानाची बाब आहे. सामाजिक क्षेत्रातून शाळेसाठी उपयुक्त शैक्षणिक साहित्य उपलब्ध करून देण्याचे सातत्यपूर्ण प्रयत्न ज्योती पाटील करत आहेत.ज्योती पाटील यांच्या प्रेरणादायी नेतृत्वामुळे शिक्षकवर्गात उत्साह, विद्यार्थ्यांमध्ये आत्मविश्वास आणि पालकांमध्ये विश्वास निर्माण झाला आहे. शिक्षण क्षेत्रातील एक आदर्श व्यक्तिमत्व म्हणून त्या सर्वांना सुपरिचित आहेत.

**शब्दांकन – विठ्ठल ममताबादे, उरण**

# स्वर, संस्कार आणि स्वावलंबनाचा प्रवास पूनम पाटेकर

आजच्या काळात महिला अनेक क्षेत्रांमध्ये आपली वेगळी ओळख निर्माण करत आहेत. कला, शिक्षण, समाजकार्य आणि उद्योजकता या सर्व क्षेत्रांत उल्लेखनीय काम करणाऱ्या पूनम पाटेकर या त्यापैकी एक प्रेरणादायी व्यक्तिमत्त्व आहेत. गायिका, संगीत शिक्षिका, महिला उद्योजिका आणि समाजसेविका म्हणून त्यांनी समाजात आपला ठसा उमटवला आहे.



पूनम पाटेकर यांनी B.A., ECCEd .., तसेच Diploma in Shipping & Logistics ही शैक्षणिक पात्रता प्राप्त केली आहे. त्याचबरोबर त्या CSC VLE आणि UIDAI Supervisor म्हणूनही कार्यरत आहेत. संगीत क्षेत्रात त्यांनी संगीत विशारद (हार्मोनियम) द्वितीय पूर्ण केले असून संगीत विशारद (गायन) तृतीय मध्ये शिक्षण घेत आहेत.

संगीत हा त्यांच्या आयुष्याचा अविभाज्य भाग आहे. मागील २४ वर्षांपासून त्या संगीत क्षेत्रात सक्रिय आहेत. त्यांनी अनेक गाणी रेकॉर्ड केली असून ४०० हून अधिक स्टेज कार्यक्रम सादर केले आहेत. चिपळूण, रत्नागिरी, दापोली, मंडणगड, श्रीवर्धन, गोरेगाव, माणगाव, महाड, उरण आणि वाशी या ठिकाणी त्यांच्या कार्यक्रमांना मोठा प्रतिसाद मिळाला आहे.

स्पर्धांमध्येही त्यांनी उल्लेखनीय यश मिळवले आहे. महाड आयडॉल (२००८) तसेच उरण द्रोणागिरी आयडॉल मध्ये सलग तीन वर्षे त्यांनी आपली कला सादर केली. Sur Maharashtra Online Singing Competition मध्ये प्रथम क्रमांक आणि Maharashtra News १८ गायन स्पर्धामध्ये द्वितीय क्रमांक मिळवून त्यांनी आपली गुणवत्ता सिद्ध केली आहे. अनेक गायन स्पर्धांमध्ये त्या परीक्षक म्हणूनही काम करत आहेत.

संगीत शिक्षणाची आवड लक्षात घेऊन त्यांनी Surganga Music Hub & Academy" ची स्थापना केली. या अकादमीद्वारे सर्व वयोगटातील विद्यार्थ्यांना गायनाचे शिक्षण दिले जाते. याशिवाय त्यांना शाळेत शिक्षिका म्हणून ७ वर्षांचा अनुभव आहे. त्यांनी स्वतःचा म्युझिक ग्रुप देखील तयार केला आहे.सामाजिक कार्यातही त्यांचे योगदान उल्लेखनीय आहे. त्या अनाथाश्रम, वृद्धाश्रम आणि मूक-बधिर मुलांना आर्थिक व वस्तुरूप मदत करतात. तसेच महिलांमध्ये मासिक पाळीविषयी जागृती करण्यासाठी मार्गदर्शन करतात. शाळेच्या सुट्ट्यांमध्ये त्या बालसंस्कार वर्ग घेऊन मुलांना गाणी, प्रार्थना आणि स्तोत्रांद्वारे संस्कार देण्याचे काम करतात.उद्योजकतेच्या क्षेत्रात त्या असून व्यवसायासाठी लागणारी सरकारी लायसन्स व सर्टिफिकेट सेवा तसेच सर्व प्रकारच्या विमा सेवा उपलब्ध करून देतात. महिलांच्या आरोग्याचा विचार करून त्यांनी FRELAX – Organic Cotton Sanitary Napkins हा उपक्रम सुरू केला. या उपक्रमातून त्या व म्हणून काम करत असून १६ महिलांना घरबसल्या व्यवसायाची संधी उपलब्ध करून दिली आहे.

**शब्दांकन – विठ्ठल ममताबादे, उरण**

# सामाजिक व शैक्षणिक क्षेत्रातील संगिता ढेरे

उरण परिसरातील सामाजिक कार्यकर्त्या व शिक्षिका सौ. संगिता सचिन ढेरे यांनी महिला सक्षमीकरण, आरोग्य जनजागृती आणि शिक्षण प्रसार या क्षेत्रांत सातत्यपूर्ण व प्रभावी कार्य करत समाजात आपली वेगळी ओळख निर्माण केली आहे. यांचे शिक्षण एम .ए. बी. एड.आहे. हिरकणी वृत्तपत्राच्या कार्यकारी संपादक देखील आहेत. समाजकार्य करून पहिली ते दहावी विद्यार्थ्यांचे क्लासेस देखील घेतात. महिला सक्षमीकरण होण्यासाठी यांची नेहमीच धडपड राहते महिलांना रोजगार व स्वयंरोजगार कसा मिळेल याची कार्यशाळा घेऊन त्यांना बाजारपेठ उपलब्ध करून देण्याचा पाठपुरावा करतात. महिला दिनाच्या निमित्ताने त्यांच्या कार्याचा घेतलेला आढावा अनेकांसाठी प्रेरणादायी ठरत आहे.



गेल्या अनेक वर्षांपासून त्या श्री समर्थ कृपा सखी स्वयंसहायता संस्था, उरण यांच्या माध्यमातून महिलांना स्वावलंबी बनविणे, बचत गटांना मार्गदर्शन करणे, आरोग्य तपासणी शिबिरे आयोजित करणे, तसेच मुलांच्या शैक्षणिक प्रगतीसाठी विविध उपक्रम राबवत आहेत. विशेषतः ग्रामीण व गरजू घटकांपर्यंत पोहोचून त्यांनी केलेले काम उल्लेखनीय मानले जाते. त्यांच्या या सातत्यपूर्ण सामाजिक योगदानाची दखल विविध स्तरांवर घेण्यात आली असून त्यांना शासनाचा मानाचा अहिल्याबाई होळकर पुरस्कार जाहीर झाला आहे. याशिवाय रायगड भूषण, महाराष्ट्र भूषण यांसह एकूण १७ विविध पुरस्कारांनी त्यांना गौरविण्यात आले आहे. सौ. संगीता सचिन ढेरे यांच्या कार्यामुळे परिसरातील अनेक महिलांना आत्मविश्वास मिळाला असून स्वावलंबनाकडे वाटचाल करण्याची प्रेरणा मिळत आहे.

**शब्दांकन – दिनेश पवार**

# पहिल्या महिला संपादक

मुक्तांगण
प्रा. शाम जोगळेकर
मो. ९२७३३४३१७७



एकोणिसावे शतक हे भारताच्या आणि विशेषतः महाराष्ट्राच्या दृष्टीने महत्त्वाचे मानले जाते. या काळात महाराष्ट्राच्या समाजमनात सर्वांगीण जागृती घडविण्याचा प्रयत्न विविध प्रकारे घडून आला. राजकीय जाणिवा, परंपरांवर प्रहार करणारा, सामाजिक परंपरा नाकारणारा तसेच माणूसपणाला आकार देणारा विचार महाराष्ट्रात जागृत झाला. या काळात महात्मा जोतिबा फुले यांनी, २४ सप्टेंबर १८७३ रोजी सत्यशोधक समाजाची स्थापना केली. महात्मा फुले आणि सावित्रीबाई फुले यांनी शिक्षणाचे महत्त्व ओळखून, शिक्षण प्रसाराचे बहुमोल कार्य केले. विशेषतः स्त्रीने शिक्षित व्हायला हवे, हे ओळखून स्त्री शिक्षणाचे काम, विविध अडचणींना तोंड देत सुरू केले आणि सुरू ठेवले. हा राजकीय, सामाजिक, आर्थिक संक्रमणाचा समाजजागृती घडवून आणणारा कालखंड होता. सत्यशोधक समाजाच्या मुशीत तयार झालेल्या कार्यकर्त्यांनी महात्मा फुलेंचा विचार आपल्या कृतीशील कामातून पुढे नेला.

फुले दांपत्याच्या पुढाकाराने स्त्रियांना शिक्षणाची संधी मिळाली. त्यामुळे आपले प्रेरणादायी विचार मांडण्याचा आणि सामाजिक सुधारणेसाठी प्रयत्न करण्याचा त्यांना हक्कही प्राप्त झाला. त्यामुळे अनेक स्त्रिया पुढे आल्या आणि विविध क्षेत्रांत कार्य करू लागल्या. सत्यशोधक चळवळीतील कार्यकर्ते, देवराव कृष्णाजी ठोसर यांची कन्या, तानुबाई यांचा जन्म १८७६ मध्ये, पुणे येथे झाला. बालपणी महात्मा फुले आणि सावित्रीबाई फुले यांचा सहवास तानुबाईंना लाभला. त्यांचे वडील म. फुले यांचे सहकारी होते आणि त्यांच्या शेजारी राहत होते. सावित्रीबाईंची तानुबाई ही मानसकन्या होती.

तानुबाई आणि वासुदेवराव बिर्जे यांचा विवाह, रविवार, दिनांक २९ जानेवारी १८९३ रोजी सत्यशोधकी पद्धतीने पुण्यात पार पडला. त्यासंबंधीचे वृत्त 'शेतकऱ्यांचा कैवारी' या वृत्तपत्रात प्रसिद्ध झाले होते. या विवाहाला पुणे सत्यशोधकसमाजाचे अध्यक्ष डॉ. विश्राम रामजी घोले, 'दीनबंधू'कार नारायणराव लोखंडे, पंडिता रमाबाई यांची विशेष उपस्थिती होती. कृष्णराव भालेकर यांनी 'दीनबंधू' वृत्तपत्र १८७७ मध्ये सुरू केले. त्यानंतर नारायण मेघाजी लोखंडे, भास्करराव जाधव आणि वासुदेवराव बिर्जे यांनी अनुक्रमे 'दीनबंधू' वृत्तपत्राची जबाबदारी स्वीकारली होती. वासुदेवराव बिर्जे यांच्या अकाली निधनानंतर काही महिने, 'दीनबंधू' वृत्तपत्राची जबाबदारी भगवंतराव पाळेकरांनी घेतली होती. परंतु 'दीनबंधू' वृत्तपत्राच्या धोरणात्मक निर्णयामुळे ते या वृत्तपत्रापासून वेगळे झाले. अशा प्रतिकूल परिस्थितीत 'दीनबंधू' बंद पडण्याची शक्यता निर्माण झाली. अशा स्थितीत तानुबाई बिर्जे यांनी 'दीनबंधू' वृत्तपत्राची जबाबदारी स्वीकारून, कठीण प्रसंगांना तोंड देत, ही जबाबदारी यशस्वीपणे पार पाडली. १९०८ ते १९१३ या काळात बहुजन समाजातील एका स्त्रीने, पती निधनानंतर प्रस्थापित व्यवस्थेशी सामना करत, गरीब, अडाणी, पीडित, कुणबी, दलित, स्त्री आणि मागास जनसमूहांच्या शोषणमुक्तीचा आणि उन्नतीचा आवाज उठवणारे, परिवर्तनवादी विचाराचे वृत्तपत्र यशस्वीपणे चालविले होते. ही बाब मराठी पत्रकारितेच्या इतिहासात, विशेषत्वाने नोंदविण्यासारखी आहे. तानुबाई यांचे 'दीनबंधू' वृत्तपत्रातील लेखन सर्वसमावेशक स्वरूपाचे होते. त्यांनी वेगवेगळ्या विषयांवर आपल्या अग्रलेखांतून प्रकाश टाकला होता. प्राचीन काळातील राज्यव्यवस्थेवर त्या लिहितात, 'जनतेच्या सुखदुःखात राजघराण्यांना अजिबात रस नव्हता. त्यामुळे रयतही या घराण्यांपासून फटकून राहत असे. राजा, मंत्रिमंडळ आणि प्रशासनातील कारभाऱ्यांकडून रयतेचा सतत छळ होत असे. 'दीनबंधू' च्या दिनांक २४ ऑगस्ट १९१२ च्या अंकात या अग्रलेखमालेतील तिसरा भाग प्रसिद्ध झाला होता. या भागात तानुबाईंनी आपल्या लिखाणात धार्मिक, प्रादेशिक विविधतेमुळे मवाळ आणि जहाल यांच्यातील वैचारिक मतभेदांमुळे भारतासारख्या खंडप्राय देशात बहुमत लोकानुसारी राज्यपद्धतीस अनुकूल वातावरण नसल्याचे स्पष्ट प्रतिपादन केले होते. ३१ ऑगस्ट १९१२ च्या अंकात हिंदू धर्मातील विषमता समाप्त होऊन सामाजिक समता प्रस्थापित होणे अगत्याचे असल्याचे प्रतिपादन त्यांनी केले होते. 'समताधिष्ठित हिंदुस्थानात त्यानंतर बहुमत लोकानुसारी राज्यपद्धतीस राजकीय आणि सामाजिक वातावरण तयार होईल,' या तानुबाईंच्या आशावादाची फलश्रुती अजूनही झाल्याचे दिसत नाही. एखादा अपवाद वगळता ही राजकीय अग्रलेख माला त्यांनी सलग महिनाभर लिहिली.

२७ जुलै १९१२ च्या अंकातील, मुंबई इलाख्यातील 'लेजिस्लेटिव्ह कौन्सिल आणि बहुजन समाज' हे तानुबाईंचे आणखी एक असाधारण ऐतिहासिक, राजकीय संपादकीय आहे. 'मुंबई इलाख्यात बहुसंख्येने असणाऱ्या, बहुजन समाजाच्या कुचंबणेचे चित्रण अग्रलेखात दिसते. या प्रांतातील बहुजन समाजाच्या दुःखाबद्दल बोलताना तानुबाई म्हणतात, 'दुःखाची बाब अशी आहे की, या प्रश्नासंबंधाने आमच्या कौन्सिलात क्वचितच ऊहापोह होतो. बहुजन समाजाच्या हिताविषयी कायदे कौन्सिलात अगोदर प्रश्नच निघणे कठीण आणि कदाचित निघालाच तर त्याला पुष्टी देणारा मिळणे कठीण. अशा रीतीने आमच्या कौन्सिलात बहुजन समाजाच्या हिताविषयी अनास्था दिसून येते आहे. कौन्सिलमधील सभासदांच्या

स्थितीविषयी तानुबाई म्हणतात, 'कायदे कौन्सिलात किंबहुना सरकार दरबारात ज्या लोकांचा प्रवेश होऊ शकतो अथवा होत आहे, त्या लोकांच्या आणि बहुजन समाजाच्या चालीरीती व आचारविचार यामध्ये महदंतर असल्यामुळे कौन्सिलात सभासदांना या मुक्या समाजाची ओरड ऐकू जावी कशी?' असा सार्थ प्रश्न त्या उपस्थित करतात. प्राथमिक शिक्षणासारख्या मुलभूत गोष्टीकडे दुर्लक्ष करून राष्ट्रीय सभा उच्च शिक्षणाची, अधिकाधिक सवलतींची मागणी करीत होती. राष्ट्रीय सभेच्या वर्गीय व वर्णीय मर्यादेवर बोट ठेवून सभेच्या धोरणावर तानुबाईंनी कडक टीका केली. देशातील नव्वद टक्के लोक अक्षरशत्रू असताना, राष्ट्रीय सभेचे धोरण व तिने हाती घेतलेले विषय यांचा विचार करू गेले असता सुशिक्षित वर्गातील बुद्धिमान लोकांचा सरकारी नोकरीत मोठमोठ्या हुद्यांवर अथवा कायदे कौन्सिलात प्रवेश होण्यासाठी ठराव पास करून सरकारकडे दाद मागणे यापलीकडे तिने आपल्या कर्तुत्वाचा ओघ वळविला आहे, असे म्हणता येणार नाही. असे तानुबाईंनी 'राष्ट्रीय सभेचे एकेरी धोरण' या अग्रलेखामध्ये निदर्शनास आणले होते. शूद्र-अतिशूद्रांचे धर्माच्या व वर्णजातीव्यवस्थेच्या रूपाने होणारे शोषण, त्यांच्या वाट्याला येणाऱ्या अमानुष वेदना, दुःख, गरिबी यांच्याकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष करणाऱ्या राष्ट्रीय सभेला तानुबाईंनी आपल्या अग्रलेखांतून धारेवर धरले होते. तानुबाई यांनी सामाजिक जागृती विषयीचे विचारही ठामपणे मांडले होते. त्यांच्या ८ जून १९१२च्या अंकातील एक लेख क्रांतिकारक म्हणावा असा आहे. 'सार्वजनिक सत्यनारायण एक नवीन टूम' हा अग्रलेख लिहून त्यांनी समाजातील अंधश्रद्धांवर प्रहार केलेला दिसतो. त्यानंतरच्या 'रूढी' या लेखात, 'बहुजन समाजात आचारविचारांचे धोरण इष्टनिष्टतेवर अवलंबून न राहता जुने तेवढी चांगले आणि नवे तेवढे वाईट याप्रमाणे सर्वत्र दुराग्रह पसरू लागतो. या दुराग्रहामुळे अंध बनून जनता रुढींचे दास बनली आहे. परंतु पुरुषाने एकापेक्षा अधिक स्त्रिया करून स्वतःच्या विषयासक्तीचे प्रदर्शन करावयाचे. स्त्रियांनी पुरुषांच्या सेवेत तत्पर राहावे म्हणून ज्या मातेच्या पोटी जन्म घेतला तिची अवहेलना करून 'न स्त्री स्वातंत्र्यमर्हति' यासारखी अनुदार वचने शास्त्रातून प्रतिपादन करावयाची, असा हा सर्व प्रकार रूढीचा परिणाम आहे'' आधुनिक ज्ञानविज्ञानाच्या प्रकाशामध्ये रुढींना आळा बसेल, असा आशावाद तानुबाई बिर्जे यांनी व्यक्त केला आहे. सामाजिक परिस्थितीचे सूक्ष्म निरीक्षण करून सामाजिक बदलाची अपेक्षा त्यांनी व्यक्त केली आहे. तानुबाईंनी प्रचलित शिक्षण पद्धतीस विरोध केला. 'बहुजन समाजास हल्लीच्या एकदेशीय शिक्षण पद्धतीने आणि दंतकथांनी ओथंबलेल्या भाकडकथांनी या वाङ्मयावर पूर्ण छाप बसविलेली आहे. अशा वाङ्मयाच्या शिक्षणापासून आम्हास मानव जन्माची महती कळेल असे वाटत नाही (दीनबंधू, ४ मे १९१२) 'माणूसकेंद्रित' शिक्षणाची गरज त्यांनी व्यक्त केली. मानवी प्रतिष्ठा, मानवी मूल्ये, समता, बुद्धिवाद, जीवनाभिमुख, सर्जनशील शिक्षणाची गरज त्यांनी आपल्या लेखनातून व्यक्त केली. मराठीतील आद्य स्त्री संपादक, तानुबाई बिर्जे यांचे विचार आजही मार्गदर्शक आहेत. तानुबाई या मराठीतील पहिल्या महिला संपादक. १९०८मध्ये, त्यांनी 'दीनबंधू' वृत्तपत्राचे संपादकपद स्वीकारले आणि १९१३ पर्यंत, म्हणजे त्यांच्या मृत्यूपर्यंत, ही जबाबदारी पार पाडली. मात्र मराठीतील पहिली स्त्री संपादक होण्यासाठी, ७६ वर्षांचा प्रदीर्घ काळ लागला होता. मात्र मराठीतील आद्य पुरुष आणि स्त्री संपादक, हे अल्पायुषी होते. स्त्रियांच्या उन्नतीसाठी तो अत्यंत प्रतिकूल काळ होता. आजही ही परिस्थिती पूर्णपणे सुधारलेली दिसत नाही. समाजातील काही क्षेत्रेच स्त्रियांसाठी मुक्त झाली आहेत. सर्व क्षेत्रांमध्ये स्त्री-पुरुष समानता, खऱ्या अर्थाने निर्माण झाल्याचे दिसत नाही.

खऱ्या अर्थाने स्त्री-पुरुष समानता निर्माण झाल्याशिवाय, स्त्रियांवरील अन्याय आणि अत्याचार दूर होण्याची शक्यता नाही. अजूनही स्त्री-पुरुष विषमता आपल्या समाजात मोठ्या प्रमाणात, अनेक बाबतीत दिसून येते. समाज, कुटुंब आणि राष्ट्र म्हणून महिलांना समान संधी, समान हक्क, शिक्षण आणि सन्मान मिळाल्यास आणि त्यांच्यावरील सर्व प्रकारचे होणारे अन्याय दूर झाल्यास, संपूर्ण समाजाची सर्वांगीण प्रगती वेगाने होईल. **

# प्रत्येक स्त्री सन्माननीय!

जगन घाणेकर

जागतिक महिला दिन म्हणजे स्त्रियांच्या सन्मानाचा, स्त्रीशक्तीला गौरवण्याचा दिवस. महिला दिनानिमित्त आपल्या कर्तृत्वाने यशाची उत्तुंग शिखरे गाठणाऱ्या, प्रतिकूल परिस्थितीवर मात करून विविध क्षेत्रांत आपले कर्तृत्व सिद्ध करणाऱ्या आणि पुरुषांच्या खांद्याला खांदा लावून निरनिराळ्या क्षेत्रांत उच्च पदे भूषवणाऱ्या महिलांचा यथार्थ सन्मान करण्यात येतो. आजची स्त्री कोणत्याही क्षेत्रात पुरुषांच्या तिळमात्र मागे नाही हे सत्य मान्य करावेच लागेल. हिंदू धर्मशास्त्राने स्त्रीचा उल्लेख शक्ती असा केला आहे. कोणत्याही कार्यासाठी शक्ती ही आवश्यकच असते. शक्तीविना सजीवता येत नाही. त्यामुळे केवळ समाजात आपले कर्तृत्व सिद्ध करणारी स्त्री सन्मानास पात्र नसून कुटुंबातील प्रत्येक स्त्री ही तितकीच सन्माननीय आहे.

आज कोणत्याही घरात स्त्रीविना पान हलत नाही. नोकरी व्यवसाय करणाऱ्या पुरुषांना सप्ताहातून एक ते दोन दिवस सुट्टी मिळते; मात्र नोकरी करणाऱ्या किंवा न करणाऱ्या स्त्रीच्या नशिबी सुट्टी कुठे असते? कार्यालयातून कितीही थकून भागून आली तरी घरी आल्यावर कुटुंबियांसाठी जेवण बनवणे, भांडी घासणे, घर आवरणे, कपडे धुणे यांसारखी कामे तिला करावीच लागतात. भगवंताने गर्भधारणेचा अधिकार केवळ स्त्रीला बहाल केला आहे, कारण गर्भाचे सुयोग्य पालन पोषण करणे, मरणप्राय प्रसूती वेदना सहन करून एका जीवाला जन्म देणे हे केवळ स्त्रीच करू शकते हे त्यालाही ज्ञात आहे. प्रत्येक कर्तृत्ववान पुरुषाच्या मागे स्त्री असते असे म्हटले जाते ते खरेच आहे. कारण पुरुषाला त्याचे कर्तृत्व सिद्ध करण्याची मोकळीक देणारी, त्याच्या दैनंदिन गरज पुरवणारी, आजारपणात त्याची काळजी घेणारी आणि त्याला त्याच्या कार्यात प्रोत्साहन देणारी स्त्रीच असते, मग ती स्त्री पत्नी असो, आई असो वा बहीण असो. तिच्याविना त्याचे कर्तृत्व अधुरे आहे. हे झाले यशस्वी पुरुषांबद्दल. सामान्य घरांतही हीच स्थिती असते. स्त्री जरी कमावती नसली तरी घरातील सासू सासरे यांची काळजी घेणे, त्यांचे पथ्यपाणी, आहार विहार सांभाळणे, मुलांचा अभ्यास घेणे, आहारातील त्यांच्या आवडी निवडी जपणे, त्यांच्या आरोग्याची काळजी घेणे, आजारपणात त्यांना तळहाताच्या फोडाप्रमाणे जपणे, त्यांचे लाड पुरवणे. घरातील दैनंदिन कामे वेळेत उरकणे, घरात काय हवे नको ते पाहणे, पतिकडून मासिक खर्चासाठी मिळणाऱ्या पैशांतून घर खर्चाचे गणित जुळवणे अशी कितीतरी कामे तिला न थकता न दमता प्रतिदिन करावी लागतात. हे सर्व करत असताना तिला होणाऱ्या शारीरिक त्रासांकडेही ती दुर्लक्ष करते, स्वतःच्या आवडीनिवडी बाजूला ठेवून घरातील इतरांच्या आवडी निवडींना प्राधान्य देते, स्वतःचे छंद, कौशल्य यांकडे दुर्लक्ष करते आणि हे सर्व वर्षातील ३६५ दिवस ती अविरतपणे करत असते, म्हणून सन्मान अशा गृहिणींचाही व्हायला हवा कारण तिच्याविना कटुंबाचे रहाटगाडे चालणे केवळ अशक्य आहे. स्त्री जन्माला येते तेव्हाच तिच्या जन्मासोबत काही जबाबदाऱ्याही ती घेऊन येते. आपल्या शिलरक्षणाची जबाबदारी, आई वडिलांच्या नावाला बट्टा लागू न देण्याची, सदैव त्यांची मान ताठ ठेवण्याची जबाबदारी, विवाहानंतर पतीसह सासरच्या कुटुंबीयांची जबाबदारी, मुलांवर चांगले संस्कार घडवण्याची जबाबदारी, संसाराचे गाडे व्यवस्थित चालवण्याची जबाबदारी. आयुष्यभरात अशा कितीतरी जबाबदाऱ्या ती न चुकता, न कंटाळता यशस्वीपणे पार पडते. त्यामुळे केवळ कर्तृत्ववान महिलांचा सन्मान करून चालणार नाही, तर प्रत्येक स्त्रीचा, प्रत्येक गृहिणीचा सन्मान केला जावा. हा सन्मान घरातील आणि समाजातील प्रत्येक पुरुषाने केला पाहिजे ! **

जागतिक महिला दिन विशेष





# सन्मानासोबत आत्मपरीक्षणही आवश्यक

अनिकेत शेटे

८ मार्च, जागतिक महिला दिन. दरवर्षी या दिवशी स्त्रियांच्या अधिकारांबद्दल मोठ्या प्रमाणावर बोलले जाते. मात्र अधिकारांची भाषा जितक्या जोरात ऐकू येते, तितक्याच प्रामाणिकपणे जबाबदाऱ्यांची आठवण करून देणारे आवाज फारसे ऐकू येत नाहीत. आज स्त्रियांच्या संरक्षणासाठी अनेक कडक कायदे तयार झाले आहेत. परंतु दुर्दैवाने काही वेळा हेच कायदे खोटे आरोप, सूडभावना किंवा वैयक्तिक फायद्यासाठी वापरले जाताना दिसतात. कायद्याचा गैरवापर हा केवळ व्यक्तीवरच किंवा कुटुंबावरच नव्हे तर संपूर्ण समाजावर अन्याय करणारा ठरतो. अशा प्रकारच्या वर्तनामुळे खऱ्या अर्थाने अन्याय सहन करणाऱ्या स्त्रियांचा आवाज कमकुवत होतो आणि समाजाचा स्त्रीवरील विश्वासही ढासळतो.

समाज स्त्रीला ''माता'', ''भगिनी'' म्हणून आदर देतो. पण त्या आदराचा गैरफायदा घेणे, पुरुषांविरुद्ध खोट्या तक्रारी करणे किंवा भावनांचा आधार घेऊन परिस्थितीचा गैरफायदा घेणे हे या नात्यांना कलंक लावणे आहे.

आजकाल ''मॉडर्न'' होण्याच्या नावाखाली काही जणी प्रत्येक क्षेत्रात पुरुषांशी बरोबरी करण्याची चढाओढ करताना दिसतात. ''आम्ही पुरुषांपेक्षा कमी नाही'' हे सिद्ध करण्याच्या प्रयत्नात कधी कधी व्यक्तीची खरी ताकद म्हणजे तिचा संयम, संवेदनशीलता आणि संतुलनक्षमता यांचाच विसर पडतो. समानतेचा अर्थ स्पर्धा किंवा संघर्ष नसून परस्पर आदर आणि एकमेकांप्रती पूरकता आहे, हे लक्षात घेणे आवश्यक आहे.

काही महिलांमध्ये ''मी स्त्री आहे, त्यामुळे मला नेहमीच विशेष वागणूक मिळाली पाहिजे'' अशी अपेक्षा दिसून येते. प्रत्येक ठिकाणी सवलत, प्राधान्य किंवा वेगळा मान मिळालाच पाहिजे अशा अपेक्षा हे अहंकाराचे लक्षण आहे. स्त्री असल्यामुळे मिळणाऱ्या सौजन्याचा उपयोग जबाबदारीने करणे आवश्यक आहे. सन्मान हा स्त्रीत्वामुळे मिळतो, पण तो टिकवणे हे स्त्रीच्या वर्तनावर अवलंबून आहे.

याचबरोबर सोशल मीडियाच्या युगात आणि मिळवण्यासाठी उघडपणे अंगप्रदर्शन करणे, अयोग्य वर्तन करणे किंवा स्वस्त प्रसिद्धी मिळवण्याचा प्रयत्न करणे हे स्त्रीस्वातंत्र्य नसून स्वैराचाराचे प्रतीक आहे. स्त्री ही संस्कारांची जननी आहे, कुटुंब आणि समाज घडवणारी शक्ती आहे. म्हणूनच अधिकारांइतकीच कर्तव्यांची जाणीव ठेवणे आवश्यक आहे. स्वतःचा सन्मान जपलाच पाहिजे; पण त्यासोबत मर्यादाही जपल्या गेल्या तरच समाजासमोर योग्य आदर्श उभा राहू शकतो. समाज असंतुलित होण्यामागे एकाच बाजूला दोष देता येत नाही; समाज घडवण्यासाठी स्त्री-पुरुष दोघांचीही प्रामाणिक भूमिका आवश्यक आहे. **

# दिप्ती गाट यांची महिला सक्षमीकरणासाठी भरारी

शैलेश पालकर



पोलादपूर पंचायत समितीच्या गटविकास अधिकारीपदी दिप्ती भरत गाट यांनी कार्यभार स्विकारल्यानंतर काहीशा भुवया उंचावलेल्या पोलादपूकरांच्या अपेक्षांपेक्षा मोठी मजल प्रशासकीय कामकाजातून मारून शासनाच्या विविध योजनांची यशस्वी अंमलबजावणी केली. उमेद सारख्या स्वतंत्र संस्थेच्या माध्यमातून पोलादपूर तालुक्यात २ कोटी ११ लाखांचे कर्जवाटप महिला बचतगटांना करून महिला सक्षमीकरणाद्वारे पुरूषांसाठी खेड्याकडे चलाची साद घालण्यात दिप्ती गाट यांचे यशस्वी प्रयत्न कारणीभूत ठरले आहेत.

कोल्हापूर जिल्ह्यातील हातकणंगले तालुक्यातील हुपरीसारख्या ग्रामीण भागातून शिवाजी विद्यापीठामधून बी.बी.ए. पदवी अभ्यासक्रमात टॉपर राहिलेल्या दिप्ती गाट यांनी एसएनडीटी विद्यापीठातूनही एमबीए फायनान्स शाखेमध्ये टॉपर होत उच्चविद्याविभूषित होऊनही सततच्या अभ्यासू वृत्तीमुळे त्यांची २०१८ साली महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत शासकीय अधिकारी पदी निवड झाली. परिविक्षाधिन काळात रत्नागिरी जिल्ह्यातील संगमेश्वर तालुक्यात गटविकास अधिकारी म्हणून पहिल्यांदाच रूजू होताना दिप्ती गाट यांनी या काळात महिलांच्या आर्थिक व सामाजिक परिस्थितीत उमेद अभियानामुळे झालेला बदल या विषयावर प्रबंध तयार करीत एमए ही पदव्युत्तर पदवीदेखील प्राप्त केली. या काळात कोविड-१९ चा लॉकडाऊन सुरू असताना कोविड सेंटरच्या व्यवस्थापनाची जबाबदारीदेखील त्यांनी आव्हानात्मक परिस्थितीत स्विकारली. संगमेश्वर तालुक्यातील पाणीटंचाई काळात टंचाई निवारण आराखड्यासंदर्भात पथकप्रमुख म्हणून जबाबदारी पार पाडली. यानंतर अहिल्यानगरच्या शेवगाव पंचायत समितीमध्ये प्रशासकीय अनुभव घेत सर्व प्रकारच्या शासकीय योजनांचे कामकाज केले. माझी वसुंधरा या पंचतत्वांवर आधारित योजनेत सक्रीय सहभागाची संधी याकाळातच बिडीओ दिप्ती गाट यांना मिळाली.

२०२४ मध्ये दिप्ती गाट यांनी पोलादपूर पंचायत समितीच्या गटविकास अधिकारी पदाचा कार्यभार स्विकारला आणि अनेकांच्या भुवया उंचावल्या. उच्चशिक्षित असूनही प्रशासनामध्ये थेट जनतेशी संबंध येऊ शकेल अशा पदाची जबाबदारी स्विकारल्यानंतर कर्तव्यदक्षतेमुळे वयाच्या आणि अनुभवाच्या कमतरतेचा अभाव जाणवत नाही, अशा प्रकारे पंचायत समिती सदस्य आणि जिल्हा परिषदेच्या सदस्यांची मुदत संपल्यानंतर रूजू होऊनही लोकनियुक्त प्रतिनिधींना सन्मानाने शासकीय उपक्रमांमध्ये सहभागी करून घेत अनेक लोकाभिमुख उपक्रमांना योग्यरितीने जनतेपर्यंत पोहोचविले. यात प्रामुख्याने त्यांनी उमेद अभियानाबाबत संगमेश्वर येथे सादर केलेल्या प्रबंधानुसार पोलादपूर तालुक्यातील लोहारे आणि देवळे या दोन जिल्हा परिषद गटांमध्ये ४२ ग्रामपंचायतींतर्गत ४३ ग्रामसंघांमध्ये ५२८ महिला बचतगटांमध्ये २ कोटी १० लाखांचे बँक कर्जवाटप करण्याची योजना उमेद या स्वतंत्र संस्थेमार्फत कार्यान्वित करून महिलांमध्ये उद्यमशीलतेत गतिमानता आणली. यामुळे शहराकडे गेलेल्या पुरूषांना खेड्याकडे चला अशी साद बचत गटांद्वारे उद्यमशीलतेतून आर्थिकदृष्ट्या सक्षम झालेल्या महिलांनी घालण्यास सुरूवात केली आहे. यात उमेद अभियानांतर्गत महिलांसाठी विविध मार्गदर्शन शिबिरांचे आयोजन करून महिलांना संघटीतपणे बचतगटाची चळवळ राबविण्यास उद्युक्त केले. अलिकडे, पोलादपूर तालुक्यात प्रथमच महिला शेतकरी उत्पादक संस्था स्थापन करीत एक वेगळेच दालन महिलांसाठी खुले केले आहे. अवजार बँकेची निर्मिती पोलादपूर तालुक्यातील शेतकऱ्यांसाठी उपयुक्त ठरली असून अनुसुचित जमातीसाठी बिरसा मुंडा कृषी क्रांती आणि अनुसुचित जातीसाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकर कृषी स्वावलंबन योजनांचा लाभ घेण्यासाठी तालुक्यातील शेतकऱ्यांना प्रवृत्त करण्यासाठीचे प्रयत्न पंचायत समितीच्या कृषी विभागामार्फत गटविकास अधिकारी दिप्ती गाट यांनी यशस्वी केले आहेत. पोलादपूर पंचायत समितीच्या ग्रामपंचायत अधिकारी वर्गाची संख्या वाढविण्यातही यशस्वी झाल्याने तालुक्यातील ग्रामपंचायतींच्या कारभारामध्ये सुसूत्रता आणण्याचे काम गटविकास अधिकारी दिप्ती गाट यांच्या पाठपुराव्याने झाले आहे. मुख्यमंत्री समृध्द पंचायत राज अभियानाची मुदत वाढल्यानंतर ७ जानेवारी रोजी पोलादपूर तालुक्यात अधिकाधिक वनराई बंधारे बांधण्याचा उपक्रम एकाच दिवशी राबवून पिण्याच्या पाण्याव्यतिरिक्त गुरांच्या पिण्याचे पाणी, महिलांना कपडे, भांडी धुण्यासाठी पाणी उपलब्ध करून देण्याचे यशस्वी प्रयत्न केले. रोजगार हमी योजनेंतर्गत तालुक्यात पहिल्यांदाच गटविकास अधिकारी दिप्ती गाट यांच्या माध्यमातून रोजगारदूतांकरवी शेकडो लोकांना रोजगार मिळाला आणि पहिला गोठा बांधकामाचा प्रकल्प गोळेगणी येथे साकारण्यात आला तर तालुक्यात अनेकठिकाणी विहिरींचे बांधकामही सुरू झाले आहे. प्रधानमंत्री आवास योजनेंतर्गत पूर्वीपासून फारच प्रस्ताव असूनही अत्यल्प घरकुले मंजूर होत असत. याप्रकरणी विशेष लक्ष देऊन गटविकास अधिकारी दिप्ती गाट यांनी प्रस्तावित घरकुलांच्या ६० टक्के घरकुलांना मान्यता मिळविल्याने गोरगरीबांच्या डोक्यावर छप्पर साकारले गेले आहे.

अहिल्यानगरच्या शेवगाव येथे माझी वसुंधरा अभियानामध्ये सहभागी होण्याचा जुजबी अनुभव घेतलेल्या गटविकास अधिकारी दिप्ती गाट यांनी पोलादपूर पंचायत समितीच्या गटविकास अधिकारी (गट-१) पदी रूजू झाल्यानंतर पूर्णपणे सक्रीय सहभाग घेतला. यामुळे कोकण विभागस्तरावर सर्वोत्तम कामगिरी करणाऱ्या गटविकास अधिकारी म्हणून त्यांची निवड जाहीर झाली आहे. आता प्रशासनामध्ये दिप्ती गाट सरसावल्या असून जनताभिमुख कारभारामुळे तसेच महिला सक्षमीकरणाच्या यशस्वी प्रयत्नांमुळे त्यांची पोलादपूर तालुक्यातील गावागावात ओळख निर्माण झाली आहे. **

विनायक दळवी

## भारतीयांच्या मानगुटीवर गतकामगिरीचे भूत

अहमदाबादच्या आंतरराष्ट्रीय क्रिकेट स्टेडियम वर रविवारी टी-२० विश्वचषक स्पर्धा २०२६ चा विजेता निश्चित होणार आहे. २०२३ च्या विश्वचषक ५० षटकांच्या क्रिकेट स्पर्धेच्या अंतिम सामन्यातील पराभवापासून ते काल-परवापर्यंतच्या दक्षिण आफ्रिकेविरुद्धच्या दारुण पराभवपर्यंत भारतीय संघाच्या आठवणी या स्टेडियमची निगडित आहेत. आणि त्यामुळेच भारताचे कट्टर समर्थक देखील या अंतिम सामन्यात भारताच्या विजयाची अजूनही खात्री देत नाहीत. ही गोष्ट झाली क्रिकेट रसिकांची दस्तूरखुद्द खेळाडूना देखील या मैदानावरील कामगिरीचा किंवा गत इतिहासाचा 'फोबिया' झाला आहे असे म्हणायचं का? कारण, अहमदाबाद म्हटले की, भारतीय खेळाडूंना देखील त्या सामन्यातील पराभवाचे भूत समोर दिसायला लागते. पराभवाच्या त्या कटू आठवणी अजूनही पुसल्या जात नाहीत. आणि त्यात भर म्हणून की काय दक्षिण आफ्रिकेविरुद्ध दोन आठवड्यापूर्वी याच मैदानावर आपण वाईट रीतीने हरलो.

असोः अंतिम सामना हा नवा सामना आहे. आपल्याला अपेक्षित असलेल्या कोणत्याही प्रतिस्पर्ध्यान व्यतिरिक्त आपण न्यूझीलंड यांच्यासमोर उभे ठाकले आहोत. न्युझीलंड संघ सदैव हसतमुख, शांत, खिलाडूवृत्तीने कायम खेळणारा आणि संघ म्हणून एकजीव होऊन खेळणारा. त्यामुळे हा संघ आक्रमक वाटत नाही. मात्र, तोच संघ मैदानावर एक चिवट प्रतिस्पर्ध्या सारखा वाटतो. त्या चिवट प्रतिस्पर्ध्याचे, प्रखर प्रतिस्पर्धी कडवा प्रतिस्पर्धी म्हणून कधी परावर्तन होते हे कळतच नाही. आपण दोन वर्षांपूर्वीच कसोटी मालिकेत, या कटू सत्याचा अनुभव घेतला होता. आपण न्युझीलंडच्या खेळाडूंना गारद करण्यासाठी कसोटीच्या सर्व खेळपट्ट्या फिरकीला पोषक अशाच तयार केल्या होत्या. पोषक नव्हे तर आखाडे तयार केले होते. आणि त्या आखाड्यात तोंडघशी कोण पडले तर आपणच. यावेळी तोच न्युझीलंड संघ आपल्यासमोर वीस मर्यादित षटकांच्या क्रिकेटचे आव्हान घेऊन समोर उभा ठाकला आहे.

श्रीलंकेतील या संघाची कामगिरी छातीत धडकी भरवणारी निश्चितच नव्हती. मात्र हा संघ मजल दरमजल करत उपांत्य फेरीसाठी पात्र ठरला. उपांत्य फेरीत त्यांनी ज्या पद्धतीने दक्षिण आफ्रिकेसारख्या या स्पर्धेतील सर्वोत्तम संघाला हरवलं, ते पाहिल्यानंतर मात्र भारतीय संघाला कडवा प्रतिकार करावा लागणार हे निश्चित आहे.

दक्षिण आफ्रिके विरुद्ध सामन्यात अवघ्या ३३ चेंडूत शतक झळकावणारा फील एलन आपण नुकताच पाहिला. त्याच्या जोडीला सलामीला मार्क चॅपमॅन येतो. ही जोडी अधिक काळ खेळपट्टीवर एकत्र खेळली तर अतिशय धोकादायक मानली जाते. ज्याचा अनुभव दक्षिण आफ्रिकेने घेतला होता. कॉन्वे हा यष्टीरक्षक देखील धोकादायक फलंदाज मानला जातो. त्यानंतर अष्टपैलू असे लेबल लावलेली जी मधली फळी मैदानात उतरते त्यांना अष्टपैलू म्हणायचे की, दर्जेदार फलंदाज हाच प्रश्न पडतो. ते उत्तम गोलंदाजीही करतात. कर्णधार सॅटनर हा एक उत्कृष्ट फिरकी गोलंदाज आहे.

न्युझीलंडसाठी लाभदायक आणि भारतासाठी धोकादायक अशी दुसरी गोष्ट म्हणजे संपूर्ण भारतातील सर्वाधिक दूरवर सीमा रेषा असलेले अहमदाबादच मैदान हे एकमेव मैदान आहे. सीमारेषा ७८ ते ८० - ८३ यार्डपर्यंत लांबलेली काही ठिकाणी आहे. त्यामुळे अशा मोठ्या मैदानावर क्षेत्ररक्षण करताना तुमच्या शैलीचा कस लागतोच आणि फलंदाजी करताना तुम्ही एकेरी दुहेरी धावा किती चपळाईने पळता ते देखील पाहिले जाते. या दोन्ही आघाड्यावर न्युझीलंड संघ भारतात पेक्षा निश्चितच उजवा आहे.

आता भारताच्या जमेच्या बाजू पाहूया. सलामीलाच अलिकडे संजू सॅमसन याने वेस्ट इंडिज विरुद्ध आणि इंग्लंड विरुद्ध दोन सामने आपल्या तडाकेबाज फलंदाजीने भारताला जिंकून दिले होते. दोन्ही सामन्याचा तो सामनावीर होता. ईशान किशनची त्याला साथ लाभली तर भारत देखील न्युझीलंड समोर मोठा आव्हान सुरूवातीपासूनच निर्माण करू शकेल. जसे इंग्लंड विरुद्ध मुंबईत उपांत्य सामन्यात या जोडीने फटकेबाजी केली होती.

कप्तान सूर्यकुमार यादव, तिलक वर्मा आणि रिंकू सिंग हे मधल्या फळीत कोणत्याही संघाला गोलंदाजी कशी करायची या प्रश्नात टाकू शकतील अशी तुफान फटकेबाजी करू शकतात. त्यानंतर येणारा अष्टपैलू हार्दिक पंड्या, शिवम दुबे आणि अक्सर पटेल या तिघांची फलंदाजी आणि गोलंदाजीत तेवढीच मदत भारतीय संघाला होत आहे. या स्पर्धेत तिघांनी आपली उपयुक्तता वारंवार सिद्ध केली आहे. त्यामुळे अहमदाबादला या तीन खेळाडूंवर भारतीय संघ अधिक अवलंबून असेल असे वाटते. गोलंदाजीत अर्थातच आपली मदर प्रामुख्याने जसप्रीत बुमरा याच्यावरच असेल. त्याला नवोदित हर्षदीपची तुला मोलाची साथ लाभत आहे हे चांगली गोष्ट आहे. वरून चक्रवर्ती की, कुलदीप यादव या दोन फिरकी गोलंदाजांपैकी कोणाला संधी द्यायची हा यक्ष प्रश्न भारतीयांना उद्या सोडवावा लागणार आहे. तीच गोष्ट अभिषेक शर्मा याला आणखी एक संधी द्यायची का याबाबत देखील विचारली जात आहे. भारतीय संघ गत विश्व विजेतेपद आपल्याकडे राखणार का?

सध्या फॉर्म मध्ये असलेल्या न्यूझीलंडला नामोहरम करून नवा इतिहास घडवणार का? या सर्व प्रश्नांची उत्तरे रविवारी रात्री मिळणार आहे.

# भारत इतिहास बदलण्याच्या उंबरठ्यावर

■ चौथ्यांदा गाठली अंतिम फेरी
■ यजमान जगज्जेता दुहेरी भूमिका राखण्यास सज्ज




| नवी दिल्ली | वृत्तसंस्था |

क्रिकेटमध्ये इतिहास हा दगडावर कोरलेला नसतो, तो बॅटच्या एका फटक्याने बदलतो. विक्रम मोडण्यासाठीच बनतात आणि नवे अध्याय लिहिण्यासाठीच घडतात. टी-२० वर्ल्ड कपच्या १८ वर्षांच्या इतिहासात आजवर एकदाही यजमान संघ जगज्जेता झाला नाही. पण क्रिकेटची ही परंपरा मोडण्याचा निर्धार भारताने केला आहे. तुफान फॉर्म, आत्मविश्वासाचा उफाळा आणि चाहत्यांचा महासागर, या सगळ्यांच्या साक्षीने भारत रविवारी नरेंद्र मोदी स्टेडियमवर इतिहासाला नवा आकार देण्यासाठी उतरणार आहे. अजून एक इतिहास भारतासमोर उभा आहे, जगज्जेतेपद राखण्याचा. टी-२० वर्ल्ड कप जिंकणाऱ्या कोणत्याही संघाला आजवर सलग दोनदा किताब जिंकता आलेला नाही. त्यामुळे भारताकडे आज दुहेरी संधी आहे.

एकीकडे यजमान म्हणून जगज्जेता होण्याचा पराक्रम, तर दुसरीकडे गतवेळचा किताब राखत नवा अध्याय लिहिण्याचा मान. त्यामुळे भारताच्या हातात आज फक्त ट्रॉफी नाही, तर इतिहासाचा पेन आहे. तो इतिहास बदलूनच त्यावर आपल्या नावाची स्वाक्षरी करेल.

२००७ साली दक्षिण आफ्रिकेत टी-२० वर्ल्ड कपचा पहिला प्रयोग झाला. क्रिकेटच्या शांत मंदिरात अचानक ढोल-ताशे, डी. जे. आणि फटाक्यांचा स्फोट व्हावा तसा हा प्रकार होता, षटकारांची आतषबाजी, चौकारांची बरसात आणि शेवटच्या षटकापर्यंत धडधड वाढवणारा थरार. जगाला हा फॉरमॅट अक्षरशः वेड लावून गेला. त्या पहिल्याच स्पर्धेत भारताने ट्रॉफी उचलली आणि क्रिकेटच्या नव्या पर्वाची सुरुवात केली.

टी-२० वर्ल्ड कपमध्ये पाकिस्तान, श्रीलंका आणि इंग्लंड यांनी तीनदा अंतिम फेरी गाठली आहे, त्यापैकी पाकिस्तान आणि श्रीलंका प्रत्येकी एकदा विजेते झाले, तर इंग्लंडने दोनदा ट्रॉफी उचलली. वेस्ट इंडीजचा किस्सा वेगळाच दोनदा अंतिम फेरी आणि दोन्ही वेळा ट्रॉफी त्यांच्या नावावर. पण भारताने चौथ्यांदा अंतिम फेरी गाठत सर्वांना मागे टाकले आहे.

२००७ आणि २०२४ मध्ये भारताने ट्रॉफी जिंकली, तर २०१४ मध्ये उपविजेतेपदावर समाधान मानावे लागले.

आता तिसऱ्यांदा ट्रॉफी उचलण्याची संधी समोर आहे. गेल्या दोन स्पर्धांनी एक गमतीशीर नियम तयार केला आहे. भारत आणि इंग्लंड यांच्यातील उपांत्य फेरी जिंकणारा संघ शेवटी वर्ल्ड कप जिंकतो. २०२२ मध्ये इंग्लंडने भारताला हरवले आणि नंतर ट्रॉफी उचलली.

### यजमानांना संधी?

क्रिकेटमध्ये काही योगायोग इतके विचित्र असतात की ते अंधश्रद्धेसारखे वाटू लागतात. टी-२० वर्ल्ड कपमध्ये यजमान संघ आजवर कधीच विजेता झाला नाही. २०१२ मध्ये यजमान श्रीलंका अंतिम फेरीपर्यंत पोहोचली होती, पण वेस्ट इंडीजने त्यांचे स्वप्न मोडले. तेव्हापासून तब्बल १३ वर्षांनी यजमान पुन्हा अंतिम फेरीत पोहोचलेत आणि तो यजमान म्हणजे भारत, लाखो प्रेक्षकांचा गजर, निळ्या जर्सीचा समुद्र आणि मोदी स्टेडियमचा प्रचंड गडगडाट या सगळ्यांच्या साक्षीने भारत रविवारी या संधीचे सोन करण्यास मैदानात उतरणार आहे.

२०२४ मध्ये भारताने इंग्लंडला हरवले आणि नंतर दक्षिण आफ्रिकेला नमवत ट्रॉफी जिंकली. यावेळी पुन्हा एकदा भारताने इंग्लंडवर विजय मिळवला आहे.

# 'खो-खो'त पुणे सांगलीचे वर्चस्व

■ राज्यातील ७२ संघांचा सहभाग

| चिपळूण | प्रतिनिधी |

एसव्हीजेसीटीच्या क्रीडा संकुलावर पार पडलेल्या १२व्या 'डेरवण यूथ गेम्स'मध्ये खो-खो स्पर्धेत सातारा, पुणे आणि सांगलीच्या संघांनी आपापल्या गटात विजेतेपद पटकावत वर्चस्व गाजवले. यंदाच्या स्पर्धेत संपूर्ण राज्यातून ७२ संघांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवला होता. सामने पाहण्यासाठी क्रीडाप्रेमींनी गर्दी केली होती.डेरवण येथे रंगलेल्या चुरशीच्या सामन्यात १४ वर्षांखालील गटात मुलांमध्ये अंतिम सामन्यात शिव प्रतिष्ठान (खंडाळा, सातारा) संघाने पुण्याच्या रमणबाग मित्र मंडळावर एक डाव आणि तीन गुणांनी विजय मिळवला. विजेत्या संघाकडून वरद पोळ, आयुष यादव आणि स्वराज गाढवे यांनी चमकदार कामगिरी केली. मुलींमध्ये पुण्याच्या राजमाता जिजाऊ क्रीडा मंडळाने सांगलीच्या राजमाता अहिल्यादेवी संघावर अवघ्या एका मिनिट राखून थरारक विजय मिळवला.

पुण्याच्या अपर्णा वरदे व सई घरत यांचा खेळ उत्कृष्ट ठरला. १८ वर्षांखालील गटात मुलांमध्ये खंडाळा येथील (सातारा) राजेंद्र विद्यालय संघाने मुंबई उपनगरच्या शिरसेकर गांधी संघाचा पाच गुणांनी पराभव करत जेतेपद राखले. सातारा संघाच्या प्रेम लोखंडे, आयुष पवार आणि मयूर जाधव यांनी विजयात मोलाचा वाटा उचलला. मुलींमध्ये सांगली भिलवडीच्या राजमाता अहिल्यादेवी होळकर क्रीडा मंडळ संघाने ठाणेच्या ज्ञानविकास संघावर एक डाव व एक गुण राखून दिमाखदार विजय मिळवला. सांगलीच्या धनश्री, श्रावणी आणि विद्या तामखडे या भगिनींनी अष्टपैलू खेळ केला.

### वैयक्तिक पारितोषिके

१४ वर्षांखालील मुले उत्कृष्ट संरक्षक : आयुष यादव (शिव प्रतिष्ठान, खंडाळा), उत्कृष्ट आक्रमक : वेदांत गायकवाड (रमणबाग, पुणे), सर्वोत्कृष्ट खेळाडू : वरद पोळ (शिव प्रतिष्ठान, खंडाळा)
१४ वर्षांखालील मुली :उत्कृष्ट संरक्षक : वेदिका तामखडे (सांगली), उत्कृष्ट आक्रमक : श्रेया जाधव (राजमाता जिजाऊ, पुणे), अष्टपैलू खेळाडू : सई गराडे (राजमाता जिजाऊ, पुणे).१८ वर्षांखालील मुले : उत्कृष्ट संरक्षक : अमय मूर्चावडे (मुंबई उपनगर), उत्कृष्ट आक्रमक : तरबेज खान (खंडाळा), अष्टपैलू खेळाडू : लोकेश जाधव (खंडाळा)१८ वर्षांखालील मुली : उत्कृष्ट संरक्षक : धनश्री कंक (ठाणे), उत्कृष्ट आक्रमक : धनश्री तामखडे (सांगली), अष्टपैलू खेळाडू : श्रावणी तामखडे (सांगली).

# स्केटिंगमध्ये स्पृहा, अद्वैतला सुवर्ण

| चिपळूण | प्रतिनिधी |

तालुक्यातील सावर्डे-डेरवण येथील श्री विठ्ठलराव जोशी चॅरिटीज ट्रस्टच्या माध्यमातून आयोजित डेरवण यूथ गेम्समधील स्केटिंग स्पर्धेत आठ वर्षांखालील मुला-मुलींच्या गटात ठाण्याची रिहा शेट्टी, १० वर्षांखालील मुलींच्या गटात रत्नागिरीची स्पृहा सुर्वे, तर १० वर्षांखालील मुलांच्या गटात रत्नागिरीचा अद्वैत बहुतुले हे सुवर्णपदकाचे मानकरी ठरले आहेत. डेरवण येथे झालेल्या स्पर्धेत ८ वर्षांखालील गटात रत्नागिरीच्या शिवांश महाडीक याने रौप्य, तर सिंधुदुर्गच्या देवांश कोळी याने कांस्य पदक मिळविले. १० वर्षांखालील मुलींच्या गटात रत्नागिरीच्या नेहा शिंदे हिने रौप्य, तर प्रिशा चव्हाण हिने कांस्यपदक पटकावले. याच वयोगटातील मुलांच्या स्पर्धेत रत्नागिरीच्या स्वतेज लाड याने रौप्य, तर गौरांश कित्तूर याने कांस्यपदक मिळविले. वॉल क्लाइंबिंग स्पर्धेमध्ये पुणे संघाने अव्वल स्थान पटकावून आपले वर्चस्व सिद्ध केले आहे. या स्पर्धेतील १५ वर्षांखालील मुलांच्या गटात रत्नागिरीच्या सृजन पटवर्धन याने सुवर्णपदक पटकावले, तर साताऱ्याच्या आशिष जगताप याने रौप्यपदक मिळविले. १८ वर्षांखालील मुलींच्या गटात साताऱ्याच्या तनुजा महाडिक हिने कांस्यपदक पटकावले. ही तीन पदके वगळता इतर सर्व श्रेणींमध्ये पुण्याच्या खेळाडूंनी बाजी मारली. १८ वर्षांखालील मुलांच्या गटात पुण्याच्या आयुष पवार याने सुवर्ण, विराज फाळके याने रौप्य, तर ईशान सूर्यवंशी याने कांस्यपदक पटकावले आहे.

# हॉकी संघाचे नेतृत्व सलीमाकडे



| हैदराबाद | वृत्तसंस्था |

महिला हॉकी विश्वकरंडकासाठीच्या पात्रता फेरीला हैदराबादमध्ये ८ मार्चपासून सुरुवात होणार आहे. स्पर्धेसाठी हॉकी इंडियाकडून भारतीय महिला हॉकी संघाची घोषणा रविवारी करण्यात आली. सलीमा टेटे हिच्याकडे भारतीय महिला संघाचे नेतृत्व सोपवण्यात आले असून, अनुभवी गोलरक्षक सविता पुनिया हिने वैयक्तिक कारण पुढे करीत माघार घेतली आहे. हैदराबादमध्ये होत असलेल्या पात्रता फेरीमध्ये यजमान भारतासह इंग्लंड, स्कॉटलंड, कोरिया, इटली, उरुग्वे, वेल्स व ऑस्ट्रीया या देशांचा समावेश आहे. स्पर्धेमधून तीन देशांना विश्वकरंडकाचे तिकीट बुक करता येणार आहे. 'अ' गटामध्ये इंग्लंड, कोरिया, इटली व ऑस्ट्रीया या देशांचा समावेश आहे. 'ब' गटामध्ये भारत, स्कॉटलंड, उरुग्वे व वेल्स या देशांमध्ये लढती खेळवण्यात येणार आहेत. महिला हॉकी संघ : बन्सारी सोलंकी, बिचू देवी खारीबम, सुशीला चानू, निकी प्रधान, मनीषा चौहान, उदिता, इशिका चौधरी, सलीमा टेटे (कर्णधार), नेहा, सुनेलिता टोप्पो, साक्षी राणा, वैष्णवी फाळके, ऋतुजा पिसाळ, दीपिका सोरेंग, नवनीत कौर, इशिका, लालरेमसियामी, ब्यूटी डुंगडुंग, बलजीत कौर, अन्नू यांचा समावेश आहे.

# वेस्टइंडीजचे खेळाडू भारतात अडकले

| नवी दिल्ली | वृत्तसंस्था |

भारतीय संघाने सुपर ८ मध्ये वेस्ट इंडिज संघाचा पराभव केला होता. पराभवानंतर विंडीजचा संघ मायदेशी परतण्यासाठी सज्ज होता, मात्र काही अनपेक्षित घडामोडी घडल्या आणि वेस्ट इंडिजच्या खेळाडूंना भारतातच थांबावं लागले आहे. वेस्ट इंडिजचे खेळाडू भारतातच अडलेले असून त्यांना घरी जाण्याची घाई झाली आहे. गेल्या ५ दिवसांपासून वेस्टइंडीजचे खेळाडू भारतात अडकून पडले आहेत. याचे मुख्य कारण म्हणजे इराण आणि इस्रायल यांच्यात सुरू असलेले युद्ध. या युद्धजन्य परिस्थितीमुळे अनेक देशांनी आपले एअरस्पेस पूर्णपणे बंद केल्याने आंतरराष्ट्रीय विमानांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे. विमान वाहतूक विस्कळीत झाल्यामुळे विंडीजच्या खेळाडूंना विमानाचे तिकीट मिळवणं कठीण झाले आहे. मिडिल-ईस्टमध्ये निर्माण झालेल्या युद्धामुळे आंतरराष्ट्रीय उड्डाणांवर मोठी मर्यादा आली असून खेळाडूंना भारतात थांबावं लागत आहे.

# पहिला डाव १९८ धावांवर संपुष्टात

**पर्थ :** कर्णधार हरमनप्रीत कौरच्या नेतृत्वाखालील भारतीय महिला क्रिकेट संघ सध्या एकमेव कसोटी सामना खेळत आहे. ऑस्ट्रेलिया कर्णधार हिलीने नाणेफेक जिंकत प्रथम गोलंदाजी करण्याचा निर्णय घेतला आहे. सामन्यात भारताने प्रथम फलंदाजी करताना सर्वबाद १९८ धावा केल्या. प्रत्युत्तरात ऑस्ट्रेलियाचीही १ विकेट गेली आहे. परिणामी पहिल्या दिवशी गोलंदाजांचे वर्चस्व पाहायला मिळाले.

# 'कल्याण केसरी' कुस्ती स्पर्धेचे आयोजन

| कल्याण | प्रतिनिधी |

छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त कल्याणमध्ये रोमहर्षक कुस्ती स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. 'कुस्ती मल्लविद्या महासंघ महाराष्ट्र राज्य' (कल्याण-डोंबिवली शहर) आणि 'श्री प्रतिष्ठान' यांच्या संयुक्त विद्यमाने रविवार, १५ मार्च रोजी मानाच्या 'कल्याण केसरी' लढतीचा थरार रंगणार आहे. या स्पर्धेमुळे कल्याण परिसरातील कुस्तीप्रेमींना रांगड्या खेळाचा रोमांच अनुभवण्याची संधी मिळणार आहे.कुस्तीच्या आधुनिक तंत्राला चालना देण्यासाठी या स्पर्धेतील सर्व लढती वजनगटानुसार मॅटवर खेळवण्यात येणार आहेत. स्पर्धेत सहभागी होणाऱ्या पैलवानांचे वजन स्पर्धेच्या दिवशी, रविवारी सकाळी ९ ते ११ या वेळेत मैदानावरच करण्यात येणार आहे. या स्पर्धेत कल्याण, ठाणे, मुंबई उपनगर आणि रायगड या परिसरातील मल्लांना सहभागाची संधी देण्यात आली आहे. 'कल्याण केसरी'ची मानाची गदा जिंकण्यासाठी अनेक नामांकित पैलवान आपले कसब पणाला लावणार असल्याने या लढतींमध्ये चुरस पाहायला मिळण्याची शक्यता आहे. बहुचर्चित कुस्ती स्पर्धा कल्याण पश्चिम येथील चिक्कणघर परिसरातील रामबाग ४ येथील यशवंतराव चव्हाण क्रीडांगणात आयोजित करण्यात आली आहे.



# महिला कुस्ती संघाची यशस्वी कामगिरी

| ठाणे | प्रतिनिधी |

अल्बेनियातील तिराना येथे आयोजित प्रतिष्ठित मुहामेत मालो रँकिंग सिरीज स्पर्धेत भारतीय वरिष्ठ महिला कुस्ती संघाने उल्लेखनीय कामगिरी करत एकूण पाच पदकांची कमाई केली. संघाने दोन रौप्य व तीन कांस्यपदके जिंकून आंतरराष्ट्रीय स्तरावर आपली ताकद सिद्ध केली. या सर्व यशामुळे आता भारतीय महिला कुस्तीच्या संघाला ऑलिंपिकासाठी मोठी मदत होणार आहे. मात्र हे यश मिळवणाऱ्या संघ आणि प्रशिक्षकांना इस्राईल-इराण युद्धाचा फटका बसला आहे. विमानसेवा बंद झाल्यामुळं हा आनंदाचा क्षण भारतात येऊन साजरा करता न आल्याने संघामध्ये निराशा पसरली आहे.

अल्बेनियातील तिराना येथे युनायटेड वर्ल्ड रेसलिंग यांच्या मान्यतेखाली पार पडलेली ही सीनियर रँकिंग स्पर्धा अत्यंत महत्त्वाची मानली जाते. यात सहभागी होण्यासाठी ठाण्यातील प्रशिक्षक आणि खेळाडू यांच्यासह मदतनीस असा २० महिलांचा गट महिनाभरापूर्वी रवाना झाला होता. तेव्हा सर्वकाही सुरळीत होतं मात्र इस्राएल इराण युद्धामुळं अनेक गोष्टींवर निर्बंध आले आणि विमानसेवा बंद झाली काही तुरळक सेवा सुरु होती. मात्र राहण्यासाठी हॉस्टेलवर सुविधा असल्यामुळे विशेष अडचण नव्हती, मात्र भारतात जाण्याची ओढ लागली होती. पाच पदक मिळवूनही भारतात येता आले नाही तीन दिवस अडथळे येत आहेत. आता भारतात जाण्यासाठी उपाययोजना होत असल्यामुळं ही भारतीय संघ आनंदी झाली आहे. या स्पर्धेमुळे खेळाडूंना महत्त्वाचे रँकिंग गुण मिळाले असून २०२८ ऑलिंपिक स्पर्धेच्या तयारीसाठीही हा महत्त्वाचा टप्पा ठरला आहे.

## सहा वर्षीय मानस ठरला सर्वात तरुण जलतरणपटू | आयईए बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्डमध्ये नोंद

# मूर्ती लहान पण कीर्ती महान

| पाली/बेणसे | प्रतिनिधी |

रायगड जिल्ह्यातील उरण केगाव या छोट्याशा गावातील रहिवासी असलेल्या मानस जयेश पाटील या लहानग्याने सलग १७ किमी सागरी अंतर पार करुन एक नवा विश्वविक्रम केला आहे. त्याची आयईए बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्डमध्ये नोंद झाली आहे.

मानसने हे यश संपादन केल्यानंतर छत्रपती शिवाजी महाराज की जय ही घोषणा देऊन सर्वांची मन जिंकली. गेटवे टर्मिनल्स इंडिया (GTI) च्या सहकार्याने, GTI कर्मचारी जयेश पाटील यांचा मुलगा, ६ वर्षीय मानसने शुक्रवारी (दि.६) मार्च रोजी केगाव नागाव ते JNP-लँडिंग जेटी पर्यंतचे १७ किमीचे यशस्वी सागरी पोहणे ४ तास ४९ मिनिटे ५० सेकंदात पूर्ण करत सर्वात तरुण पोर्ट चॅनल क्रॉसिंग चॅनल पार करण्याचा त्याने विक्रम केला.



या ऐतिहासिक प्रयत्नाला प्रसिद्ध ओपन वॉटर जलतरणपटू संतोष पाटील यांनी मार्गदर्शन केले. यावेळी सुनील पाटील, सुनिल मयेकर, जयेश पाटील, जागृती जयेश पाटील आदी उपस्थित होते.

कार्यक्रमा दरम्यान सीईओ आयईए बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड डॉ. संदीप सिंग, अरुण लाल, हेमंत श्रींगी यांनी मानसला विश्वविक्रमी प्रमाणपत्र, ट्रॉफी व पदक देऊन गौरविले. त्यामुळे मानस पाटील यांचे सर्व स्तरातून कौतुक होत आहे.

मानसच्या रूपाने तो सर्वांसाठी प्रेरणा व केंद्रबिंदू ठरणार आहे. या इव्हेन्टच्या तयारीसाठी अनेक महिने, व वर्ष लागतात, मात्र अवघ्या चार महिन्यात मानसने ध्येय प्राप्ती केली आहे. यामध्ये त्याचे वडील जयेश पाटील, आई जागृती पाटील यांची भूमिका मोलाची ठरते आहे.

> **मानसच्या नावाचे नारे सारेच देत आहेत. हा आवाज केवळ रायगडात गुंजत नसून पूर्ण देश व जगभरात गुंजणार आहे. अशी नेत्रदीपक कामगिरी मानसने केली आहे. अवघ्या सहा वर्षात मोठ्या हिम्मत, धैर्य व साहसाने स्वत:ला समुद्रात झोकून देणे या कार्याला आम्ही सलाम करतो.**
> **-डॉ. संदीप सिंग**
> **सीईओ आयईए बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड**

मानसची आई जागृती म्हणाल्या की, माझा मुलगा आज पहिल्या इव्हेन्टमध्ये जागतिक रेकॉर्ड करीत आहे. याचा मला प्रचंड अभिमान वाटतो आहे असे त्यांनी सांगितले तसेच आजपर्यंत मोठ्या पल्ल्याचे अनेक इव्हेन्ट त्यांनी केलेले आहेत.

> **मानस जयेश पाटील हा अतिशय जिद्द, कठोर परिश्रम व सरावात सातत्य ठेवणारा जलतरणपट्टू आहे. त्याने अवघ्या सहा वर्षात जागतिक विक्रम नोंदविण्याच्या दृष्टीने तयारी केली. त्याने त्याचे ध्येय गाठून अवकाशाला गवसनी घालणारे यश संपादन केले आहे.**
> **संतोष पाटील**
> **जलतरण प्रशिक्षक**

कृषीवल हे पत्र नागेश पब्लिशर्स प्रा. लि.साठी मुद्रक, प्रकाशक सौ.सुप्रिया पाटील यांनी नागेश पब्लिशर्स, वेश्वी, अलिबाग, जि. रायगड ४०२ २०९ येथे छापून येथेच प्रसिद्ध केले. आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ | RGD/016/2026-2028
दूरध्वनी : ०२१४१-२२२२९०/२२२७६१, संपादकीय विभाग-email : krushivalnews@gmail.com / जाहिरात विभाग- email : raigadkrushival@gmail.com मुंबई कार्यालय : ए-५ आयओनिक १८, ऑर्थर बंदर रोड, कुलाबा, मुंबई ४०० ००५. दूरध्वनी : ०२२-२२८८४५३८.
■ संस्थापक-संपादक : स्व. प्रभाकर पाटील ■ व्यवस्थापकीय संचालक : मीरा घाडीगावकर ■ कार्यकारी संपादक : माधवी माणिक सावंत* ■ सल्लागार संपादक : प्रसाद वासुदेव केरकर
(* या पत्रातील मजकुराच्या निवडीसाठी पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे.)